

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र.

# नवलाई

राजेन्द्र बनहट्टी

REFBK-0028061

भूप्रवास
८८२
१८।८।९५

संदर्भ
भू. प्रवास —
८८२
२८०६१
१८।८।९५

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. (किमान दंड १ रुपया घेतला जाईल.)

2 SEP 1995
6 SEP 1995
23 SEP 1995
11 NOV 1995
25 NOV 1995
6 DEC 1995
27 JAN 1996
7 FEB 1996
21 FEB 1996
28 FEB 1996
16 MAR 1996
24 APR 1996
24 APR 1996
27 APR 1996
1 JUN 1996
8 JUN 1996
17 JUL 1996
1996

(क्र. मा. पहा)
४००० —४—९५

OCT 1996




REFBK-0028061
REFBK-0028061

# न व ला ई

आस्ट्रेलियाच्या प्रवासातील अनुभव

राजेन्द्र बनहट्टी

नवलाई :
आस्ट्रेलियाच्या प्रवासातील अनुभव

पहिली आवृत्ती
६ मार्च १९९५

© राजेन्द्र वनहट्टी

मूल्य : पन्नास रुपये

मुद्रक/प्रकाशक :
म. ना. जोशी
सन पब्लिकेशन्स
३१७ नारायण पेठ,
दैनिक प्रभात समोर, पुणे ३०

दूरध्वनी :
कार्यालय : ४५९५४१
निवास : ३३९६५२

## अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रथम ग्रासे .... | ७ |
| बीच सफारी | १६ |
| सिडनी ऑपेरा हाऊस | २९ |
| जेनॉलनची पाताळनगरी | ४१ |
| सौंदर्यनगरी कॅनवरा | ५३ |
| क्रिकेटची मदिना | ६५ |
| स्वान सॉंग | ८१ |
| माणसांचा दुष्काळ | ९० |


●

**पूर्वप्रसिद्धी** : साप्ताहिक सकाळ, पुणे

# राजेन्द्र बनहट्टी यांचे साहित्य

**कादंबरी**

अपूर्णा

* अखेरचे आत्मचरित्र

मरणानंतरचे मरण

**कथासंग्रह**

समानधर्मा

खेळ

आंब्याची सावली

* गंगार्पण

□* कृष्णजन्म

□* लांडगा

अवेळ

युद्धपर्व

प्रेक्षक

• मध्यंतर

**व्यक्तिरेखा**

शंभुराव

**प्रवासवर्णन**

नवलाई

* महाराष्ट्र राज्य शासन सर्वोत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार

□ महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पारितोषिक

• श्री. दा. पानवलकर पारितोषिक

# राजेन्द्र बनहट्टी यांचे साहित्य

**कादंबरी**

अपूर्णा

★ अखेरचे आत्मचरित्र

मरणानंतरचे मरण

**कथासंग्रह**

समानधर्मा

खेळ

आंब्याची सावली

★ गंगार्पण

□★ कृष्णजन्म

□★ लांडगा

अवेळ

युद्धपर्व

प्रेक्षक

• मध्यंतर

**व्यक्तिरेखा**

शंभुराव

**प्रवासवर्णन**

नवलाई

★ महाराष्ट्र राज्य शासन सर्वोत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार

□ महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पारितोषिक

• श्री. दा. पानवलकर पारितोषिक

# प्रथम ग्रासे.....

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६८२
१८।८।८५

भारतातून ऑस्ट्रेलियात विमानाने जायचे झाले तर सामान्यतः दोन मार्गांनी जाता येते. एक म्हणजे नेहमीचा जवळचा आणि सरळ असा सिंगापूरहून जाणारा मार्ग. दुसरा थोडा लांबचा मार्ग हाँगकाँगहून जातो. पण हाँगकाँग ज्यांना पाहायचे असेल त्यांना दुसरा मार्ग सोयीचा आहे. हाँगकाँगला एखादा दुसरा दिवस मुक्काम करून मग ऑस्ट्रेलियाला जाता येते. हाँगकाँगहून तुम्ही विमानाने आलात की ऑस्ट्रेलियाचे प्रवेशद्वार म्हणजे ऑस्ट्रेलियाच्या क्वीन्सलॅण्ड या उत्तरपूर्वेकडील प्रांतात प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावर वसलेले केअर्न्स हे गाव. केअर्न्स हे सुमारे पन्नास हजार वस्तीचे टुमदार गाव आहे. ऑस्ट्रेलियाच्या पूर्वेकडील प्रदीर्घ समुद्रकिनाऱ्यावर अगदी उत्तरेच्या टोकाला हे बंदर विसावलेले आहे. केअर्न्स हे गाव तसे लहान असले तरी प्रवाशांना आकर्षित करणाऱ्या अनेक गोष्टी आणि सर्व सोयी तिथे आहेत. तिथे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. मर्लिन कोस्टसारखे सुंदर सागर किनारे आहेत. वस्तुसंग्रहालय आहे. आर्टगॅलरीज आहेत. घनदाट पावसाळी जंगले (रेन फॉरेस्ट) आहेत. इन्द्रनील आणि स्फटिक यांचा मुबलक साठा आहे. पोवळ्यांचे प्रचंड खडक

आहेत. उत्तम हॉटेल्स आहेत. मगरी, साप या सरपटणाऱ्या प्राण्यांचा विशाल पार्क आहे. समुद्रावर जाणाऱ्या बोटींच्या आणि आकाशात उडणाऱ्या हेलिकॉप्टर्सच्या थरारक सफरी येथे उपलब्ध आहेत. ब्लॅक माऊंटन या पर्वताच्या दर्शनासाठी मोटारींच्या रोमांचक सहली आहेत.

आम्हाला ही सर्व मोहक माहिती असली तरी आम्ही केअर्न्सला भेट दिली नाही. कारण आमच्या दौऱ्यात केअर्न्सचा समावेश नव्हता. हाँगकाँगहून आम्हाला घेऊन येणारे क्वांटास एअरवेजचे विमान केअर्न्सच्या विमानतळावर अलगद उतरले. वेळ सकाळी सातची. पण सूर्याचा मागमूस नव्हता. हवा ढगाळ पण थंड होती. विमानतळाच्या विस्तीर्ण फरसबंदी पलीकडे सभोवताल सपाट हिरवे मैदान अफाट पसरले होते. दूर क्षितीजाच्या सीमेवर गावाच्या वस्तीचे दिवे लुकलुकत होते. आम्ही केअर्न्सच्या सुबक, स्वच्छ आणि जवळजवळ निर्मनुष्य विमानतळावर उतरलो. पण ऑस्ट्रेलियात प्रवेश केला नाही. केवळ ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर पाय ठेवला. केअर्न्सला विमान अर्धापाऊण तास थांबणार होते. तेवढ्या अवधीत विमानतळावर गरमागरम कॉफी घेतली आणि रात्रभर विमानात बसून शिणलेले हातपाय जरा मोकळे केले. विमानतळाच्या बैठ्या इमारतीत थोडे विसावलो तोच पुन्हा विमानात बसण्याची घोषणा झाली. केअर्न्सला बरेच प्रवासी उतरले होते. फारच थोडे चढले होते. त्यामुळे आमचे प्रशस्त विमान अर्धेअधिक रिकामे झाले होते. आम्ही विमानात बसून खुर्चीचे पट्टे आवळताच विमान धावपट्टीवर पळत सुटले नि पाहता पाहता काहीशा आतुरतेने त्याने अंतरिक्षात झेप घेतली ती थेट ब्रिस्बेनकडे. शेवटचा पल्ला गाठण्यासाठी. कारण ब्रिस्बेन हा विमानाचा शेवटचा थांबा होता. हाँगकाँगहून आदल्या रात्री सुरू झालेले विमानाचे उड्डाण तेथे विराम पावणार होते.

ब्रिस्बेन ही क्विन्सलॅण्डची राजधानी. आस्ट्रेलियातील एक सुंदर आधुनिक शहर. सुमारे वीस लाख लोकसंख्येचे ऑस्ट्रेलियातील हे तिसऱ्या क्रमांकाचे शहर केअर्न्सच्या दक्षिणेस विमानमार्गे सुमारे नऊशे मैलांवर वसले आहे. या शहराच्या पूर्वेला निळाशार मोरेटन उपसागर आहे. पश्चिमेला हिरव्याकंच पर्वतरांगा आहेत. दक्षिणेला 'सर्फर्स पॅराडाईज' म्हणून ओळखला जाणारा गोल्डकोस्ट हा अतिरम्य पिवळा धमक समुद्र तट आहे. उत्तरेला विविधरंगी वाळूंनी चमकणारा 'सनशाईन कोस्ट' आहे.

ब्रिस्बेन या मनोहर नगरीत लेनन्स इंटरनॅशनल या पसतीस मजली गगनचुंबी अलिशान हॉटेलात अठराव्या मजल्यावर आम्ही तीन दिवस मुक्काम करणार होतो. ब्रिस्बेनच्या वास्तव्यात शहरातील आणि आसपासच्या विविध प्रेक्षणीय स्थळांना आम्ही भेटी देणार होतो. त्यामध्ये क्विन्सलॅण्ड म्युझियम, आस्ट्रेलियातील आवडत्या कोआला या झोपाळू प्राण्याचे अभयारण्य, प्रचंड अननसाची पैदास करणारी 'बिग पाइन ॲपल' ही विस्तीर्ण बाग, ऑस्ट्रेलियातील चित्रविचित्र प्राणी असलेला अलमापार्क झू इत्यादींचा समावेश होता. ब्रिस्बेनलाच आम्ही ऑस्ट्रेलियात खराखुरा प्रवेश करणार होतो. आणि तिथेच आमच्या ऑस्ट्रेलियाच्या प्रवासाचा श्रीगणेशा होणार होता. कधीही न पाहिलेल्या नव्या जगात आमचा तात्पुरता का होईना शिरकाव होणार होता.

क्वांटास ही ऑस्ट्रेलियाची राष्ट्रीय विमान सेवा. केअर्न्सहून उडालेले आमचे क्वांटासचे विमान आता आपल्या स्वतःच्या ओळखीच्या आकाशात झपाट्याने अंतर कापत होते. घरट्याकडे परतणाऱ्या पक्षाच्या ओढीने ब्रिस्बेनकडे झेप घेत होते. केअर्न्स ते ब्रिस्बेन ही विमान भरारी सुमारे दीड तासांची आहे. काहीशा उत्तेजित आणि उत्कंठ अवस्थेत हा दीडतास कसा संपला ते कळले नाही. अचानक ढगांच्या शुभ्र झिरझिरीत चादरीखाली पहुडलेले ब्रिस्बेन पुसट दिसू लागले. विमान खाली उतरू लागले तशा ब्रिस्बेनच्या उत्तुंग इमारती दृष्टीपथातून सरकत जाऊ लागल्या. त्या इमारतींना संथ वळसा घालत गेलेली विशाल निळीशार ब्रिस्बेन नदी नजरेला सुखावून गेली. पंधरावीस मिनिटात ब्रिस्बेनच्या विमानतळावर आम्ही उतरणार होतो. आतुरतेने विमानाची शेवटची मुसंडी केव्हा सुरू होते याची वाट पाहत होतो. तेवढ्यात विमानातल्या परिचारिकेने इमिग्रेशन आणि कस्टम्सचा फॉर्म हातात दिला. उतरण्यापूर्वी तो फॉर्म भरून ठेवण्याची सूचना मिळाली. कारण कस्टम्सच्या तपासणीच्या वेळी तो फॉर्म देणे आवश्यक होते. झटकन पेन काढून फॉर्म भरण्याच्या उद्योगाला लागलो.

नाव, वय, लिंग, जन्मतारीख, गाव, देश, पत्ता किती दिवस मुक्काम करणार, पासपोर्ट नंबर वगैरे रकाने विनासायास लिहून झाले. शेवटी आलो 'बरोबर आक्षेपार्ह सामान किंवा वस्तू आणल्या आहेत

काय?' या प्रश्नापाशी. आक्षेपार्ह वस्तू काहीच आणल्या नव्हत्या. पण त्या प्रश्नाखाली एक उपप्रश्न होता. खाद्यपदार्थ, अन्नधान्य, फळे वगैरे आणले आहे काय? इथे आमचे गाडे अडले. आमच्या दौऱ्याच्या संयोजकांनी अगोदरच सावधगिरीचा इशारा दिला होता की ऑस्ट्रेलियात खाद्यपदार्थ व अन्नधान्य याबद्दल कस्टम्सचे नियम अतिशय कडक आहेत. ऑस्ट्रेलियात अन्नधान्य आणण्यास सक्त मनाई आहे. खाद्यपदार्थातून व फळे किंवा भाज्या यामधून कुठल्याही प्रकारचे संसर्गजन्य जंतू आपल्या देशात येऊ नयेत आणि कुठलेही प्रदूषण किंवा रोगराई पसरू नये याबद्दल ऑस्ट्रेलियन सरकार अतिशय दक्ष आहे. विशेषतः डाळी, बी-बीयाणे, तेल किंवा पातळ खाद्यपदार्थ आणल्यास, ते आणल्याचे फॉर्ममध्ये जाहीर न केल्यास आणि नंतर तपासणीत ते पदार्थ आढळल्यास ५०० ते ५००० ऑस्ट्रेलियन डॉलर्स म्हणजे एक लाख दहा हजार भारतीय रुपये इतका जबरदस्त दंड होतो. शिवाय दंड न भरल्यास क्वचित् प्रसंगी ऑस्ट्रेलियन जेलची हवा खाण्याचीही संधी मिळते. त्यात पुन्हा भारत हा अन्नधान्यातील भेसळ आणि प्रदूषण याबद्दल जगात मशहूर असल्यामुळे भारतीय प्रवाशांच्या सामानातून खाद्यपदार्थ आल्यास त्यावर कस्टम्स अधिकाऱ्यांची विशेष बारकाईची मेहेरनजर असते. म्हणून आणायचे झाल्यास लाडू, चिवडा, पुरणपोळी, फरसाण यासारखे कोरडे खाद्यपदार्थ आणावेत आणि ते आणले असल्याचे फॉर्ममध्ये स्वच्छ लिहून टाकावे, असा सल्ला आम्हाला मिळाला होता. आता गंमत अशी की आमच्या दहा जणांच्या गटापैकी तिघेच फक्त पूर्ण शाकाहारी होते. एक पारेख नावाचे गुजराथी जैन जोडपे आणि मी. शाकाहारी माणसाची ऑस्ट्रेलियात खाण्यापिण्याची फार आबाळ होते, कारण ऑस्ट्रेलियात सर्वत्र मांसाहाराचे प्राबल्य, शाकाहार मिळणे कठिण अशी आमची समजूत करून देण्यात आली होती. ती पूर्णपणे बरोबर नाही, हे पुढील प्रवासात प्रत्ययास आले. ऑस्ट्रेलियात शाकाहारी माणसाची दुरवस्था होते हे अर्धसत्य असल्याचा प्रत्यक्ष अनुभव आला. अर्धसत्य अशा अर्थाने की ऑस्ट्रेलियात आमची खाण्याची पंचाईत फारशी झाली नाही. कारण आपल्याकडचे डाळभात, भाजी, परोठा असे शाकाहारी जेवण देणारी भारतीय उपहारगृहे तेथे बहुतेक सर्व शहरात आहेत. या उपहारगृहांवर 'इंडियन रेस्टॉरंट' अशी पाटी असली तरी ती

सर्व पाकिस्तानातील किंवा बांगला देशातील मुस्लिमांची आहेत. उपहारगृहे मुस्लिमांची असली तरी तेथे भारतीय शाकाहारी खाद्यपदार्थ आम्हाला मिळण्याची सोय होती. त्यामुळे खाण्याची आमची फारशी गैरसोय झाली नाही. पण पिण्याचे मात्र फार हाल झाले. पिण्याचे म्हणजे पिण्याच्या पाण्याचे. आपल्याला जेवताना भरपूर गडवाभर पाणी पिऊन तृप्तीची ढेकर द्यायची सवय. जेवताना पाणी प्यायल्याशिवाय पोट भरल्यासारखे वाटत नाही. पण तिकडे सर्वत्र पिण्याचे पाणी मिळण्याची मारामार. विमानतळावर पिण्याचे पाणी नाही. सहलीच्या ठिकाणीसुद्धा पिण्याचे पाणी अभावानेच आढळत होते. आम्ही जेथे राहिलो त्या हॉटेलात देखील पाणी प्यायचे तर ते चक्क बाथरूममधल्या बेसिनचे. पिण्याचे पाणी तिथे उपलब्ध नाही असे नाही. पण जेवताना नि खाताना कोक, ऑरेंज किंवा तत्सम पेय प्यायचे. पाण्याचे नाव नाही. अगदी चारचारदा मागितले तर चुकूनमाकून अर्धापाऊण ग्लास पाणी जेवताना मिळायचे. पिण्याच्या पाण्याचे हे दुर्भिक्ष आम्हाला अगोदर कळते तर आम्ही चांगले पिंपभर पिण्याचे पाणी बरोबर घेतले असते. पण पिण्याच्या पाण्याच्या टंचाईबद्दल कोणीच कल्पना दिली नव्हती. उलट ऑस्ट्रेलियात शाकाहार दुर्मिळ अशी आवई उठल्याने आम्ही भरपूर खाद्यपदार्थ बरोबर घेऊन आलो होतो. आणि आता कस्टमच्या फॉर्ममध्ये ते जाहीर करण्याची पाळी आल्यावर आमचे कर्म आमच्या समोर उभे राहिले होते. माझ्या शेजारी बसलेली पारेख दंपति फारशी चिंतातुर दिसत नव्हती. मी त्यांना फॉर्ममध्ये काय लिहिले हे विचारले तर पारेख महाशय नाकावरचा चष्मा सावरत थंडपणे म्हणाले,

"काही नाही."

"म्हणजे?"

"काही आणले नाही, म्हणून लिहिले. नथिंग."

"अहो, पण तुम्ही तर ...."

"आम्ही काय थोडा खाकरा, ढोकळा नि फरसाण आणले आहे. ते काय लिहायचे?" पारेखांची त्यांच्या दुप्पट घेराची अर्धांगी म्हणाली,

"काळजी नथी. इफ यू राईट येस्, दे वील चेक. राईट नो. दॅटस् ऑल." पारेखांनी बनेलपणे हसत माझ्या पाठीवर थाप मारली आणि मला

धीर दिला.

पण मला धीर धरवला नाही. आमच्या घरच्या मंडळींनी मला रव्याचे लाडू व तिखटमिठाच्या पुऱ्या दिल्या होत्या आणि माझ्या सात्त्विक पोटाची सोय केली होती. पण त्यातून नसते लचांड उभे राहिले होते. लाडवांचा प्रश्न नव्हता. पण पुऱ्या या कोरड्या होत्या की तेलाने थबथबल्या होत्या याची मला कल्पना नव्हती. शिवाय त्या काढून पाहणेही आता शक्य नव्हते. शेवटी गांधींचे स्मरण करून सत्याचा प्रयोग करायचे ठरवले. त्यांनी तो दक्षिण आफ्रिकेत प्रथम केला मी तो अगदी दुसऱ्या टोकाला ऑस्ट्रेलियात करणार होतो इतकाच फरक होता. मनाचा धडा करून फॉर्ममध्ये खाद्यपदार्थांच्या रकान्यात 'येस' लिहिले. तपशिलात वस्तूंची नावे व वर्णन लिहिले. नग मोजले नसल्याने अंदाजे आकडा लिहिला. फॉर्म पूर्ण भरून सही ठोकली आणि जीव मुठीत धरून लपलपत्या काळजाने थोडा स्तब्ध बसलो. तोच विमानाची खाली उतरण्याची शेवटची घरघर सुरू झाली. पोटावर सीटचा पट्टा आवळला तरी पोटातली भाकभूक कमी होईना. त्या धांदलीतच विमानाने खाली सूर मारला तसे कानात दडे बसले आणि पाठोपाठ लगेच हलकासा दणका. विमान ब्रिस्बेन विमानतळावर उतरले होते.

खिडकीतून पाहिले तर बाहेर पाऊस कोसळत होता. बॅग घेऊन विमानाच्या दारात उभा राहिलो तेव्हा पावसाच्या धारांतून येणाऱ्या लहरींचा चिंब गारवा अंगाला झोंबला. वाटले, इथे आता चांगलेच थंडे स्वागत होणार त्याची ही सुरवात. शिवाय विमानाचा जिना उतरून सुमारे दोनशे पावलांवरच्या विमानतळाच्या इमारतीपर्यन्त चालत जायचे म्हणजे अगदी सचैल स्नान होणार. पण जिन्याच्या शेवटच्या पायरीवर पोचताच आडोशाला उभ्या असलेल्या सुटातल्या कर्मचाऱ्याने एकदम भली मोठी रंगीबेरंगी छत्री पुढे केली तेव्हा सहसा भारतात तोंडातून लगेच बाहेर न पडणारा शब्द आपोआप उमटला. "थँक्स." त्यावर उत्तरही लगेच मिळाले.

"यू आर वेलकम सर."

थँक्स हा शब्द यापुढे वारंवार माझ्या तोंडून बाहेर पडणार होता आणि वारंवार मला ऐकावा लागणार होता, त्याची ही नांदी होती.

विमानतळाच्या वातानुकूलित इमारतीत प्रवेश करताच उबदार हवेचा

विळखा भोवती पडला. निथळणारी छत्री दारापासच्या डब्यात ठेवून कस्टम्सच्या रांगेत दाखल झालो. कस्टम्सची तपासणी झाल्यावर इमारतीबाहेर उभ्या असलेल्या ऑस्ट्रेलियन सुपरटूर्सच्या वातानुकूलित बसमध्ये आम्हाला जाऊन बसायचे होते. आमचे बाकीचे सहप्रवासी कस्टम्सच्या काऊंटरवरून भराभर आत सटकले. माझ्या पुढे रांगेत उभे असलेले पारेख जोडपेही शहाजोगपणे निसटले आणि माझ्याकडे एक सहानुभूतीचा कटाक्ष टाकून चक्क ग्रीन चॅनेलमधून बाहेर पडले. मी मात्र माझ्या सत्याच्या प्रयोगाच्या नादात अडकलो. काऊंटरवरच्या तरतरीत चेहऱ्याच्या मध्यमवयीन थोराड गोऱ्याबाईने स्मितवदनाने मला निरखत माझ्या पासपोर्टवर शिक्का मारला. मी भरलेला कस्टम्सचा डिक्लरेशन फॉर्म पाहून एकवार मला न्याहाळले आणि फॉर्म आत अधिकाऱ्याकडे पाठविला. मी तसाच खोळंबून उभा राहिलो. माझा पासपोर्ट चाळत तिने विचारले,

"यू आर फॉम् पुने?"

"येस."

"व्हेअर इज पुने?"

"इन महाराष्ट्र."

"माराष्ट्रा? माहाराष्ट्रा? व्हेअर?"

"निअर बॉम्बे"

"ओः ! बाम्बैये ऽऽ!"

हा संवाद होईतोवर माझा फॉर्म आतून बाहेर आला. तो पासपोर्टसह माझ्याकडे देत तिने पुन्हा व्यावसायिक स्मित केले.

"यू गो थ्रू रेड चॅनेल सर. ओ के ?"

काऊंटरवरून आत गेल्यावर मी रेड चॅनेलमधल्या लालभडक जाजमावरून चालत गेलो. दाराशी वॉकीटॉकी हातात घेतलेले दोन कर्मचारी उभे होते. एकाने माझा फॉर्म पाहिला नि पलीकडे अंगुलीनिर्देश केला.

"गो टू द नंबर वन टेबल प्लीज."

मी पुन्हा पुढे सरकलो. तिथे बाहेर जाण्यासाठी 'एक्झिट'च्या पाट्या असलेली तीनचार दारे होती. एक नंबरच्या दारासमोर लांबट टेबलाशी लालबुंद चेहऱ्याचा उंचापुरा भरदार इसम उभा होता. गर्द निळ्या पँटवर, फिक्कट निळसर शर्ट नि गुलाबी टाय. धारदार किरमिजी डोळे,

फुगीर गाल नि पातळ ओठांशी हलकेसे हसू. चेहरा मात्र काहीसा उग्र नि संशयी देखील. माझ्यावर घारे डोळे स्थिर करत हातानेच त्याने मला बॅग टेबलावर ठेवण्याची खूण केली. मी बॅग ठेवून आवंढा गिळत उभा राहिलो. माझा फॉर्म पाहत त्याने अचानक विचारले,

"हॅव यू गॉट एनी मीट सर?"

त्याचा स्वर इतका कमालीचा मृदू नि आर्जवी होता की मी क्षणभर गडबडलोच.

"न ... नो."

"एनी फ्रूटस् अॅण्ड व्हेजिटेबल्स?"

"नो."

"एनी ऑईल और ऑईलसीडस्?"

"नो."

मजेदार सोशिकपणे माझ्याकडे पाहत त्याने गाल फुगवून दीर्घ हुंकार भरला.

"हुं ऽऽ. देन लेट अस सी व्हॉट यू हॅव गॉट इनदेअर. ओपन द बॅग प्लीज."

मी बॅग उघडली. लाडवाचा डबा नि पुऱ्यांची पिशवी बाहेर काढली. डब्यातला लाडू हाताळत त्याने गोंधळलेल्या विस्मित चेहऱ्याने प्रश्न केला.

"व्हॉट इज धिस?"

"लड्डू"

"व्हॉट इज लड्डू?"

मी उत्तर पाठ करूनच ठेवले होते. गव्हाचा रवा भाजून साखरेच्या पाकात शिजवतात आणि त्याचे गोळे तयार करतात. ते गोळे म्हणजे लड्डू. माझे म्हणणे लक्षपूर्वक ऐकल्यावर "ओः मेड ऑफ व्हीट अॅण्ड शुगर आँ?" असे म्हणत त्याने लाडवाचा एक तुकडा मोडला आणि त्याचा घास तोंडात टाकला. इथे माझ्या काळजाचा ठोका चुकला. म्हटलं, आता प्रथमग्रासे मक्षिकापात होणार. हा पठ्ठ्या काही तरी खोड काढून ते लाडू जप्त करणार. लाडू जप्त केले तरी विशेष बिघडणार नव्हते. पण मलाच इथे डांबून ठेवले तर मात्र सगळंच संपलं. पण लाडवाची चव घेत पिंगट भुवया उंचावत त्याने छानपैकी मिटकी मारली. लाडवाचा डबा परत देत तो म्हणाला,

"हुंः व्हेरी नाईस. डिलीशस."

"थँक्स" मी थोडा बावचळून उद्‌गारलो. मनोमन लाडू तयार करणाऱ्या पत्नीचे स्मरण केले.

लाडवावर तो बेहद्द लट्टू झाला असावा, असा त्याच्या प्रसन्न चेहऱ्यावरून मी अंदाज केला. इतका चविष्ट पदार्थ मी ऑस्ट्रेलियात आणला याचे कौतुकही त्याला वाटले की काय कोण जाणे. कदाचित् त्यामुळेच त्याने पुऱ्यांची पिशवी उघडली नसावी. नुसतीच खालीवर करून पाहून मला परत दिली. आणि माझे स्वागत केल्यासारखा हात पसरून दाराकडे बोट दाखवले.

"ओ के सर. यू कॅन गो. वेलकम टू ऑस्ट्रेलिया."

"थँक्स" अशी ओठांची चाळवाचाळव करीत मी झटदिशी खाद्यपदार्थ बॅगमध्ये टाकले. एक्झिटच्या दारातून बाहेर पडलो नि ऑस्ट्रेलियात प्रवेश केला. एव्हाना ऑस्ट्रेलियातला पळपुटा पाऊस ओसरला होता. सकाळचे कोवळे सोनेरी उन्ह आसमंतात झिरपत होते आणि माझ्या काळजाचा चुकलेला ठोका पुन्हा सुरू झाला होता.

■

# बीच सफारी

ब्रिस्बेनच्या लेनन्स ब्रिस्बेन हॉटेल समोरून आमची वातानुकूलित लक्झरी बस सहलीसाठी निघाली तसा बसचा चालक व मार्गदर्शक बिल, ड्रायव्हरच्या सीटसमोर असलेल्या ध्वनिक्षेपकात पुटपुटला.

"गुडमॉर्निंग फोक्स. धिस इज बिल. युवर गाईड कम ड्रायव्हर. वी गो टू सनशाईन कोस्ट टुडे फॉर बीच सफारी."

बीच सफारी हे काय प्रकरण आहे हे एकदम कळले नाही. जंगल सफारी हा प्रकार माहीत होता. जंगलात बंद जीपमधून प्राणी आणि पक्षी पाहत केलेली सुरक्षित सफर म्हणजे जंगल सफारी. मध्यप्रदेशात कान्हा व किसलीच्या राखीव जंगलात हा उद्योग पूर्वी थोडा बहुत यशस्वीपणे केलेला होता. पण बीचसफारी हा काय घोळ आहे याचा उलगडा होईना. बीच म्हणजे वालुकामय समुद्र किनारा. तिंथे लाटांशिवाय काय दिसणार? किनाऱ्यावर कुठले प्राणी असणार? समुद्रातले मासे तर काही किनाऱ्यावर येऊन आमच्यासमोर फिरणार नाहीत? आमच्यापैकी एकाने शंका विचारली. तसा बिल निर्धास्तपणे म्हणाला,

"इटस् अ फोर व्हील ड्राईव्ह ऑन द बीच."

फोर व्हील ड्राईव्ह? म्हणजे बीचवरून मोटारीतून फेरफटका? त्यात काय गंमत असणार? आणि त्यासाठी सगळा दिवस हवा कशाला? समुद्र किनाऱ्यावर मोटारीने रपेट करायची तर फार तर पंधरावीस मिनिटे किंवा अगदी शिकस्त म्हणजे तासभर. बिलच्या उत्तराने आमच्या अज्ञानात भरच पडली होती. आमचा गोंधळ अधिकच वाढला होता, याची बिलला कल्पना होती. पण तो काही बोलला नाही. गालातल्या गालात हसत त्याने ब्रिस्बेनच्या प्रशस्त मुळगुळीत रस्त्यावरून आमची बस सफाईने शहराबाहेर काढली. रुंद पसरट ब्रूस हायवेवर जाताच बस वेगात ठराविक लेनमध्ये नुसती अलगद तरंगत राहिली. रस्ता सरपटत झरझर मागे धावू लागला.

जवळ जवळ सहा फूट उंचीचा तगडा बिल हा तसा अबोल होता. साठीच्या घरात पोचलेला हा इसम खाली लहान मुले घालतात तशी काळी शॉर्ट पँट आणि वर दोन खिशांचा, खांद्यावर फिती असलेला निळसर हाफशर्ट घालून गेले तीन दिवस आमच्या बरोबर निःसंकोच फिरत होता. त्याच्या बालिश पेहरावाशी विसंगत अशी त्याची आकृती थोराड होती नि चेहरा सुप्रीम कोर्टाच्या जज्जासारखा पोक्त आणि गंभीर होता. आवाजही उग्र नि गुरगुरल्यासारखा. ध्वनिक्षेपकातून बसमध्ये घुमताच अधिक जाड आणि दरडावल्यासारखा ऐकू येत होता. त्याचे बोलणे निर्णायक आणि नेमके होते. पण साळसूदपणे अचानक विनोद करण्याची विलक्षण हातोटी त्याच्यापाशी होती, हे कळायला आम्हाला उशीर लागला नाही.

आमच्यापैकी कुणीतरी विचारले "बिल, व्हाय इट इज कॉल्ड सनशाईन कोस्ट?" बिलचा सहज नि थंड प्रतिसाद "बिकॉज सन शाईन्स देअर."

"अरे पण बिल, सूर्य तर सगळीकडेच चमकतो. मग याच किनाऱ्याला सनशाईन कोस्ट का म्हणतात?" आम्ही चेंगट पाठपुरावा केला.

त्यावर बिलचे उत्तर थोडेसे गैरलागू असले तरी मोजके आणि मार्मिक होते.

"हा किनारा ऑस्ट्रेलियाच्या अतिपूर्वेला आहे. सन शाईन्स देअर ऑल डे. व्हेन सन शाईन्स एव्हरीबडी इज हॅपी. यू विल बी हॅपी देअर."

सनशाईन कोस्ट ब्रिस्बेनच्या उत्तरेला सुमारे साठ मैलांवर आहे.

प्रशांत महासागराचा हा किनारा म्हणजे ऑस्ट्रेलियातल्या प्रवाशांचे अटळ आकर्षण आहे. वास्तविक ऑस्ट्रेलिया हा विशाल देश सर्वच बाजूंनी समुद्राने वेढलेला आहे. कारण ते एक स्वतंत्र खंडच आहे. समुद्रकिनारे देशाच्या सभोवार सर्वत्र आहेत. पण ज्याला बीच किंवा पुळण म्हणजे वालुकामय किनारा म्हणता येईल असा सनशाईन कोस्टचा बीच हा लांबीच्या दृष्टीने ऑस्ट्रेलियातील दुसऱ्या क्रमांकाचा बीच आहे. ब्रूस हायवे या चौपदरी एकेरी राजमार्गावरून सुमारे दीडतास प्रवास केल्यावर आमची बस उजवीकडे फुटलेल्या रस्त्याला वळली. या रस्त्याने पाच मिनिटातच आम्ही नूसा या छोटेखानी गावात आलो. गावाला लागूनच नूसा ही दुथडी भरलेली नदी वाहते. नदीच्या काठाशी येऊन आमची बस थांबली. थांबणे भागच होते. कारण रस्ता तेथेच संपला होता. आणि पलीकडे जाण्यासाठी पूल नव्हता. नूसा नदीचे पात्र भरपूर रुंद आणि पाण्याने तुडुंब होते. अल्याडपल्याड हिरवी गच्च झाडी होती. त्या झाडीतून संथपणे वाट काढीत नूसा सुस्त ऐटीत वाहत होती. प्रचंड फेरी बोटीतून मोटारींची वाहतूक या काठावरून त्या काठावर अखंड चालू होती. पण बिलने आमची बस फेरीबोटीत चढवली नाही. त्याने बसमधूनच कोणाला तरी फोन केला. पाच दहा मिनिटातच एक रंगीबेरंगी स्टेशनवॅगन बसपाशी येऊन उभी झाली. स्टेशनवॅगनच्या कॅरीअरवर रंगवलेली पाटी होती. 'हेवर्डस् बीच सफारी.' स्टेशनवॅगन मधून जीन, खाकी शर्ट, काऊबाय फेल्ट हॅट अशा वेशातला चाळीशीचा उमदा तरूण उडी मारून चपळाईने उतरला. त्याने हसत स्वतःची ओळख करून दिली.

"हॅलो गाईज्, आय ॲम हेवर्ड."

बिलने आम्हाला हेवर्डच्या हवाली केले. आम्ही सगळे हेवर्डच्या स्टेशनवॅगनमध्ये जाऊन बसलो. जेमतेम दहाबारा लोकांचीच ती गाडी होती. आम्ही सगळे त्यात नेमके सामावलो. हेवर्डने गाडी सुरू केली नि संभाषणही.

"गाईज, आय टेक यू टू बीच सफारी नाऊ. आय ॲम नॉट ओन्ली युवर ड्रायव्हर बट युवर गाईड, ॲण्ड इफ यू डोन्ट माईण्ड ऑल्सो युवर फ्रेंड ॲण्ड फिलॉसॉफर"

हेवर्डने काठाशी आलेल्या फेरी बोटीवर गाडी चढवली. आणखी

दोनचार मोटारी चढल्यावर फेरीबोट सुरू झाली. सावकाश पाणी कापीत पलीकडे सरकू लागली. तशी हेवर्डने आरामात बेन्सनची सिगरेट पेटवली. तोच आमच्यापैकी एकाने शंका काढली.

"या नदीवर पूल का नाही बांधला? अजून फेरीबोटीनेच वाहतूक का करतात? हा आता जुना प्रकार झाला." धुराची वलये सोडत हेवर्ड म्हणाला,

"इथे पूल बांधला तर इथलं सगळं सौंदर्य नाहीसं होईल. ही दाट हिरवी झाडी पाहिलीत? हे नदीचं नितळ स्वच्छ पाणी पाहिलंत? पूल बांधला की बिल्डर लोक इथे येतील. ही झाडी नाहीशी होऊन इथे हायराईज इमारती उभ्या राहतील. नदीचं पाणी अस्वच्छ होईल. सगळी एनवॉयरनमेंट बकाल होईल. समटाईम्स प्रिमिटीव्ह थिंग्ज आर व्हेरी गुड. दे मेन्टेन एकॉलॉजिकल बॅलन्स. दे प्रिझर्व्ह द ब्यूटी ऑफ नेचर. म्हणून आमच्या नूसाच्या रहिवाशांचा पूल बांधण्यास विरोध आहे. शिवाय पुलावरून भरदिशी पलीकडे जाण्यापेक्षा फेरीतून संथपणे नदीचं हे सुंदर पाणी पाहत जाण्यात किती मजा आहे." लांबलचक भाषण देऊन हेवर्डने फिलॉसॉफर असल्याची चुणूक दाखवली नि आमची तोंडे गप्प केली.

फेरीबोटीतून उतरल्यावर ट्रान्स्फर सीनच झाला. अगदी कच्च्या मातीच्या अरुंद खडबडीत रस्त्यावरून गाडी जाऊ लागली. दोन्ही बाजूला घनदाट जंगल, मध्ये जंगलातून जाणारी ओबडधोबड वाट. जंगल इतके निबिड की दुपारचे बारा वाजले असूनही सूर्यप्रकाशाचा शिरकाव होत नव्हता. सूर्यास्तानंतरच्या संधिप्रकाशासारख्या उजेडात डोंगरातल्या भुयारातून जावे तशी गाडी त्या झाडीने झाकलेल्या निमूळत्या उंचसखल मार्गाने हिंदकळत जात होती. स्प्रिंगच्या बाहुल्या उसळाव्या तसे आम्ही बसल्या जागी टणाटण उडत होतो. फेरीतून उतरल्यावर पहिला गचका बसला तेव्हाच हेवर्डने इशारा दिला होता.

"माईंड युवर हेडस् गाईज. रफ रोड. ब्रेस युवरसेल्फ ॲण्ड सिट टाईट."

ऑस्ट्रेलियातले हायवे आणि फ्रीवे तर सोडाच पण अगदी लहानसहान आडरस्तेदेखील सुंदर, प्रशस्त आणि तुळतुळीत. हा एकमेव रस्ता भारतीय रस्त्यांची आठवण करून देणारा निघाला. आम्ही विचारले त्यावर हेवर्डने

सांगितले की मुद्दामच हा रस्ता कच्चा आणि मातीचा ठेवलेला आहे. सभोवारचा निसर्ग आणि वातावरण यांचा समतोल साधण्यासाठी आहे तसाच नैसर्गिक स्वरूपात रस्ता कायम राखला आहे. मोठ्या बसेस आणि ट्रक्स या रस्त्यावर येत नाहीत. म्हणूनच बिलची मोठी बस अलीकडच्या काठावर ठेवून आम्ही हेवर्डच्या छोट्या स्टेशनवॅगन मधून सफारीला निघालो होतो.

सभोवतालच्या उत्तुंग वृक्षांच्या गर्द पहाऱ्यातून त्या निरुंद खाच खळग्यांच्या रस्त्याने आम्ही सुमारे पंधरा किलोमीटर डचमळत गेलो. हा हेवर्ड चालला आहे कुठे? इथे तर सगळीकडे न संपणारे किर्र्र जंगल दिसते. बीचचा तर कुठे पत्ताच नाही. आम्ही काहीसे संभ्रमात पडलो तोच अचानक ध्यानीमनी नसताना जंगल संपले. ती वळणावळणाची वेढब जंगली वाट संपली, तो झाकोळलेला उदास उजेड संपला आणि एकदम झगमगते भव्य अफाट चित्र डोळ्यापुढे उलगडले. समोर क्षितीजाच्या पार पसरलेला अथांग हिरवा तळपता प्रशांत महासागर, उजवीकडे सागराच्या उसळत्या लाटांना झेलणारे हिरवेगार डोंगर नि डावीकडे रणरणत्या उन्हात चमचमणारा सोनेरी वाळूचा नजरेच्या टप्प्यात न मावणारा पल्लेदार बीच. सनशाईन कोस्ट.

हेवर्डने ते नेत्रदीपक दृश्य आम्हाला पुरते पाहू न देताच गाडी गर्रकन् डावीकडे वळविली आणि बीचवरून वेगाने पळवण्यास सुरुवात केली. पण निळा हिरवा सागर आणि पिवळी गुलाबी वाळू यांच्या मीलनाचा तो अफाट देखावा आमच्या डोळ्यांना एकसारखा दिसतच राहिला. गाडी पुढे जात राहिली तसा तो देखावा अधिकाधिक झळाळत नि विस्तारत गेला. वरती निरभ्र आभाळ. मध्यान्हीचा खदिरांगार सूर्य. उजवीकडे लाटांचे अथक फेसाळ नर्तन. डावीकडे डोंगरावर हेलकावणाऱ्या वृक्षराजींची हिरवी सलामी, खाली रंगीबेरंगी वाळूचे थरावर थर आणि त्यावरून झपाट्याने सरकणारी आमची छोटीशी गाडी. एक अद्‌भुत प्रवास. नेत्रांना सुखाने धुंद करणारा. मनाला भव्यतेने भोवळ आणणारा. पण तशा उन्मनी अवस्थेतही विचार आला, या वाळूच्या किनाऱ्यावरून ही गाडी इतक्या वेगाने चालते कशी ? कुठे वाळूत फसत नाही. कुठे वेग मंदावत नाही. अगदी सिमेंटच्या हायवेवरून चालावी तशी आपली ही गाडी

अनायासे घरंगळत चालली आहे. अगदी थेट पाटीवर रेघ मारावी तशी सरळ नि निर्वेध. आमची शंका हेवर्डला सांगितली तेव्हा त्याचे उत्तर तयार होतेच. त्याने खुलासा केला की या किनाऱ्यावरची वाळू स्पेशल आहे. ही वाळू अतिशय नरम आणि लुसलुशीत आहे पण तेवढीच घट्ट आणि कठिण आहे. वाळूत भुसभुशीतपणा आणि ठिसूळपणा नाही. त्यामुळे मोटारीची चाके वाळूत फसत नाहीत. कुठे मध्ये खडक आला तरच मोटार बाजूला घ्यावी लागते, नाही तर चालली आपली सरळ एका रेषेत. बाणासारखी. या गाडीला स्टीअरिंग नसले तरी काही बिघडत नाही. हे पहा. हेवर्डने स्टीअरींगवरचे दोन्ही हात काढून शांतपणे चक्क सिगरेट पेटवली. धुराचे लोट सोडत तो नुसता बसून राहिला. गाडी निमूटपणे पुढे पळत राहिली. त्याच वेगात. तशीच सरळसोट. सर्कशीतल्या शिकवलेल्या पाळीव जनावरासारखी. आज्ञाधारक नि अचूक. पण ती गाडी कितीही हुकमी असली तरी आम्हाला तिचा हेवर्डइतका भरवसा नव्हता. हेवर्डला स्टीअरींगवर हात ठेवायला लावणे आवश्यक होते. उगाच जरा इकडेतिकडे होऊन गाडी समुद्रात घुसली तर काय घ्या.

विषय बदलण्यासाठी आम्ही त्याला विचारले,

"पण हेवर्ड असे आपण किती वेळ जात राहणार या बीचवरून? आताच अर्धा तास झाला. हा बीच संपणार कधी?"

"एवढ्यात नाही. अजून बराच वेळ आहे."

"बराच? म्हणजे किती?"

"जंटलमेन, वी आर ऑन बीच सफारी ॲण्ड धिस जस्ट द बिगिनिंग. अजून दोन तास लागतील बीच संपायला. चौसष्ट किलोमीटर जायचं आहे आपल्याला." हेवर्डने शेवटचा झुरका घेऊन सिगरेटचे थोटूक टिचकीने उडवले.

"चौसष्ट किलोमीटर?" आम्हाला धसका बसला.

"येस. ऑस्ट्रेलियातला हा दुसऱ्या नंबरचा बीच आहे. याची लांबी चाळीस मैल आहे. यापेक्षा लांब बीच व्हिक्टोरियात आहे. त्याची लांबी सत्तावन्न मैल आहे. पण तिथे तुम्ही कार ड्राइव्ह करू शकत नाही. धिस इज द ओन्ली बीच व्हेअर यू कॅन ड्राइव्ह अ कार. म्हणून तर ही बीच सफारी." हेवर्डने एकदाचा परत स्टीअरींगवर हात ठेवला आणि आम्ही

सुटकेचा सुस्कारा सोडला.

चौसष्ट किलोमीटर असे उसळत्या लाटांच्या साक्षीने टळटळीत उन्हात वाळुतून सलग जायचे या कल्पनेने आमची छाती जरा दडपली. पण पाच दहा मिनिटातच हेवर्डने गाडी डावीकडे वळवून थांबवली. आम्ही गाडीतून उतरून पाहिले तर रंगीत वाळूचे प्रचंड डोंगर दिसले. खरे तर सुरुवातीपासूनच असे लहानमोठे डोंगर आम्हाला दिसत होते. आणि त्यावरची झाडीही आम्ही पाहत होतो. मग इथेच हेवर्ड का थांबला?

हेवर्ड म्हणाला, "हे वाळूचे डोंगर या बीचची स्पेशालिटी आहे. या समुद्रातून येणाऱ्या वादळाने वाळूचे थर जमून हे डोंगर तयार झाले आहेत. या डोंगराचे वैशिष्ट्य असे की इथे बहात्तर रंगाची वाळू सापडते. तुम्ही डोंगराचा एखादा भाग खणून पाहा तुम्हाला वाळूचे बहात्तर रंगांचे थर सापडतील"

बहात्तर रंग ! आम्ही चक्रावलोच. भराभरा वाळूच्या त्या डोंगरावर चढून गेलो. खणाखणी सुरू केली. हातात वाळू घेऊन पाहू लागलो. कुणाला चार रंगांची वाळू सापडली तर कुणाला सहा रंगांची. सात रंगांच्या पुढे कोणी गेला नाही.

हेवर्ड म्हणाला, "मित्रहो, रंगाच्या अगदी सूक्ष्म छटा असतात. त्या तुम्हाला उघड्या डोळ्यांनी ओळखता येणार नाहीत. त्यासाठी मायक्रोस्कोप हवा. तुम्हाला दिसत असेल सात रंगांची वाळू. प्रत्यक्ष त्यात बहात्तर रंगच्छटा आहेत. निसर्गाचे चमत्कार नुसत्या डोळ्यांनी पाहायला माणूस असमर्थ आहे."

आमचे बोलणेच खुंटले. हेवर्डचे म्हणणे मान्य करण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. हातातली रंगीत वाळू झटकून टाकत आम्ही गाडीत बसलो.

अर्ध्या तासाने हेवर्डने पुन्हा गाडी उभी केली. त्या ठिकाणची पाहणी करायला मात्र कुठल्याही मायक्रोस्कोपची जरूर नव्हती. तिथला ऐवज इतका मोठा नि ठळक होता की आमचे उघडे डोळे त्याला पुरून उरत होते. इतकेच नव्हे तर अधू नजरेला देखील तो दिसला असता. तिथे किनाऱ्यावर उन्हातान्हात पडले होते एक प्रचंड जहाज. काळेकभिन्न नि आडमाप. वास्तविक ते दूरवरूनच आम्हाला दिसत होते. पण प्रत्यक्ष गाडी थांबल्यावर त्याच्या भव्यतेची कल्पना आली. या जहाजाचे नाव चेरी ॲडव्हेंचर.

त्याची कथा अशी की सुमारे वीस वर्षांपूर्वी या किनाऱ्यापासून काही मैल आतमध्ये प्रशान्त महासागरात हे जहाज बुडाले. ते समुद्रातून काढण्यासाठी सतत दोन वर्षे प्रयत्न करण्यात आला. पण समुद्राच्या तळाशी लुप्त झालेले ते जहाज सापडू शकले नाही. अनेक तज्ञांच्या कंपन्यांना जहाज काढण्याचे कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले. पण भगीरथ प्रयत्न करूनही कोणाला ते काढण्यात यश आले नाही. प्रशांत महासागर हा नावाप्रमाणेच अतिशय शांत महासागर आहे. पण एखादा वाडा भुताने झपाटलेला असावा तसा प्रशांत महासागराचा नेमका हाच समुद्रकिनारा वादळाने झपाटलेला आहे.

या किनाऱ्यावर तुफान वादळे उसळतात. पर्वतप्राय लाटा उचंबळतात. अशाच एका भयंकर वादळात हे चेरी ॲडव्हेंचर जहाज सागराच्या तळाशी गेले होते. अनेक वर्षे तळाशी ते निपचित पडले होते. सगळे मानवी प्रयत्न थकल्यावर अचानक पुन्हा भयानक वादळ झाले. समुद्र ढवळून निघाला. त्या विक्राळ वादळात हे जहाज या किनाऱ्यावर फेकले गेले. वादळाने समुद्राच्या पोटात गडप केलेले हे जहाज वादळानेच पुन्हा किनाऱ्यावर आणून टाकले होते. समुद्राने गिळंकृत केलेले जहाज जणू न पचल्याने परत बाहेर फेकून दिले होते. तेव्हापासून हे जहाजाचे अजस्त्र कलेवर तसेच इथे किनाऱ्यावर पडलेले आहे. या जहाजाच्या आत हिंडता फिरताना उगाचाच अंगावर शिरशिरी उठत होती. प्रवाशांनी या जहाजाच्या पत्र्यावर आपली नावे ठिकठिकाणी कोरली आहेत. काहीजणांनी जहाजाच्या लोखंडाचे लचके तोडून आठवणी दाखल नेले आहेत. आम्ही आपले त्या जहाजाचे फक्त फोटो घेतले. पण रेतीत बसकण मारून समाधिस्त योग्याप्रमाणे वर्षानुवर्षे तपस्या करणारे, समुद्राने धिक्कारलेले ते पोलादी धूड कॅमेऱ्यात न मावल्यामुळे आम्ही डोळ्यात साठवत गाडीत येऊन बसलो. गाडी पुढे गेल्यावर किती तरी वेळ आम्हाला ते परित्यक्त, बेवारशी उद्ध्वस्त जहाज दिसत होते नि बेचैन करत होते.

किनाऱ्यावर उठणाऱ्या प्रलयंकारी वादळाचा आणखी एक प्रताप हेवर्डने आम्हाला दाखवला. चार पाच किलोमीटर आम्ही गेलो असू नसू तर त्याने ब्रेक दाबला. वाळूच्या थोड्याशा उंचवट्यावर मोठाल्या वृक्षांचे अवशेष पसरले होते. काहीचे बुंधे शिल्लक होते तर काहींच्या फांद्यांचे पर्णहीन ओंडके इतस्ततः विखुरले होते. काही झाडे समूळ उपटली गेली

होती, तेथे खोलगट खड्डे नुसते उरले होते. कोणीतरी या ताडमाड वलाढ्य वृक्षांची दाणादाण उडविली होती. तो वृक्षसंहार जसाच्या तसा जपून सुरक्षित ठेवण्यात आला होता. चेरी ॲडव्हेंचर जहाजासारखाच. प्रेक्षणीय स्थळ म्हणून.

"कशामुळे झालं हे? कोणी केली ही वृक्षांची कत्तल?"

"समुद्राच्या वादळानं" हेवर्ड उत्तरला.

समोर विसावलेल्या अपरंपार निवांत समुद्राकडे आम्ही पाहत राहिलो. तो इतका साळसूद दिसत होता, त्याच्या लाटा इतक्या संथ लडिवाळपणे किनाऱ्याशी लगटत होत्या की हेवर्डच्या सांगण्यावर आमचा विश्वास बसला नाही. पण हेवर्डने त्या संहारक वादळाची सुरस कथा सांगतच गाडी सुरू केली. नि त्याचे वादळ पुराण चालू होते ते बीचचे शेवटचे टोक म्हणजे डबल आयलंड पॉईंट येईपर्यन्त.

डबल आयलंड पॉईंटवर त्या लांबच लांब बीचचे झाडीने डवरलेल्या दोन टेकड्यांमध्ये रुपांतर झालेले आहे. त्या दोन्ही टेकड्या समुद्राने वेढलेल्या आहेत. वाळूचा तो शेंदरी रस्ता सरळ टेकडीवर निरुंदपणे चढत गेलेला होता. टेकडीवर चढून सभोवार पाहिले की अतिविशाल बहारदार दृश्य दिसते. आकाशाचे संपूर्ण प्रतिबिंब सागरात उमटलेले उंचावरून पाहायला मिळते. समुद्राच्या पाण्याच्या दूरवर बदलत गेलेल्या रंगच्छटांवर नजर खिळून राहते. पांढुरका, काळसर, निळसर, पोपटी, गर्द हिरवा, पिवळा केशरी, तांबूस नारिंगी अशा विविध रंगांचे इन्द्रधनुष्य समोर हलत झुलत स्पंदन पावत राहते. मध्येच सोसाटा उठला नि दूरवरून आतून एखादी अजस्त्र लाट रोंरावत आली की सगळे रंग विस्कटून रंगाची दंगल उसळते. आम्ही टेकाडावरून त्या रंगपंचमीत दंग असतानाच हेवर्ड म्हणाला,

"तो पहा आपण आलो तो बीच."

आम्ही उजवीकडे पाहिले तर खरंच आम्ही आलो तो वाळूचा मैलोन मैल पसरलेला राजमार्ग जवळजवळ शेवटपर्यन्त नजरेत येत होता. ते काठावरचे रेतीचे रंगभरे पहाड दिसत होते. वाळूत रुतलेले ते प्रचंड पोरके जहाज दिसत होते. आम्ही जिथून आलो त्या सगळ्या खाणाखुणा ओळखू येत होत्या. मध्येच बीचवर आलेले काळेशार खडक, आत घुसलेले

डोंगरांचे सुळके, खोलवर सरकलेले समुद्राचे पाणी. असेच उंचावर बसून गतायुष्य पाहता आले तर .... गेलेले दिवस पुन्हा जगता आले तर.

"मला सांगा, ते जहाज इथून किती दूर असेल?" हेवर्डने प्रश्न केला. झाले. जो तो अंदाज बांधू लागला. कुणी म्हणाले दोन किलोमीटर, कुणी म्हणाले तीन मैल. कुणी सांगितले पाच किलोमीटर.

एका सोबत्याने तर प्रतिप्रश्नच विचारला,

"हेवर्ड, मला तू अगोदर सांग. तो समुद्रात बुडणारा सूर्य किती दूर असेल?"

गंभीरपणे अंतराचा अंदाज करणारे सगळेच हसले. पण हेवर्ड म्हणाला, "डोन्ट पुल माय लेग्ज. टेल मी हाऊ फार इज दॅट शिप फ्रॉम हिअर."

उगाच अंतराकडे पाहून डोळे बारीक करत ज्याने त्याने परत अदमास केला. पत्रिका पाहून भविष्य वर्तवावे तसा.

"ऑल ऑफ यू आर रॉंग. खरे अंतर आहे पंधरा किलोमीटर."

"पंधरा किलोमीटर बापरे!" सगळेच चकित झाले. उंचावरून जहाज किती जवळ दिसत होते.

सूर्यबिंब समुद्राच्या पाण्यावर टेकताच लाटांवर रक्ताचा ओघळ पसरला तसा हेवर्ड टेकडीवरून उतरू लागला.

"टाइम टू गो बॅक फोक्स कम ऑन."

आमचा परतीचा प्रवास रेतीच्या चुरचुरत्या रस्त्यावरून पुन्हा सुरू झाला. आता उन्हाचा ताप नव्हता. समुद्रावरचा गार वारा शिणलेले शरीर कुरवाळत होता. येताना जवळजवळ निर्मनुष्य असलेला तो बीच आता ठिकठिकाणी माणसांनी फुलला होता. कितीतरी जण समुद्रात गळ टाकून ताटकळत उभे होते. डोंगरांच्या आडोशाला, झाडीच्या खाली बीचवर बऱ्याच ट्रेलर जोडलेल्या मोटारी येऊन थांबलेल्या होत्या. काही लोकांनी चक्क तंबू ठोकलेले होते. हे सगळे आनंदयात्री रात्रभर सागरतीरावर मुक्काम करायला आले होते. प्रत्येकापाशी जनरेटर्स होते. त्यामुळे टी. व्ही. वरच्या चित्रांबरोबरच दिवेही लुकलुकू लागले होते. तंबू समोर किंवा ट्रेलरसमोर बार्बेक्यूची तयारी चालू झालेली दिसली. खरपूस वास नाकात शिरताच आम्हालाही जठराग्नी प्रदीप्त झाल्याची जाणीव झाली.

हेवर्डने अकस्मात् थोडी बाजूला एका झाडाखाली गाडी थांबवली.

"कम ऑन गाईज लेट अस हॅव सम रिफ्रेशमेंटस्. इट हॅज बीन अ लाँग डे."

आम्ही चपापलो. रिफ्रेशमेंटस्? इथे कुठे हॉटेल वगैरे दिसत नाही. रिफ्रेशमेंटस् कुठे मिळणार?

हेवर्ड उडी मारून उतरला. त्याने स्टेशनवॅगनची मागची फळी बाहेर ओढली. आतल्या दोन पेट्या फळीवर ठेवल्या. एक पेटी उघडली तर त्यात खाद्यपदार्थांचा व पेयांचा खजिनाच भरलेला होता. बिस्किटे, केक्स, चॉकलेटस् फिंगरचिप्स, चहा, कॉफी, कोक, ऑरेंज सगळे पेटीतून काढून हेवर्डने फळीवर व्यवस्थित ठेवले. पण कुणीच पुढे सरकेना. हे सगळे फुकट आहे की विकत? आपसात चर्चा सुरू झाली. कारण साध्या चहाच्या किंवा कॉफीच्या एका कपाला कधी दीड तर कधी दोन ऑस्ट्रेलियन डॉलर पडतात. म्हणजे तेहतीस किंवा चव्वेचाळीस रुपये. तसला प्रकार असला तर नकोच ही रिफ्रेशमेंट. कुणीतरी धीर करून हेवर्डला विचारले, तसा तो मजेत गडगडाट करून हसला.

"डोन्ट वरी. इट इज ऑन द हाऊस. गो अहेड."

त्याबरोबर सगळेच भुकेले जीव त्या खाद्यपदार्थांवर तुटून पडले. खाण्याच्या वस्तूंचा आणि पेयांचा अक्षरशः फन्ना उडाला. आम्ही हेवर्डच्या आतिथ्याचा पुरेपूर समाचार घेत असतानाच हेवर्डने हळूच दुसरी पेटी उघडून ठेवली होती. त्या पेटीत विक्रीसाठी सॉव्हेनीर्स होती. कांगारू, कोआला यांच्या छोट्या प्रतिकृती, लाकडातून कोरलेले चिमणे पक्षी, रंगीत वाळूच्या ट्यूब्ज, की चेन्स अशा लहान लहान अनेक वस्तू पेटीत मांडलेल्या होत्या. हेवर्डने पुन्हा पुकारा केला.

"नाऊ धिस इज फॉर सेल."

झाले. सगळ्यांनी खाताना हात आखडता घेतला. दुसऱ्या पेटीपाशी आता सारे घोटाळू लागले. लाजेकाजेस्तव तीनचारजणांनी नको असतानाही चारपाच डॉलर्सची खरेदी केली. बाकीचे मात्र 'काय गार वारा सुटलाय, थंडी वाजते आहे. आत बसावं झालं' असं पुटपुटत छातीशी हात आवळत गाडीत जाऊन गडप झाले. हेवर्डने भराभर पेट्या आवरल्या. गाडी सुरू झाली तशी पुन्हा जाणीव झाली की खायला मिळाले, चहा कॉफी मिळाली

पण दिवसभरात पाणी प्यायला मिळाले नव्हते. कंठशोष पडला होता. कुणीतरी हेवर्डला ते सांगितले तरी तो काही बोलला नाही. गप्पच राहिला. सगळ्यांना वाटले, गडी रागावला. पण पाच दहा किलोमीटर जाताच हेवर्डने गाडी थांबवली. गाडीतले एक लांबट फावडे घेऊन तो उतरला.

"कम ऑन गाईज. ब्रिंग युवर ग्लासेस."

इथे कुठे पाणी? कुठे नळ दिसत नव्हता. एकीकडे समुद्राचे अमाप पण खारे पाणी. दुसरीकडे डोंगर. पण हेवर्ड तरातरा एका डोंगराच्या पायथ्याशी गेला. तेथील वाळू त्याने फावड्याने उकरली तर काय एकदम पाण्याचा ओघळ उमटला. थोडे खोल खणताच भळाभळा पाणी बाहेर उसळू लागले. फावड्याने त्याने वाळू बाजूला केली तर नितळ स्वच्छ पारदर्शक पाण्याचा झराच लागला. हे पाणी पिण्याचे आहे का? कोणी तरी शंका काढली. तसा हेवर्ड म्हणाला,

"इट इज प्युअर मिनरल वॉटर. शहरात तुम्हाला याची बाटली पाच डॉलरला मिळते. हिअर इट इज फ्री. निसर्ग तुम्हाला सगळं फुकट देत असतो."

आम्ही सगळे ते चवदार शुद्ध पाणी आकंठ पिऊन तृप्त झालो. गाडीत येऊन विसावलो तेव्हा कसलीच कामना उरली नव्हती. डावीकडे समुद्राची गाज ऐकू येत होती. पाणी जांभळे पडत चालले होते. पण तिकडे आमचे लक्ष नव्हते. दिवसभर समुद्राचे हिरवेनिळे पाणी पाहून नजर शिणली होती. डोळ्यांसमोर हिरवेनिळे ठिपके उमटत होते. संतुष्ट शरीराने नि मनाने आम्ही माना मागे टाकून गाडीत पहुडलो होतो. शरीर ढिले सोडले होते. तो बाहेरचा हेलावता सागर, ती रेशमी कुरकुरीत वाळू, ते निश्चल निळे डोंगर, हे सगळे दृश्य संधिप्रकाशात फार सुंदर दिसत होते. पण एकसारखी ती सुंदरता पाहून पेंग येत होती. कुठेही काही पाहावेसे वाटत नव्हते. सतत अखंड सौंदर्याचा देखील कंटाळा येतो. विविधता हवी असते. मग ती कुरूप असली तरी चालेल.

नुसा नदीकडे जाणाऱ्या जंगलरस्त्यावर गाडी वळत असतानाच डोळे उघडले तर बीचवरून उंटांची सवारी चाललेली दिसली. उंट पर्यटकांना पाठीवर वाहून नेत होते. पण उंट इथे कसे? ऑस्ट्रेलियात काही उंट, हत्ती वगैरे प्राणी नाहीत. इथले देशी प्राणी म्हणजे कांगारू, कोआला, एमू

वगैरे. उंट इथे कसे आले, हेवर्डला विचारले तर त्याने सांगितले की इथल्या एका व्यापाऱ्याने काही वर्षांपूर्वी भारतातून उंट आणले होते. त्यांची इथे पैदास केली. बीचवरील उंट हे त्या भारतीय उंटांचे वंशज आहेत. मी त्या उंटांकडे पाहत राहिलो. त्या संध्याकाळच्या ओसरत्या उजेडात बिचारे भारतीय उंट मुकाट्याने देशविदेशच्या प्रवाशांचे ओझे वाहत होते. निमूटपणे नि बिनतक्रार.

■

# सिडनी ऑपेरा हाऊस

भूप्रवास
682

ऑस्ट्रेलियात दर दोनतीन दिवसांनी विमान प्रवासाचा योग होता. अगदी थोड्या कालावधीत हा अफाट खंड पादाक्रांत करायचा होता. रात्र थोडी आणि सोंगे फार अशी अवस्था होती. त्यामुळे विमानासारखे जलद आणि सोयीस्कर असे दुसरे साधन नव्हते. क्वांटास ही आस्ट्रेलियाची राष्ट्रीय विमानसेवासुद्धा मोठी तत्पर आणि आकर्षक होती. विमानात खिडकीपाशी जागा मिळवायची आणि विमान उतरू लागले की खाली तरंगताना दिसणाऱ्या शहराच्या खाणाखुणा पाहायच्या, विहंगम निरीक्षण करायचे, हा एक छंदच जडला होता. ब्रिस्बेनहून उडालेले आमचे विमान सिडनीला उतरू लागले तसा मी खिडकीतून खाली पाहू लागलो. तोच शेजाऱ्याने सांगितले,

"ते पहा सिडनीचे ऑपेरा हाऊस"

पाहिले तर प्रागैतिहासिक काळातील अतिप्राचीन पांढराशुभ्र डायनासोर्स वेटोळे घालून बसला असावा तशी खवले खवले असलेली सफेद इमारत दिसली. ती इमारत प्रचंड शिपल्यांच्या ढिगाऱ्यासारखी उन्हात चमकत होती. सिडनी बंदराच्या काठावर असल्यामुळे जहाजे शिडे उभारून

नांगरलेली असावी असेही भासत होते. पण जहाजाची शिडे पद्धतशीर आणि व्यवस्थित उभारलेली असतात. या इमारतीच्या अंगावरचे खवले एकमेकांना छेद देणारे दिसत होते. त्यांची रचना प्रमाणबद्ध वाटत नव्हती. त्यामुळे जगभर प्रसिद्ध असलेले आणि आधुनिक स्थापत्यशास्त्राचे जगातील एक आश्चर्य म्हणून ओळखले जाणारे सिडनीचे ऑपेरा हाऊस विमानातून घडलेल्या दूरदर्शनात प्रथमदर्शनी तरी नजरेला भावले नाही.

पण दुसऱ्या दिवशीं ऑपेरा हाऊस प्रत्यक्ष पाहायला गेलो तेव्हा मात्र त्याच्या भव्यतेने दडपल्यासारखे झाले. त्या दडपणाने भारावूनच ऑपेरा हाऊस भोवतीच्या विस्तीर्ण सपाट फरसबंदीवर आम्ही चक्कर मारली. फरसबंदीला लागून सिडनी बंदर आहे. बंदराच्या निळ्याशार पाण्याची आणि त्यावरच्या गोल कमानदार प्रचंड पुलाची पार्श्वभूमी ऑपेरा हाऊसला लाभलेली आहे. फरसबंदीतल्या जिन्याने खाली उतरले की माहितीकेन्द्र आणि रेस्टॉरंट आहे. माहितीकेन्द्रात ऑपेरा हाऊस हिंडून दाखविण्यासाठी आणि सर्व माहिती देण्यासाठी मार्गदर्शकाची व्यवस्था करण्यात येते. मार्गदर्शकासह अशी 'गाईडेड टूर' सकाळी ९ ते दुपारी २ या वेळात उपलब्ध असते. ही टूर सुमारे एक तासाची असते. बॅक स्टेज आणि तालमीच्या जागा दाखविण्यासाठी फक्त रविवारी दीडतासाच्या खास टूरची व्यवस्था असते. या टूरचे दरही जास्त असतात. आम्ही गेलो त्या दिवशी रविवार नव्हता. दुपारी १ वाजता आमच्या टूरचे आरक्षण झाले होते. आम्ही वेळेवर पोचताच आमची मार्गदर्शिका हसतमुखाने आम्हाला सामोरी आली.

"वेलकम टू ऑपेरा हाऊस. एव्हरीबडी अंडरस्टँटस् इंग्लिश? ओ के?" काहीशा उंच पण गोड स्वरात तिने विचारले.

आम्ही माना डोलावताच ती म्हणाली, "गुड. फॉलो मी प्लीज." आणि भराभर चालू लागली. आम्ही मार्गदर्शिकेच्या मागोमाग त्वरेने निघालो. एकाच बाईच्या मागे इतकी माणसे लागलेली हे दृश्य क्वचित् दिसते. पण तिथे तर सर्वत्र मार्गदर्शक बायांच्या मागे गटागटाने लागलेली माणसे जागोजाग दिसत होती. त्यातल्या काही गटांच्या नशिबी आलेल्या मार्गदर्शिका या बऱ्याच प्रौढ, पोक्त चेहऱ्याच्या आणि स्थूल शरीराच्या होत्या. सुदैवाने आमची मार्गदर्शिका ही अगदी नवयौवना नसली तरी

बऱ्यापैकी तिशीतली होती. काळे बूट, पांढरे मोजे, चेकचा किरमिजी झगा, त्यावर जॅकिट अशा वेशातली गुलाबी कांतीची, बेतशीर उंचीची तिची सुबक आकृती बाहुलीसारखी दिसत होती. पण ती नाजूक दिसत असली तरी तिचे चालणे झटपट होते. तिच्या मागे वेगाने चालणे ही एक कसरतच होती. लिफ्टचे दार उघडून ती आमच्यासाठी थांबली तेव्हा आम्ही सर्वांनी तिला अखेरीला गाठले. लिफ्टमध्ये आमचा दहाजणांचा गट आणि ती एकटी. कुणीतरी तिला तिचे नाव विचारले. ती हसली. म्हणाली,

"कॅट."

"कॅट?" आम्ही चक्रावलो.

"कॅथलिन. बट कॉल मी कॅट. ओ के?"

तिचे डोळे मांजरीसारखे हिरवट घारे होते. केसही पिंगट भुरके होते. हालचाल चपळ होती. काहीशी चोरटी देखील. पण तरीसुद्धा तिला सरळ कॅट म्हणणे हे आम्हाला अंमळ अवघड वाटले. आम्ही आपले तिला कॅथलिन या नावानेच संबोधू लागलो. कॅथलिनने लिफ्टमधून आम्हाला प्रथम कॉन्सर्ट हॉलमध्ये नेले. हा दुमजली हॉल फारच भव्य होता. निरनिराळ्या दराच्या वर्गासाठी तेथे लाल, निळ्या, हिरव्या, पिवळ्या अशा वेगवेगळ्या रंगाच्या खुर्च्या होत्या. कॅथलिनने आम्हाला अगदी समोरच्या पहिल्या वर्गाच्या लाल खुर्च्यांवर बसवले. ती स्वतः आमच्यासमोर स्टेजच्या पुढे खाली छातीशी हात बांधून ठसक्यात उभी राहिली. आणि तिने आपल्या मंजुळ आवाजात ऑपेराहाऊसचा इतिहास आणि माहिती सांगणारे पंधरावीस मिनिटांचे चक्क भाषणच दिले.

तिच्या भाषणाचा थोडक्यात सारांश असा की ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्स या प्रांताच्या सरकारने या ऑपेराहाऊसच्या बांधकामाची सर्व व्यवस्था केली. सिडनी ही न्यू साऊथ वेल्सची राजधानी आहे. इथल्या काही कलाप्रेमी नागरिकांनी प्रयोगशील कलाविष्काराचे एक केन्द्र (Performing Art Centre) सिडनीत असावे असा शासनाकडे आग्रह धरला. ही गोष्ट १९५० सालची. या नागरिकांमध्ये प्रमुख होता सर युजिन गुसेन्स. हा गृहस्थ त्यावेळी सिडनीच्या संगीत अकादमीचा संचालक आणि सिडनी सिंफनी ऑर्केस्ट्राचा मुख्य कंडक्टर होता. त्या वेळचा प्रांताचा मुख्यमंत्री जोसेफ कॅहिल याने ही कलाकेंद्राची कल्पना उचलून

धरली आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी एक समिती स्थापन केली. आश्चर्य असे की समितीने लगेच पद्धतशीर कामाला सुरवात केली आणि प्रथम इमारतीसाठी सिडनी बंदराजवळची अतिशय मोक्याची आकर्षक जागा निवडली.

या कला संकुलाच्या इमारतीच्या डिझाईनसाठी एक आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत देशोदेशीच्या प्रसिद्ध स्थापत्य विशारदांनी भाग घेतला. १९५७ साली या स्पर्धेचा निकाल जाहीर झाला. विजेता ठरला डॅनिश वास्तुविशारद जॉर्न उटझन. इमारतीचे डिझाईन संमत झाले तरी मुख्य गोष्ट राहिलीच होती. ती म्हणजे पैशाची उभारणी. मुख्यमंत्री कॅहिल याने बांधकामाचा पैसा गोळा करण्यासाठी फंड निर्माण केला. या कलासंकुलाच्या खर्चाचा पहिला अंदाज होता सात दशलक्ष डॉलर्स. इमारतीचा खर्च तर दिवसेंदिवस वाढत चालला होता. सर्व रक्कम फंडातून जमा होणार नाही, असे वाटल्याने कॅहिल याने ऑपेराहाऊस लॉटरी काढून त्याद्वारे पैसा जमा केला. अखेरीला इमारतीचा खर्च हा १०२ दशलक्ष डॉलर्सपर्यन्त पोचला. यापैकी फंडातून फक्त ९ लक्ष डॉलर्स गोळा झाले, उरलेली सर्व रकम लॉटरीच्या .फायद्यातून आणि नागरिकांच्या देणग्यातून जमा करण्यात आली.

या ऑपेराहाऊसच्या बांधकामाचाही एक मोठा इतिहासच आहे. कुठल्याही चांगल्या कामाला विरोध करणारे काही लोक सगळीकडेच असतात. इथेही या कलासंकुलाला कडवा विरोध झाला. इतकी मोठी रक्कम कलेसाठी आणि करमणुकीच्या केन्द्रासाठी खर्च करण्यास अनेक राजकीय पक्षांनी आणि नागरिकांनी कडाडून प्रतिबंध केला. पण त्या सर्वांवर मात करून इमारतीचे बांधकाम मार्च १९५९ मध्ये सुरू झाले. पायाभरणी आणि इमारतीचा सांगाडा १९५९ ते १९६३ या काळात उभारून झाला. १९६३ ते १९६७ या अवधीत इमारतीच्या घुमटाकार खवले असलेल्या छताचे काम पूर्ण झाले. आतल्या काचेच्या भिंती, अंतर्गत सजावट, थिएटर्स, कॉरिडार्स, पॅसेजेस वगैरे उरलेले सर्व आतील बांधकाम १९६७ ते १९७३ या सात वर्षात आटोपण्यात आले. इमारतीचे मूळ डिझाईन हे इतके धाडशी आणि विचित्र होते की ते बांधणे जवळजवळ अशक्य झाले. त्यामुळे बांधकाम करणाऱ्या इंजिनीयरांचा

आर्किटेक्ट उटझन याच्याशी तीव्र मतभेद झाला. अखेरीला उटझन याने छताच्या खवले वजा घुमटांना गोलाकाराचे एक निश्चित स्वरूप दिले. त्यामुळे ते घुमट ओतीव (Pre-cast) करता आले आणि खर्च व वेळ यांची बरीच बचत झाली.

परन्तु मतभेद झाल्याने उटझनने १९६६ सालीच राजीनामा दिला. आणि तो या प्रकल्पातून हात झाडून मोकळा झाला. मग सरकारी आर्किटेक्ट फारमर याच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियन वास्तुतज्ज्ञांच्या गटाने सर्व डिझाईनचा पुनर्विचार केला आणि अनेक सोयीस्कर व कार्यात्मक बदल करून या अजस्त्र इमारतीचे बांधकाम शेवटी पूर्णत्त्वास नेले.

या महाकाय नाट्यसंगीत संकुलात उद्घाटनाचा पहिला प्रयोग २८ सप्टेंबर १९७३ रोजी झाला. हा प्रयोग टॉलस्टॉयच्या 'वॉर अॅण्ड पीस' या जगद्विख्यात कादंबरीवर प्राकोफिव्ह याने रचलेल्या संगीत नाटकाचा होता. ऑस्ट्रेलियन ऑपेरा कंपनीने हा प्रयोग सादर केला होता. पण या सिडनी ऑपेरा हाऊसचे रीतसर अधिकृत उद्घाटन मात्र इंग्लंडची राणी एलिझाबेथ दुसरी हिच्या हस्ते २० ऑक्टोबर १९७३ रोजी झाले. म्हणजे १९५० साली सुरू झालेला हा प्रकल्प तब्बल तेवीस वर्षांनी प्रत्यक्ष साकार झाला. यावरूनच त्याच्या भव्यतेची, विस्ताराची आणि सुसज्जतेची कल्पना येते. पण तरीदेखील आमची मार्गदर्शिका कॅथलिन हिने सांगितलेल्या पुढील आकडेवारीने आम्ही थक्क झाल्याशिवाय राहिलो नाही.

ऑपेराहाऊसच्या या विशाल इमारतीत चार रंगमंदिरे (थिएटर्स) धरून एकूण १००० खोल्या आहेत . शिवाय एक रिसेप्शन हॉल, पाच तालमीचे स्टुडियो, चार रेस्टॉरंटस्, सहा मद्यपान केंद्र (Bars) विस्तृत लॉबीज, साठ ड्रेसिंग रुम्स आणि राहण्याच्या खोल्या, नाट्यसंगीत विषयक अद्ययावत् समृद्ध वाचनालय, कलाकारांसाठी विश्रांतीगृहे, 'ग्रीनरूम' नामक कॅन्टिन आणि व्यवस्थापकीय कार्यालये तसेच यंत्रसामुग्रीसाठी भरपूर गोडाऊन्स या सुसज्ज संकुलात सामावलेली आहेत. सुमारे सहा एकर भूखंडावर ऑपेराहाऊसने साडेचार एकर जागा व्यापलेली आहे. सर्व मजले मिळून या इमारतीचे चटईक्षेत्र अकरा एकर आहे. ही इमारत सुमारे ६११ फूट लांब आणि तीनशे ऐंशी फूट रुंद आहे. छतावरील

सर्वात उंच घुमट हा समुद्रसपाटीपासून २२१ फूट उंच आहे. खवलेदार घुमटाकृती छत हे या इमारतीचे वैशिष्ट्य आहे. हे छत २१९४ प्रिकास्ट कॉँक्रीटच्या तुकड्यांनी तयार केले आहे. या प्रत्येक तुकड्याचे वजन १५ टन आहे. आणि हे पर्वतप्राय छत एकत्र बांधण्यासाठी ३५० मैल लांबीची लोखंडी केबल लागली आहे. छतावर १० लाख ५६ हजार टाईल्सचे आच्छादन आहे. या प्रचंड छताचेच नुसते वजन २६,८०० टन आहे. मग संपूर्ण इमारतीचे वजन किती असेल याचा अंदाजच केलेला बरा. पण अंदाज करण्याचीही जरूर नाही. कॅथलीनला सर्व आकडे तोंडपाठ होते. तिने सांगितले की संपूर्ण इमारतीचे वजन १ लाख ५७ हजार आठशे टन आहे. एवढी अवाढव्य वजनाची इमारत उभी कशी आहे ? तर समुद्रतळाखाली ८२ फूट खोल गाडलेल्या ५८० कॉँक्रीटच्या स्तंभांनी ती तोलून धरली आहे आणि आठचौरस फूटांच्या ३२ कॉँक्रीटच्या खांबांवर इमारतीचे अचाट छत आधारलेले आहे. इमारतीच्या आतील आणि बाहेरील भिंती, जिन्यांच्या पायऱ्या आणि फरसबंदी ही गुलाबी ग्रनाईटची आहे. छतावरच्या घुमटांच्या तोंडाशी आणि इमारतीत इतरत्र ६७००० चौरस फूट फ्रेंच ग्लास वापरलेला आहे. ७०० प्रकारच्या आकाराची २००० तावदाने या इमारतीच्या खिडक्यांसाठी वापरलेली आहेत. संपूर्ण ऑपेराहाऊस मध्ये वीजेचे फिटींग करण्यासाठी ४०० मैल लांबीची वीजेची केबल लागली असून १२० वितरण केन्द्रांमधून २५००० लोकवस्तीच्या गावाला लागेल इतकी वीज या इमारतीत पुरविली जाते. संपूर्ण इमारत ही वातानुकूलित असून २६ वातानुकूलित यंत्रकेन्द्रातून (Plants) १२ मैल लांबीच्या पाईपमधून दर मिनिटाला दहालाख क्युबिक फूट हवा सर्वत्र खेळविली जाते.

इतकी अगडबंब माहिती भराभर देऊन देखील कॅथलिनला धाप लागली नव्हती पण वातानुकूलित हवेचे ते प्रचंड प्रमाण ऐकून आमच्या छातीत मात्र नाही म्हटले तरी दडसच भरली आणि क्षणभर श्वास घेणे जरा अवघड गेले. कॅथलीन आमची ती अवस्था ओळखून हलकेसे हसली आणि म्हणाली,

"एनी क्वेश्चन्स प्लीज."

त्याबरोबर आम्ही पुन्हा मोकळेपणे नियमित श्वास घेऊ लागलो.

आणि आम्हाला वाचा फुटली. आम्ही ज्या भव्य कान्सर्ट हॉलमध्ये बसलो होतो त्याचे निरीक्षण बरेचसे केले होते. त्यामुळे त्या कान्सर्ट हॉलसंबंधीच आमची प्रश्नोत्तरे झाली.

प्रश्न : या कान्सर्ट हॉलमध्ये किती लोक बसू शकतात?

उत्तर : हा कान्सर्ट हॉल ऑपेराहाऊसमधील सर्वात मोठा हॉल आहे. येथे २६९० प्रेक्षक बसू शकतात.

प्रश्न : कॉन्सर्ट हॉलचा उपयोग फक्त कॉन्सर्ट म्हणजे संगीत जलशासाठीच केला जातो काय?

उत्तर : नाही. तसं नाही. या हॉलचा उपयोग वृन्दवादन, संगीतसभा, संगीतनाट्य, नृत्यनाट्य, सांघिक गायन, पॉप, जाझ, लोकसंगीत, विविध करमणुकीचे प्रयोग आणि संमेलने अशा विविध कार्यक्रमांसाठी केला जातो.

प्रश्न : या हॉलची एकंदर उंची किती आहे?

उत्तर : हॉलचे छत प्लॅटफॉर्मपासून ८२ फूट उंच आहे.

प्रश्न : संगीतश्रवणासाठी विशेष सोयी इथे काय केल्या आहेत?

उत्तर : या हॉलचे ध्वनिश्रवणतंत्र (acoustic) आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी वाखाणलेले आहे. जगातल्या इतर कुठल्याही हॉलमध्ये इतके उत्कृष्ट आणि पराकोटीचे तरल (Fine) ध्वनिश्रवणतंत्र वापरलेले नाही. हॉलचे छत, वरच्या भिंती या बर्च प्लायवूडच्या आणि खालच्या भिंती, पायऱ्या, स्टेज प्लॅटफॉर्म या कठीण ब्राऊन लाकडाच्या बनवलेल्या आहेत. त्यामुळे स्वर आणि सूर हा अगदी विशुद्ध स्वरूपात ऐकू येतो. तसे या हॉलचे आकारमान आठ लाख ऐंशी हजार क्युबिक फूट असल्याने प्रतिध्वनी उमटण्यास दोन सेकंदापेक्षा जास्त वेळ मिळत नाही. म्हणून वाद्य संगीताचे सूर कमालीचे परिपूर्ण, सघन आणि मुलायम ऐकू येतात. स्टेज प्लॅटफॉर्मच्यावर अठरा अकॉस्टिक रिंग्ज टांगलेल्या आहेत. त्यांना 'ढग (cloud)' म्हटले जाते. या 'ढगांमुळे' संगीतकाराला वाद्याचा ध्वनी पुन्हा प्लॅटफॉर्मकडे परावर्तित करणे सोपे जाते.

कॅथलिन पुन्हा तांत्रिक माहितीच्या जंगलात शिरली. मग तिचे तिलाच उमगले असावे. कारण ती म्हणाली, "या कान्सर्ट हॉलचे नुसते गुणवर्णन करून तुम्हाला त्याचे महत्त्व कळणार नाही. आज रात्री ऑस्ट्रेलियन सिंफनी ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आहे. त्याला तुम्ही या म्हणजे मी जे सांगते त्याचा तुम्हाला प्रत्यय येईल."

"आम्हाला काम्प्लीमेंटरी पासेस मिळतील का?" आमच्यापैकी एकाने थोडा आगाऊपणा केला.

"कॉम्प्लीमेंटस् मिळतील. पण पासेस नाहीत." स्मित हास्य करीत कॅथलिन हॉलच्या बाहेर पडली नि तिच्या मागे आमचे टोळके. इंजिनामागे डबे जावेत तसे.

निरनिराळ्या व्हरांड्यातून जात व जिने उतरत आमची रेलगाडी ज्या ऑपेरा थिएटरमध्ये शिरली, ते कान्सर्ट हॉलपेक्षा बरेच लहान होते. इथे फक्त १५४७ लोक बसण्याची सोय आहे. या थिएटरमध्ये मुख्यत्वेकरून ऑपेरा, बॅले आणि नृत्य यांचे प्रयोग होतात. उत्तम ध्वनिश्रवणासाठी कान्सर्ट हॉलप्रमाणे हे सभागृह देखील लाकडी तावदानांचे (Panels) बनविले आहे. मात्र श्रोत्यांचे लक्ष स्टेजवरच केन्द्रित राहावे म्हणून भिंती आणि छत दाट काळ्या रंगात रंगविलेले आहे. रंगभूमीवरचा पडदा वेलबुट्टीदार असून त्याचे डिझाईन जॉन कोबम या ऑस्ट्रेलियन कलावंताने तयार केले आहे. ऑस्ट्रेलियन लोकरीने हा पडदा फ्रान्समधील अबुस्सन येथील फॅक्टरीत विणण्यात आला आहे. पड्यावरील काहीशा गूढ तेजस्वी आणि भगभगीत रंगामुळे या पड्याला 'सूर्याचा पडदा' (Curtain of the Sun) असे म्हणतात. पड्यामागचा प्रत्यक्ष रंगमंच हा ३८ फूट रुंद, २४ फूट उंच आणि ८२ फूट खोल असल्याचे कॅथलिनने सांगितले तेव्हा आम्हाला नवल वाटले. कारण रंगमंचाचा आकार फारसा मोठा नव्हता. दिसायलासुद्धा तो त्यावेळी रिकामा असूनही लहानच दिसत होता. आम्ही लगेच विचारले,

"बॅले, ऑपेरा किंवा नृत्यनाट्यांना हा रंगमंच पुरतो का? हा तर फारच लहान वाटतो. यापेक्षा अनेक मोठे रंगमंच जगात कदाचित् ठिकठिकाणी असतील."

कॅथलिनने डोळे विस्फारून आमच्याकडे चमकून पाहिले नि मग

काहीसे ओशाळे हसत तिने कबुली दिली.

"बरोबर आहे तुमचे म्हणणे. हा रंगमंच लहान पडतो खरा."

ऑपेरा हाऊसचा रंगमंच आम्हाला अपुरा वाटला. पण पुढे कॅथलिन आम्हाला ड्रामा थिएटर आणि प्लेहाऊस या दोन सभामंडपात घेऊन गेली तेव्हा तर आम्ही थक्कच झालो. कारण तिथले रंगमंच हे जास्तच लहान होते. कदाचित् आपल्याकडच्या मुंबईतल्या आणि पुण्यातल्या रंगमंदिरातील रंगमंचही जास्त मोठे असतील. ड्रामाथिएटरचा रंगमंच हा ५२ फूटांचा चौरस आहे. हा फिरता रंगमंच आहे. त्याचे दोन भाग आहेत. ते दोन्ही भाग एकत्रितपणे किंवा वेगवेगळे फिरू शकतात. या थिएटरात फक्त नाटके किंवा नृत्यनाट्ये यांचे प्रयोग होतात. ऑपेरा थिएटरपेक्षा हे नाट्यगृह खूपच लहान आहे. इथे फक्त ५४४ प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था आहे. याच्या भिंतीदेखील ऑपेराथिएटरप्रमाणेच काळ्या रंगाच्या आहेत. पण याचे छत बुटके असून ते कायमच्या थंड केलेल्या (Refrigerated) ॲल्युमिनियमच्या तावदानांचे आहे. त्यामुळे थंड हवा न खेळवताही तपमान समतोल राहते. इथलाही पडदा ऑपेरा थिएटरप्रमाणेच जॉन कोबमने तयार केला आहे. पण तो गडद रंगात असून 'चन्द्राचा पडदा' (Curtain of the Moon) म्हणून ओळखला जातो. प्लेहाऊस हे तर अगदीच लहान थिएटर असून फक्त ३९८ प्रेक्षकांसाठी इथे खुर्च्या आहेत. इंटिमेट थिएटर म्हणून नाट्यप्रयोगांसाठी ते वापरले जाते. तसेच येथे भाषणे, चर्चासत्रे, परिसंवाद वगैरे कार्यक्रमही होतात. खरे म्हणजे, सर्वात मोठ्या कान्सर्ट हॉलपासून सुरूवात करून कॅथलिनने आम्हाला शेवटी सर्वात छोट्या प्लेहाऊसचा परिचय करून दिला होता. तिने जर उलट प्रवास केला असता तर कदाचित् आमच्यावर आरंभी झालेला भव्यतेचा आणि सौंदर्याचा परिणाम लगोलग पुसट होत गेला नसता. शेवटी तिने हसतमुखाने तळमजल्यावरच्या लांबलचक प्रशस्त व्हरांड्यात आमचा निरोप घेतला. पण त्यापूर्वी नेहमीप्रमाणे तिने विचारले,

"Any questions gentlemen ?"

त्या जगड्व्याळ वास्तूचा फेरफटका करताना अनेक प्रश्न आमच्या मनात खदखदत होतेच. पूर्वी एकदा प्रश्नोत्तरांची तालिम झालेली होती. त्यावरून कॅथलिन ही कसलाही आडपडदा न ठेवता मोकळेपणे उत्तरे

देणारी बाई होती, हे आम्हाला कळले होते. त्यामुळे आमच्या मनातल्या उरल्यासुरल्या शंका आम्ही लगोलग विचारून टाकल्या.

प्रश्न : या ऑपेराहाऊसमध्ये वर्षाला किती प्रयोग होतात?

उत्तर : सगळ्या प्रकारचे मिळून वर्षाला सुमारे ३००० कार्यक्रम होतात. आणि वर्षातील श्रोत्यांची एकूण साधारण संख्या सुमारे वीस लाख असते.

प्रश्न : अशा 'गाइडेड टूर'ला म्हणजे हे ऑपेराहाऊस पाहण्यासाठी किती लोक येतात?

उत्तर : वर्षातून सुमारे दोन लाख लोक हे संकुल पाहायला येतात. म्हणजे दिवसाला जवळजवळ साडेपाचशे लोक.

प्रश्न : हे ऑपेराहाऊस सरकारी पुढाकाराने बांधण्यात आले. मग याची व्यवस्था सरकार पाहते काय?

उत्तर : नाही. या संपूर्ण ऑपेराहाऊसची व्यवस्था सिडने ऑपेराहाऊस ट्रस्टकडे आहे. जनरल मॅनेजर हा या ट्रस्टचा प्रमुख आहे. त्याच्या हाताखाली ३०० कायमचे आणि २०० तात्पुरते असे पाचशे कर्मचारी आहेत.

प्रश्न : याला 'ऑपेराहाऊस' असे नाव आहे. पण इथे तर अनेक प्रकारचे नाट्यप्रयोग होतात. मग हे नाव बरोबर आहे काय?

उत्तर : (खळखळून हसत दिलेले) हो बरोबर विचारलंत तुम्ही. 'ऑपेराहाऊस' हे नाव चुकीचे आहे. इटस् अ मिसनॉमर. पण सुरुवातीपासून जे नाव चिकटले ते चिकटलेच. जगात हे 'ऑपेराहाऊस' म्हणून प्रसिद्ध असल्याने ते नाव आता बदलणे अशक्य आहे.

प्रश्न : ह्या 'ऑपेराहाऊस' मध्ये वर्षभर कार्यक्रम होतात. मग हे फायद्यात चालते की तोट्यात?

उत्तर : (तत्परतेने दिलेले) अर्थात्च तोट्यात. जगात असे कुठलेही कलासंकुल नाही की जे फायद्यात चालते. जिथे व्यापार चालतो तिथे फायद्याची शक्यता असते. हे ऑपेराहाऊस चालविण्यासाठी आणि त्याच्या व्यवस्थेसाठी लागणारा खर्च

उत्पन्नातून फक्त निम्मा भागतो. उरलेल्या अर्ध्या खर्चापैकी ३० टक्के अनुदान सरकार देते. त्याशिवाय २० टक्के रक्कम इकडून तिकडून गोळा करावी लागते.

**प्रश्न :** म्हणजे मग हे ऑपेराहाऊस तुम्ही कलाबाह्य कार्यक्रमांसाठीही वापरायला देता का?

**उत्तर :** द्यावेच लागते. इथल्या थिएटर्समध्ये जे नाट्यसंगीतादी कार्यक्रम होतात त्याचे आम्ही भाडे आकारतो. शिवाय तिकीट विक्रीच्या १२ टक्के रकम आम्ही घेतो. त्यातून खर्च भागत नाही. मग आम्ही सभा, संमेलने, परिषदा, समारंभ यासाठी थिएटर्स भाड्याने देतो. त्यासाठी तासांवर भाडे आकारतो.

**प्रश्न :** (हसत विचारलेला) लग्न समारंभासाठी ऑपेराहाऊस भाड्याने देता काय ?

**उत्तर :** लग्न समारंभासाठी थिएटर्स भाड्याने देत नसलो तरी कान्सर्ट हॉल किंवा ऑपेराहाऊस या शेजारची जी प्रचंड मोकळी जागा (Foyer) तुम्ही पाहिली ती आम्ही भाड्याने देतो. या जागेतून सिडने हार्बरचा नयनरम्य देखावा दिसतो. ही जागा आणि रिसेप्शन हॉल लग्न समारंभ, स्वागत समारंभ, जेवणावळी, मेजवान्या, पार्ट्या, डिनर्स अशा विविध प्रकारच्या कलाबाह्य कार्यक्रमाकरिता भाड्याने देण्यात येते. त्यासाठी २००० ते १२००० ऑस्ट्रेलियन डॉलर्स इतके भाडे आकारण्यात येते. त्यातून आम्हाला बरेचसे उत्पन्न मिळते.

**प्रश्न :** आमच्याकडे साधी साहित्यसंस्थांची सभागृहे लग्न समारंभासाठी दिली तरी ओरड होते. तुमच्याकडे तशी टीका होत नाही का?

**उत्तर :** होते ना. पण इलाजच नाही. उत्पन्न तर मिळवायला हवे. त्याशिवाय हे ऑपेराहाऊस चालणार कसे? नृत्य, संगीत, नाटकादी कलांचे प्रयोग इथे होणार कसे? कॅथलिनने आम्हाला उलट प्रश्न विचारायला सुरूवात केली होती. तेव्हा प्रश्नोत्तरे संपल्याची ती एकप्रकारे सूचनाच होती. पण एक

देणारी बाई होती, हे आम्हाला कळले होते. त्यामुळे आमच्या मनातल्या उरल्यासुरल्या शंका आम्ही लगोलग विचारून टाकल्या.

प्रश्न : या ऑपेराहाऊसमध्ये वर्षाला किती प्रयोग होतात?

उत्तर : सगळ्या प्रकारचे मिळून वर्षाला सुमारे ३००० कार्यक्रम होतात. आणि वर्षातील श्रोत्यांची एकूण साधारण संख्या सुमारे वीस लाख असते.

प्रश्न : अशा 'गाइडेड टूर'ला म्हणजे हे ऑपेराहाऊस पाहण्यासाठी किती लोक येतात?

उत्तर : वर्षातून सुमारे दोन लाख लोक हे संकुल पाहायला येतात. म्हणजे दिवसाला जवळजवळ साडेपाचशे लोक.

प्रश्न : हे ऑपेराहाऊस सरकारी पुढाकाराने बांधण्यात आले. मग याची व्यवस्था सरकार पाहते काय?

उत्तर : नाही. या संपूर्ण ऑपेराहाऊसची व्यवस्था सिडने ऑपेराहाऊस ट्रस्टकडे आहे. जनरल मॅनेजर हा या ट्रस्टचा प्रमुख आहे. त्याच्या हाताखाली ३०० कायमचे आणि २०० तात्पुरते असे पाचशे कर्मचारी आहेत.

प्रश्न : याला 'ऑपेराहाऊस' असे नाव आहे. पण इथे तर अनेक प्रकारचे नाट्यप्रयोग होतात. मग हे नाव बरोबर आहे काय?

उत्तर : (खळखळून हसत दिलेले) हो बरोबर विचारलंत तुम्ही. 'ऑपेराहाऊस' हे नाव चुकीचे आहे. इटस् अ मिसनॉमर. पण सुरुवातीपासून जे नाव चिकटले ते चिकटलेच. जगात हे 'ऑपेराहाऊस' म्हणून प्रसिद्ध असल्याने ते नाव आता बदलणे अशक्य आहे.

प्रश्न : ह्या 'ऑपेराहाऊस' मध्ये वर्षभर कार्यक्रम होतात. मग हे फायद्यात चालते की तोट्यात?

उत्तर : (तत्परतेने दिलेले) अर्थात्च तोट्यात. जगात असे कुठलेही कलासंकुल नाही की जे फायद्यात चालते. जिथे व्यापार चालतो तिथे फायद्याची शक्यता असते. हे ऑपेराहाऊस चालविण्यासाठी आणि त्याच्या व्यवस्थेसाठी लागणारा खर्च

उत्पन्नातून फक्त निम्मा भागतो. उरलेल्या अर्ध्या खर्चापैकी ३० टक्के अनुदान सरकार देते. त्याशिवाय २० टक्के रक्कम इकडून तिकडून गोळा करावी लागते.

**प्रश्न :** म्हणजे मग हे ऑपेराहाऊस तुम्ही कलाबाह्य कार्यक्रमांसाठीही वापरायला देता का?

**उत्तर :** द्यावेच लागते. इथल्या थिएटर्समध्ये जे नाट्यसंगीतादी कार्यक्रम होतात त्याचे आम्ही भाडे आकारतो. शिवाय तिकीट विक्रीच्या १२ टक्के रकम आम्ही घेतो. त्यातून खर्च भागत नाही. मग आम्ही सभा, संमेलने, परिषदा, समारंभ यासाठी थिएटर्स भाड्याने देतो. त्यासाठी तासांवर भाडे आकारतो.

**प्रश्न :** (हसत विचारलेला) लग्न समारंभासाठी ऑपेराहाऊस भाड्याने देता काय ?

**उत्तर :** लग्न समारंभासाठी थिएटर्स भाड्याने देत नसलो तरी कान्सर्ट हॉल किंवा ऑपेराहाऊस या शेजारची जी प्रचंड मोकळी जागा (Foyer) तुम्ही पाहिली ती आम्ही भाड्याने देतो. या जागेतून सिडने हार्बरचा नयनरम्य देखावा दिसतो. ही जागा आणि रिसेप्शन हॉल लग्न समारंभ, स्वागत समारंभ, जेवणावळी, मेजवान्या, पार्ट्या, डिनर्स अशा विविध प्रकारच्या कलाबाह्य कार्यक्रमाकरिता भाड्याने देण्यात येते. त्यासाठी २००० ते १२००० ऑस्ट्रेलियन डॉलर्स इतके भाडे आकारण्यात येते. त्यातून आम्हाला बरेचसे उत्पन्न मिळते.

**प्रश्न :** आमच्याकडे साधी साहित्यसंस्थांची सभागृहे लग्न समारंभासाठी दिली तरी ओरड होते. तुमच्याकडे तशी टीका होत नाही का?

**उत्तर :** होते ना. पण इलाजच नाही. उत्पन्न तर मिळवायला हवे. त्याशिवाय हे ऑपेराहाऊस चालणार कसे? नृत्य, संगीत, नाटकादी कलांचे प्रयोग इथे होणार कसे? कॅथलिनने आम्हाला उलट प्रश्न विचारायला सुरूवात केली होती. तेव्हा प्रश्नोत्तरे संपल्याची ती एकप्रकारे सूचनाच होती. पण एक

शंका अद्याप डोक्यात वळवळत होती. ती एकदाची विचारून टाकावी म्हणून कॅथलिन जायला वळली तसे तिला गाठले.

"शेवटचाच प्रश्न आहे."

"येस? गो अहेड."

"या इमारतीच्या छतावर घुमटाकार पांढरे शुभ्र खवले उभारले आहेत. त्यामुळे थिएटरात होणाऱ्या प्रयोगांवर काही चांगला परिणाम होतो काय?"

"छे. छे. त्या व्हॉल्टस्चा आत होणाऱ्या प्रयोगांशी काहीच संबंध नाही."

"मग ते टोकदार घुमट का बनविले आहेत?"

"ते एक डिझाईन आहे."

"असले विचित्र आणि बटबटीत डिझाईन इतका प्रचंड खर्च करून का उभारले?"

"ते तुम्ही आर्किटेक्टला विचारायला हवे. ओ के?" खांदे उडवून मंद स्मित करीत कॅथलिन नाटकातल्या पात्रासारखी गुप्त झाली. फक्त नाटकातले पात्र विंगमध्ये जाते. ही जमिनीतल्या जिन्यातून तळघरात लुप्त झाली.

कॅथलिनने आर्किटेक्टला विचारा असे म्हटले. पण आर्किटेक्ट उटझन याने पृथ्वीतळाचा केव्हाच निरोप घेतला होता. त्यामुळे मनातली शंका मनातच राहणार होती. कायमची. पण त्याची फारशी खंत न करता आम्ही बाहेर पडलो. आत फोटो घेण्यास बंदी असल्याने कॅमेरे सरसावले आणि ऑपेराहाऊसचे ते विशाल वास्तुशिल्प कॅमेऱ्यात बंदिस्त केले. कायमचे.

■

# जेनॉलनची पाताळनगरी

आदले दिवशी पाहिलेले सिडने ऑपेराहाऊस हा जमिनीवरचा मानवनिर्मित चमत्कार आहे तर दुसऱ्या दिवशी ज्या जेनॉलन गुहांना भेट दिली त्या गुहा जमिनीखालचे निसर्गनिर्मित आश्चर्य आहे. सिडनेच्या पश्चिमेला सुमारे १३० किलोमीटर्सवर ब्लूमाऊंटन ही निसर्गरम्य पर्वतराजी आहे. या पर्वताच्या दक्षिणेकडील डोंगररांगेत पन्नास किलोमीटर्सवर असलेल्या जेनॉलन केव्हज या अद्भुत गुहा म्हणजे जगभरच्या हजारो प्रवाशांना स्तिमित करणारे अनोखे पर्यटनस्थळ आहे.

जेनॉलन गुहा सिडनीच्या पश्चिमेला एकशेऐंशी किलोमीटर्स म्हणजे सुमारे ११० मैलांवर आहेत. सिडनीहून रेल्वेने गेल्यास कटुंबा या स्टेशनवर उतरले की तिथून बस किंवा टॅक्सीने जेनॉलनला जाता येते. पण त्यापेक्षा सरळ सोपा मार्ग म्हणजे बसचा. सिडनेहून बसने ब्लू माऊंटन पार करून पलीकडे हार्टले या गावी उतरले की तेथून जेनॉलन गुहा या दक्षिणेला फक्त २५ मैलांवर आहेत. सिडनीहून बसने जेनॉलनला जाण्यास तीन तास लागतात. प्रथम रेल्वेने जायचा आमचा विचार होता. कारण ऑस्ट्रेलियन रेल्वेच्या प्रवासाचा अनुभव गाठी बांधता आला असता. पण

त्याला वेळ अधिक लागला असता आणि शिवाय कटुंबाला उतरून पुन्हा बस पकडण्याची दगदग होतीच. सर्वानुमते अनुभवापेक्षा आरामाला अग्रक्रम देण्यात आला. वातानुकूलीत प्रशस्त बसही आमच्या दिमतीला होती. म्हणून आम्ही बसचा सुखद प्रवास पसंत केला. गुहांमध्ये पराकोटीचा गारठा असतो म्हणून स्वेटर, मफलर वगैरे घेऊन जाण्याची सूचना आम्हाला मिळाली होती. त्यानुसार गरम कपड्यांनी सज्ज होऊन आम्ही बसने निघालो.

सिडनीहून प्रस्थान केल्यानंतर सुमारे दोन तासातच आम्ही रेल्वेरुळांच्या संगतीने ब्लू माऊंटनच्या पर्वतरांगामध्ये प्रवेश केला. मध्येमध्ये छोटी छोटी सुबक स्टेशने दिसली. एकदा पांढरी चकचकीत टुमदार रुपेरी आगगाडीही आमच्या रस्त्याशेजारून डौलात निघून गेली. ब्लू माऊंटनचा डोंगराळ प्रदेश महाबळेश्वर सदृश आहे. पण महाबळेश्वरच्या मानाने हा पर्वत फारच ठेंगणा आहे. उंची जेमतेम हजार फूट. कमीच असेल पण जास्त नाही. जाताना ब्लूमाऊंटनमधील थ्री सिस्टर्स आणि एको पॉईंट या सारख्या प्रेक्षणीय ठिकाणी आम्ही थांबलो. थ्री सिस्टर्स म्हणजे पर्वताची वर आकाशात घुसलेली तीन टोके. ऑर्थरसीटची आठवण करून देणारे दृश्य इथून दिसते. पण फक्त आठवणच. ऑर्थरसीटवर अंगावर उठणारे रोमांच इथे जाणवत नाहीत. नि खाली पाहताच डोळेही गरगरत नाहीत. पण धुक्यात लपेटलेल्या निळसर डोंगरदऱ्यांचे आल्हादक दृश्य ब्लूमाऊंटन हे नाव सार्थ करणारे आहे.

ब्लूमाऊंटन पर्वतश्रेणी ओलांडताना आमची बस घाटात वळसे घेऊ लागली. रस्ता विस्तृत आणि नितळ. त्यामुळे वळणे असली तर बसला हिसके अजिबात बसत नव्हते. दोन तीन घाट चढून उतरलो. पण हे घाट अगदीच मवाळ होते. आपल्याकडच्या खंडाळा किंवा कसारा घाटांची सर त्या घाटांना नाही. वाहनांची रहदारी असली तरी तिची तुलना खंडाळ्याच्या घाटातील घेघेमारीशी होणे शक्यच नाही. सपाट आडमाप रस्ता रहदारीला पुरून उरणारा होता. त्यामुळे वाटेत ओव्हरटेकींगसाठी हॉर्नचा गोंगाट, ट्रॅफिक जॅम, मोडतोड, अपघात वगैरे आपल्याकडचे नेहमीचे प्रकार कुठेच नाहीत. सगळा प्रवास कसा स्वस्थ, शांत नि आरामात. पोटातले पाणी सुद्धा हलत नव्हते. शिवाय डोंगरांवरील गर्द वनश्री डोळ्यांचे पारणे

फेडीत होती. त्यामुळे हार्टले, हॅम्पटन ही छोटी मोठी सुबक गावे मागे टाकून जेनॉलनला केव्हा पोचलो हे कळले सुद्धा नाही.

बसमधून उतरल्यावर पाहिले तर चोहोबाजूंना घनदाट झाडीने लदबदलेल्या पर्वतांचा वेढा. पायथ्याशी जेनॉलन केव्हज रिझर्व ट्रस्टची आणि टुरिस्ट सेंटरची कचेरी, रेस्टॉरंट, टॉयलेटस्, विश्रांतीगृहे, कारपार्क या सर्व सोयी. पर्वत रांगांवरच्या झाडीत निमूळत्या पायवाटांचे पट्टे उमटलेले. पण आम्हाला पर्वत चढायचा नव्हताच. आम्हाला जायचे होते पर्वताच्या पोटात थेट खाली. शेकडो फूट. जवळजवळ पाताळात. समोरच डोंगरात भव्य कमान होती. खडबडीत, वेडीवाकडी, नैसर्गिक पण प्रचंड. या कमानीला 'ग्रँड आर्क' असे नाव आहे. या 'ग्रँड आर्क' मध्येच आम्हाला जाऊन थांबायचे होते. कारण तिथून आमची जेनॉलन गुहांची 'गाईडेड टूर' दुपारी दोन वाजता सुरू होणार होती. ग्रँड आर्कमध्ये पोचताच गारवा जाणवू लागला. आम्ही लगेच स्वेटर्स, मफलर इत्यादी संरक्षक कवचकुंडले अंगावर चढविली. आमच्यासारखीच आणखी बरीच प्रवासी मंडळी ग्रँडआर्कमध्ये जमा झाली होती. त्यात ताडमाड लालबुंद निळ्याघाऱ्या डोळ्यांचे अमेरिकन होते, चपट्या नाकाचे बुटके मिचमिच्या डोळ्यांचे चिनी जपानी होते, काळेकभिन्न आडदांड आफ्रिकन निग्रो होते. गोरे भुरके नाजूक फ्रेंच होते. मुर्दाड चेहऱ्याचे उग्र राकट रशियन्स होते. चित्रविचित्र रंगरूपाच्या, भिन्नभिन्न देशभाषांच्या तीस चाळीस स्त्री पुरुषांचा तो आंतरराष्ट्रीय समूह कुठल्या तरी अज्ञात योगायोगाने तिथे त्या परक्या पहाडाच्या विशाल छताखाली एकत्र झाला होता आणि अनोळखी ऑस्ट्रेलियन मार्गदर्शकाची वाट पाहत ताटकळत होता.

'ग्रँड आर्क' च्या सुरुवातीला 'जेनॉलन केव्ह' ची थोडक्यात माहिती देणारा फलक लावलेला आहे. ओरिएन्ट केव्ह, टेंपल केव्ह, रिव्हर केव्ह, ज्युबिली केव्ह, सरबेरस केव्ह, रिबन केव्ह, ल्युकस केव्ह, चीफले केव्ह आणि इंपीरीयल केव्ह अशा एकंदर नऊ गुहांचा गट 'जेनॉलन केव्हज' या नावाने ओळखला जातो. या गुहा कमी अधिक लांबीच्या असून त्यांचा शोध वेगवेगळ्या संशोधकांनी १८६० ते १९०४ या कालखंडात लावलेला आहे. या नऊच्या नऊ गुहा हिंडून पाहायच्या म्हणजे सातआठ दिवस इथे मुक्कामच करणे प्राप्त आहे. कारण या

सगळ्या गुहा सावकाश व सलग पाहायच्या झाल्या तर किमान वीस तास लागतील. गुहांमध्ये खूप चढउतार करीत चालावे लागते. सर्व गुहांमध्ये मिळून एकूण ५४२८ पायऱ्या आहेत. त्या सर्व उतरून परत चढाव्या लागतात. या गुहा म्हणजे घुशींनी पोखरलेल्या प्रचंड बिळांसारखी जमिनीच्या उदरातील लांबलचक, ओबडधोबड भुयारेच आहेत. त्यामधून फेरफटका करायचा तर एकूण ७९०० मीटर म्हणजेच जवळजवळ ८ किलोमीटर किंवा ५ मैल पायपीट करावी लागते. ती सुद्धा काही ठिकाणी केवळ एकच माणूस एकावेळी जाऊ शकेल इतक्या निरुंद आणि अंधाऱ्या बोळकांडातून. ल्युकस, ज्युबिली, सरबेरस, चीफले, ओरिएंट वगैरे गुहांमधला मार्ग हा बराच अडचणीचा आणि कठीण आहे तर रिव्हर नामक गुहेमधली वाट ही अतिशय कष्टदायक आणि खडतर आहे. त्यातल्या त्यात इंम्पीरियल गुहेतला मार्ग हा सर्व वयाच्या आणि प्रकृतीच्या व्यक्तींना फिरण्यासाठी सोपा आणि सुलभ आहे. बहुतेक प्रवाशांना चालण्याचे परिश्रम कमीत कमी व्हावे अशी इच्छा असते आणि केव्हजची सहल आटोपून संध्याकाळी सिडनीला मुक्कामाला परतायचे असते. त्यामुळे जेनॉलनला मुक्काम करून सगळ्या गुहा पाहण्याच्या फंदात फारसे कोणी पडत नाही. आमचीही तीच कथा होती. शिवाय इंपिरीयल ही अतिशय प्रेक्षणीय गुहा आहे. तिचे दुसरे नाव 'स्फटिकाची नगरी' असे आहे. तेव्हा ती गुहा अवश्य पाहा, अशी सूचना आम्हाला मिळाली होती. म्हणून आम्ही फक्त इंपिरियल ही गुहा पाहण्यासाठी मार्गदर्शकाच्या प्रतीक्षेत ग्रँड आर्कमध्ये गुहेच्या चिमुकल्या पण कडेकोट बंद तोंडाशी उभे होतो. नुसती गुहा हिंडून पाहायची तर त्यासाठी मार्गदर्शक कशाला, अशी शंका मनात तरळून गेली. पण तिचे निरसन लगेच तिथेच एका पूर्वानुभव असलेल्या सोबत्याने केले की गुहेमध्ये काही ठिकाणी विलक्षण भुलभुलैय्या आणि चकवे आहेत. मार्गदर्शकाशिवाय कोणी आत गेला तर तो आतल्या आतच गडप होणार. अलिबाबाच्या गुहेतील कासमसारखा त्याला बाहेर येण्याचा मार्ग सापडणे अशक्यप्राय आहे. म्हणून प्रत्येक गुहेच्या छोट्या प्रवेशद्वारावर लोखंडी दरवाजे असून त्यांना भक्कम कुलपे ठोकलेली आहेत. शिवाय मार्गदर्शकाशिवाय प्रवेश नाही असा इशारा देणाऱ्या पाट्या आहेतच. त्यामुळे मार्गदर्शकाची वाट पाहणे भागच होते. पण आम्हाला फारसे

तिष्ठत राहावे लागले नाही. बरोबर दोन वाजता ग्रँड आर्कमध्ये मार्गदर्शक महाराजांची स्वारी तुरुतुरू चालत प्रकट झाली.

बदामी रंगाचा सूट आणि रक्तवर्ण टाय घातलेला हा थोडासा स्थूल मध्यमवयीन गृहस्थ निळसर मिस्कील डोळ्यांचा आणि शास्त्रज्ञासारख्या व्यग्र नि विचारमग्न चेहऱ्याचा होता. हनुवटीवरची टोकदार पिंगट दाढी नि डोक्यावरचे काहीसे अस्ताव्यस्त करडे केस यामुळे एखाद्या व्यासंगी संशोधकाच्या भूमिकेत तो शोभून दिसला असता. त्याची बोलण्याची धाटणीही मंत्रघोषासारखी संथ, आणि भारदस्त होती. त्याची चालण्याची ढब मात्र एखाद्या रिंगमास्टरसारखी लगबगीची नि चपळ होती. रिंगमास्तर जसा मध्येच एकदम चाबकाचा फटकारा जमिनीवर आपटतो तसे गंभीरपणे बोलता बोलता अचानक शब्दांचे सपकारे मारून ऐकणाऱ्याला स्तिमित करण्याची त्याची लकब होती. आल्या आल्या त्याने "हॅलो फोक्स, माय नेम इज जॉन कीटींग, आय ॲम युवर गाईड टू इंपिरीयल केव्ह. नो रिलेशन टू प्राईममिनिस्टर कीटींग प्लीज. शो मी युवर टिकटस् विल यू?" असे स्वतःशीच बोलल्यासारखे पुटपुटत त्याने आमची तिकीटे पाहायला सुरुवात केली. इंपिरियल गुहेत एका वेळी चाळीस लोकांनाच जाण्याची परवानगी होती. तिकीटे पाहताना जॉन वन्, टू, थ्री, फोर अशी आमची गणती करत होता. मध्येच तो एकदम निर्विकारपणे म्हणाला, "दोज विदाऊट तिकेटस् कॅन कम इनसाईड बट विल नॉट बी अलौड टू कम आऊट."

तिकीटे तपासून झाल्यावर आम्ही चाळीसजण चाळीस चोरांसारखे गुहेच्या दाराशी जमलो. जॉनने चोरांच्या सरदारासारखे खिशातल्या किल्लीने गुहेचे लोखंडी दार उघडले. आम्ही आतमध्ये आल्यावर कुलूप लावून बंद केले. किल्ली खिशात टाकत त्याने बटन दाबले. तशी आतमधल्या मिट्ट अंधारावर उजेडाची अंधुक छाया पसरली. आणि पाठोपाठ जॉनचा ढाला आवाज उमटला.

"आपण आता इंपिरीयल गुहेत प्रवेश केला आहे, ही गुहा १८७९ साली जे. विल्सन या भूगर्भवेत्त्याने शोधून काढली. या जेनॉलन गुहांच्या समुहातील ही सर्वात भव्य आणि सुंदर गुहा आहे. हिची लांबी जमिनीच्या पोटात १०७० मीटर म्हणजे १ किलोमीटर पेक्षा थोडी जास्तच आहे.

चालण्याच्या मार्गात ३५८ पायऱ्या तुम्हाला चढून उतराव्या लागतील. ही सर्व गुहा हिंडून पाहायला आपल्याला दीडतास लागेल. ही गुहा लांब असून जाण्याचा मार्ग हा बोगद्यासारखा नि चिंचोळा आहे. मार्गाच्या दोन्ही बाजूंना कधी कधी विहिरीसारख्या खोल घळी आहेत. त्यात पाणी असण्याची शक्यता आहे. कुणी चालताना जर या विहिरीत पडलाच तर उगाच आरडाओरडा करून इतरांना घाबरावयाचे नाही. खाली पाणी असलेच तर पोहण्याचा प्रयत्न करायचा. तिथे पोहण्यास बंदी नाही. आणखी एक सूचना. वाटेत खडकांचे वाकडे तिकडे टोकदार सुळके एकदम आत घुसलेले आहेत. त्यांना धडकून हात पाय डोके जखमी झाले तर फर्स्ट एडची सुविधा इथे गुहेत उपलब्ध नाही."

इतके बोलून जॉन झरझर पुढे चालू लागला. अपुऱ्या उजेडात फारसे काही दिसत नव्हते. फक्त समोरची अरुंद वाट तेवढी ओळखता येत होती. खाली, वर आणि दोन्ही बाजूंना केवळ अंधार होता. जॉनचे ठाशीव, यांत्रिक बोलणे ऐकू येत होते. त्याच्या शब्दांच्या आधाराने नि रोखाने आम्ही त्याच्या पावलावर पाऊल टाकून जात होतो. मेंढपाळा मागे मेंढ्या जाव्या तसे एका मागून एक, आंधळेपणे पण शिस्तीत. जॉन सांगत होता,

"ही गुहा किंवा या सर्वच गुहा हा निसर्गाचा एक चमत्कार आहे. कशा निर्माण झाल्या या गुहा? निसर्गाच्या अद्‌भुत प्रक्रियेमुळे या गुहा निर्माण झाल्या आहेत. जमिनीवर साचलेले पावसाचे पाणी वातावरणातून आणि कुजलेल्या वनस्पतीमधून कार्बन-डाय-ऑक्साईड ($Co_2$) शोषून घेते त्यामुळे ते आक्रमक बनते. जमीनीखालच्या पाण्याच्या थरातून ते भूगर्भातील चुनखडी पर्यन्त पोचते आणि आम्लप्रक्रियेमुळे तेथे पोकळी निर्माण होऊन तिला गुहेसारखा आकार प्राप्त होतो. इतकेच नव्हे तर गुहेतल्या पोकळीत पोचताच कार्बन-डाय-ऑक्साईड बाहेर पडतो त्यामुळे द्रवातील कॅल्शियम हा घनरूप होऊन कल्साईट या खनिजस्वरुपात प्रकटतो. इतरही विविधप्रकारची भूगर्भातील खनिजे त्यांच्यामधील स्फटिकांच्या घनतेनुसार आणि शुद्धतेनुसार निरनिराळे रंग नि आकार धारण करतात आणि गुहेला विलक्षण रंगभरे चित्रदर्शी रूप देतात."

बोलता बोलता जॉनने स्वीचबोर्डचे बटन दाबले तशी एकदम जादू

झाली. त्या अंधारात दोन्ही बाजूला झगमगता प्रचंड देखावा उभा झाला.

"द गोल्डन पॅलेस" जॉन उद्गारला.

आमचा डोळ्यांवर विश्वासच बसेना. खरोखर आम्ही एका संगमरवराच्या रत्नखचित् सोनेरी राजवाड्यात उभे आहोत, असा आम्हाला भास झाला. फक्त तो राजवाडा असलाच तर कोणातरी जादूनगरीतील पाताळयंत्री जादुगाराचा होता. कारण त्यात मानवी संस्कृतीचा कुठे मागमूसही नव्हता. तेथे अनेक रंगरूपांचे विविध तेजस्वी आकार दिसत होते. पण त्यातला एकही मानवी किंवा मानवाशी संबंधित नव्हता. निसर्गाच्या रासायनिक प्रक्रियेमुळे भूगर्भातील चुनखडीच्या स्फटिकशुभ्र प्रस्तरांना ते कातीव, घोटीव, कोरीव बहुरंगी आकार लाभले होते. त्या आकारांना अर्थ नव्हता. पण त्यात एक नैसर्गिक सुसंगती होती. सुसंगतीतून सौंदर्य निर्माण होते. त्यामुळे ते अनाकलनीय अचाट आकार सुंदर दिसत होते. वरचे खडबडीत छत, वेडेवाकडे ओघळलेले स्तंभ, ओबडधोबड भिंती आणि खाचखळग्यांची जमीन सारे काही पिंगट, शुभ्र, हिरव्या, निळ्या, केशरी रंगांनी झळाळत होते. त्या राजवाड्यात वीज अशा चतुराईने खेळवलेली होती आणि योग्य ठिकाणी लपलेले दिवे अशा कल्पकतेने लावलेले होते की एक बटन दाबताच सर्वत्र चकचकाट होऊन सारा राजवाडा लख्ख उजळून निघत होता. या राजवाड्यातच नव्हे तर गुहेत सर्वत्रच वीजेचे वायरींग अतिशय कौशल्याने केलेले होते. वायरींग डोळ्यांना फारसे कुठे दिसत नव्हते तसेच बल्बही कुठे नजरेला खटकत नव्हते. दिसत होता तो एकतर अंधार किंवा स्फटिकधवल उजेड. अंतराअंतरावर जिथे दृश्य पाहायचे होते तिथे आडबाजूला खबदडीत छोटे लाकडी स्वीचबोर्ड लावलेले होते. जॉनने स्वीचचे बटन दाबले की एकाएकी प्रकाशाचा ढग उसळत होता. तोही पठ्ठ्या असे अचानक नि नकळत बटन दाबायचा की सभोवतालच्या अंधाराचा एकदम उजेड होऊन नजर दचकत होती.

जॉन जितक्या झपाझप वेगाने चालत होता तितकाच सावकाश रमतगमत बोलत होता. हे त्याला कसे जमत होते ते तोच जाणे. त्याचे बोलणे व तो देत असलेली भूगर्भाची क्लिष्ट माहिती आम्हाला समजावी म्हणून तो कदाचित् संथ बोलत असावा आणि वेळेच्या आत ही टूर

संपविण्यासाठी तो भराभर चालत असावा, असा कयास आम्ही केला. पण दोन्ही परस्पर विसंगत गोष्टी तो एकाच वेळी करत होता. आम्ही मात्र फक्त त्याच्यामागे चालण्याचा अभ्यास करत होतो. त्याच्या बोलण्याकडे आमचे विशेष लक्ष नव्हते. कारण गुहेतले दृश्य दाखविले की त्यातील कुठली आकृती नि कुठला रंग कोणत्या रासायनिक क्रियेमुळे निर्माण झाला याचा शास्त्रीय खुलासा तो करीत होता. त्यातले आम्हा कोणाला फारसे काही समजत नव्हते. पण तो स्वतः मात्र आम्हाला अधिकाधिक शास्त्रज्ञासारखा भासू लागला.

"बी वेअर, एलफन्टस् आर कमिंग." जॉनने स्वीचचे बटन दावले नि अकस्मात् आरोळी ठोकली.

आम्ही सारे गोठल्यासारखे जागच्या जागी थवकलो. एलफन्टस्? हत्ती? इथे? या भूविवरातल्या गुहेत? जमिनीच्या शेकडो फूट खाली? पृथ्वीच्या अंतरंगात? आम्हाला प्रथम काहीच कळेना. समोर नुसता अंधार दिसला. उजेड होता वर. आमच्या डोक्याच्या वर. तिथे सफेद प्रस्तराचा सवंध आडवा कडा गुलावी चमकत होता. त्या शिलाखंडावर सोंड, गंडस्थल नि पाय यांचे असंख्य आकार एका मागे एक असे रांगेने उमटलेले होते. कित्येक हत्तींची झुंड धावत अंगावर येते आहे असे विशाल आडवे रेखाचित्र तिथे आपोआप तयार झाले होते. खालच्या बाजूने कडा तुटला होता. त्यामुळे खाली सगळा अंधार होता. उजेडाच्या किमयेमुळे हत्तींचा तो कळप धावतो आहे असा आभास निर्माण झाला होता. वर्षानुवर्षे भूमीत झिरपलेले पाणी ओघळून झालेल्या प्रक्रियेमुळे त्या प्रस्तरावर हत्तींच्या अवयवांची नक्षी उमटली होती. निसर्गाने आपल्या जलहस्ताने अजाणता खोदलेले ते अमिट हस्तीदंती लेणे होते. त्या चुनखडीच्या प्रस्तरावरून पाण्याचे दाट थेंब जॉनने ओघळताना दाखविले. म्हणजे अनादि काळापासून निसर्गाने सुरू केलेली त्या अनघड शिल्पाकृतीची कलाकुसर अजून चालूच होती. नि कदाचित् अनंत काळपर्यन्त चालूच राहणार होती.

आम्ही सगळे स्तंभित होऊन तो अधांतरी लटकलेला शिल्पसंभार पाहत असताना एका अमेरिकन सहप्रवाशाने प्रश्न केला.

"या गुहेत मार्बल आढळते काय?"

"नो. मार्बल फक्त १ टक्का आहे. इट इज ऑल लाईम स्टोन." जॉनने उत्तर दिले.

"मग हे आकार पाण्याच्या प्रक्रियेमुळे बदलत असतील. आज हत्तीचे आकार दिसताहेत काही काळानंतर ते गेंड्यांचे आकार दिसतील."

"शक्य आहे." जॉन म्हणाला. "आज इथे हत्ती दिसताहेत उद्या कदाचित् गेंडे दिसतील किंवा आणखी कुठला तरी प्राणी दिसेल. निसर्गात सारखे बदल होत असतात. निसर्गात मूळ एकच प्राणी होता. त्यापासून दुसरा निर्माण झाला. त्यापासून तिसरा असे असंख्य प्राणी उत्पन्न झाले. ही उत्क्रांती सतत चालू असते. ती निसर्गाची किमया आहे."

जॉनच्या मागे पुसट उजेडातून पायऱ्या उतरत आम्ही किती खाली आलो, याची आम्हाला कल्पना नव्हती. पण थंडी चांगलीच वाजत होती. सर्वांगावर गरम कपडे असूनही गारठा झोंबत होता. मधूनच हुडहुडी भरत होती. आजुबाजूचे बहुरंगी आकार निरखित आम्ही पुढे सरकत होतो. एका ठिकाणी स्फटिकाचा शुभ्र चकाकता स्तंभ नुसताच अधांतरी निराधार लटकत होता. तो केव्हाही खाली पडेल अशी भीती होती. दुसरीकडे गुहेच्या भिंताडावर कोळ्याच्या जाळ्यासारखी बारीक कलाबतू होती. तिसरीकडे छतालाच प्रचंड दाढी फुटावी तसे पांढरेसफेत केसांचे जंजाळ लोंबकळत होते. पण चालता चालता गुहेतल्या आणखी काही गोष्टी लक्षात आल्या. गुहेत बऱ्याच ठिकाणी पाणी असले तरी कुठेही कुबट वास येत नव्हता. एवढ्या लांबलचक गुहेत कुठेही कोणत्याही प्रकारचा प्राणी आढळला नाही. अगदी साधे कीटक किंवा सरपटणारे प्राणी दिसले नाहीत. गुहेचे दार जॉनने आत शिरताच बंद केले होते. तरी देखील इतक्या खोल नि बंदिस्त जागेत श्वास घुसमटत नव्हता. म्हणजे विजेप्रमाणे प्राणवायूही सर्वत्र खेळविलेला होता. शेवटी महत्त्वाची गोष्ट जाणवली ती म्हणजे ती प्रदीर्घ गुहा कमालीची तुकतुकीत आणि स्वच्छ दिसत होती. कुठेही केरकचरा किंवा धूळ साठलेली आढळली नाही. जागोजाग 'हाताने स्पर्श करू नका' किंवा 'प्रवेश बंद' अशा पाट्या लावलेल्या होत्या. ऑस्ट्रेलियातील जमिनीवरच्या शहरांप्रमाणेच या पाताळनगरीची देखभाल आणि निगराणी उत्तमप्रकारे केलेली होती. ही व्यवस्था कशी करतात, असे जॉनला विचारावेसे वाटले.

तेवढ्यात जॉननेच अचानक विचारले,

"जंटलमेन, तुम्हाला स्वर्गात जायचे आहे की नरकात?"

आम्ही सगळेच बुचकळ्यात पडलो. हा काय प्रकार आहे? आमचा संभ्रम पाहून जॉन हसला. "चला प्रथम स्वर्गातच जाऊ."

पायऱ्या उतरून जॉनने स्वीच दाबले. तसे समोरचे प्रशस्त दालन झगमगून उठले. पण हळूहळू त्या दालनातला उजेड मंद झाला. ठिकठिकाणच्या पांढऱ्या पुंजक्यांना छाया प्रकाशाने स्वरूप येऊ लागले आणि कापसाच्या ढीगांसारखे शुभ्र छोटे छोटे मुलायम ढग त्या दालनात ठायीठायी दिसू लागले. पार्श्वभूमीला धुक्याचा पदर तरंगावा तशी किरमिजी धाग्यांची महिरप छतातून तोरणासारखी लोंबत होती. आपल्याकडच्या पौराणिक सिनेमात देवगंधर्व आकाशातून पुष्पवृष्टी करताना दाखवितात तशाप्रकारचा थोडासा देखावा आम्हाला तिथे दिसत होता. फक्त देवगंधर्वांचीच उणीव होती. आणि त्यामुळे तो सिनेमा नसून वस्तुस्थिती होती, हे कळत होते. जॉनने आम्हाला त्या पाताळातील स्वर्गात फारसा विहार करू दिला नाही. त्या स्वर्गाचे फोटो घेण्यास कॅमेरे चमकू लागले तसा जॉन हलला. "कम ऑन गाईज. इनफ ऑफ हेवन. लेट अस गो टू हेल नाऊ." अशी ललकारी ठोकून त्याने भराभर बऱ्याच पायऱ्या उतरून आम्हाला खूप खोलवर नेले. त्या खोलगट जागेत बराच अंधार होता. स्वर्गात त्याने लावलेला दिवा तसाच होता. पण त्याचा उजेड इथपर्यन्त पोचत नव्हता. जॉनने दिवा लावताच समोर दिसणारे दृश्य भयंकरच होते. तिथे स्वर्गासारखीच बखळ होती. पण तिची उंची फार कमी होती. आम्ही जेमतेम उभे राहू शकत होतो. पण उभे राहायलाही फारशी जागा नव्हती. कारण तळातून शेंदरी रंगाचे मोठाले निमुळते टोकदार सुळके वर उमटले होते. छतातूनही तसेच तीक्ष्ण पिंगट सुळके खाली आले होते. त्यामुळे संपूर्ण दृश्य एखाद्या अजस्त्र प्राण्याच्या विचकलेल्या जबड्यासारखे विक्राळ दिसत होते. ते खालचे नि वरचे सुळके हे त्या प्राण्याचे प्रचंड दात होते. कुठल्याही क्षणी तो जबडा मिटला तर त्या दातांखाली चिरडून आमचा चेंदामेंदा होणार होता. सुळक्यांच्या पलीकडे भिंतीशी माणसांच्या हाडाच्या सांगाड्यासारख्या वेड्यावाकड्या आकृत्या दिसत होत्या. जणू त्या राक्षसी जबड्यात चिरडल्या गेलेल्या प्राण्यांचे ते अस्थिपंजर होते. आम्ही काहीशा भयचकित नजरेने ते

संहारक दृश्य पाहत असतानाच जॉन म्हणाला,

"मित्रहो, आपण आता भूपृष्ठाच्या खाली ७०० फूट येऊन पोचलो आहोत. आपण इतक्या खाली आहोत की इथे हवा किंवा उजेड अजिबात येऊ शकत नाही. नरकात हवा नसते नि उजेडही नसतो. असतो फक्त अंधार. तुम्ही अंधार खूप वेळा पाहिला असेल पण खरा अंधार काय असतो हे तुम्हाला आता कळेल. मी हे स्वीच अर्धा मिनीट बंद करणार आहे. तुम्ही आहात तिथेच नि आहात तसेच उभे राहायचे आहे. या सुळक्यांशेजारी. या सुळक्यांसारखेच स्तब्ध नि निश्चल."

आमच्या छातीत धडधड सुरू होण्यापूर्वीच जॉनने बटन बंद केले. तत्क्षणी सारे सुम्म झाले. डोळ्यांसमोर अंधार उजेडासारखा उमटला. अंधार होताच एकदम आमच्या गटातून भीतीच्या आंतरराष्ट्रीय किंचाळ्या उठल्या. उत्स्फूर्त नि अनावर. पण सर्वांच्या आरोळीचा सूर आणि स्वर एकच होता. कारण भीतीचा उद्गार सर्वत्र एकच असतो. भयाची भाषा सर्वत्र सारखीच असते. किंचाळी फोडल्यानंतर आम्ही निःशब्द झालो. जणू तो आमचा शेवटचा टाहो होता. आम्ही तसूभरही हललो नाही. दुसऱ्यालाच काय पण स्वतःलाही आधारासाठी स्पर्श केला नाही. आमचा श्वासही मध्येच थांबला होता. खालचा खाली नि वरचा वर. ते अर्धे मिनीट खूपच लांबले. ते कल्पान्तापर्यन्त लांबणार नि हे अंधारयुग कधी संपणारच नाही असे भासत असतानाच जॉनने बटन दाबले. त्याबरोबर पुन्हा तेच सुळके समोर, पुन्हा त्याच पलीकडच्या अस्थिपंजर आकृत्या, पुन्हा तेच आम्ही सभोवताली. परलोकातून परतल्यासारखे. स्वतंत्र नि काहीसे विरक्तही.

जॉन म्हणाला, "वी हॅव बीन टू हेल. वी गो बॅक नाऊ. टू हेल अँड बॅक. एव्हरीबडी इज ओ के? एव्हरीबडी वॉंटस् टू कम बॅक? नोबडी वॉंटस् टू रिमेन इन हेल? ओ के. कमऑन लेटअस गो बॅक नाऊ. आता तुम्ही माझ्या पुढे जायचं. मी तुमच्या मागून येणार. तुम्ही दिवे लागले आहेत त्या दिव्यांच्या दिशेने जात राहायचं. येताना मी दिवे लावत पुढे आलो. जाताना दिवे काढत तुमच्या मागे येणार. दाराशी सर्वांनी थांबायचं. तेथे मला शिरगणती करायची आहे. सगळी डोकी ठिकाणावर आहेत का हे तपासायचं आहे. लेट अस स्टार्ट."

'क्वीक मार्च' असा हुकुम मिळताच पलटण जोरात चालत सुटते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भूप्रवास
६२२
७४७१९४
ग्रंथ

तसे आल्या मार्गानेच आम्ही परत निघालो. दिव्यांच्या उजेडावरहुकूम दिशेने आम्ही झरझर चालत होतो. मागून दिवे विझवत जॉन येत होता. दिवा विझताच मागे अंधार व्हायचा पण पुढचा उजेड आम्हाला पुरेसा होता. मागचा अंधार पाहायला आता सवड नव्हती.

उतरलेल्या पायऱ्या झपाट्याने चढत आम्ही वर दाराशी येऊन ठेपलो. वाटेत ठिकठिकाणी झळाळते निश्चल आकार मागे सरकत होते. पण त्यांच्याकडे पुन्हा पाहण्याइतका धीर निघत नव्हता. आम्हाला त्या अंधाऱ्या बंदिस्त गर्भातून आता बाहेर जायचे होते. भूपृष्ठावर स्वच्छंद हवेत नि लख्ख उजेडात.

आम्ही बंद दाराशी थांबलो असताना मागून जॉन उगवला. त्याने आमची मोजदाद केली. ती बरोबर ठरताच "सो फोक्स द टूर इज ओव्हर. आय होप यू एन्जाईड इट. थँक्स फॉर कमिंग" असे पुटपुटत तो दाराशी गेला नि किल्ली काढण्यासाठी खिसे चाचपू लागला. त्याला लवकर किल्ली सापडेना.

"व्हेअर इज द की? डिड आय ड्रॉप इट समव्हेअर?" स्वतःशीच बोलत त्याने इकडे तिकडे पाहिले तसा आम्हाला पुन्हा आंतरराष्ट्रीय धसका बसला. हे काय लचांड आणखी? किल्ली हरवली की काय या शहाण्याने? एवढ्या मोठ्या गुहेत किल्ली कुठे शोधणार? सुस्कारे नि हुंकार सोडत आम्ही स्तब्ध उभे होतो. तोच जॉन मोठ्यांदा हसला. मागच्या खिशातून किल्ली काढत म्हणाला,

"Oh, it is here !"

जॉनने दार उघडताच आम्ही एकामागून एक बाहेर पडलो. निराकार ओबडधोबड निर्जीव प्रस्तरांच्या निश्चल पाताळनगरीतून माणसांच्या हलत्या बोलत्या फुलत्या मोकळ्या जीवन्त जगात. आमच्या जगात.

■

# सौंदर्यनगरी कॅनबरा

कॅनबरा ही ऑस्ट्रेलियाची राजधानी आहे. आमच्यापैकी काहीजणांची समजूत होती की सिडनी ही राजधानी आहे. कारण सिडनी हे लोकसंख्येच्या आणि विस्ताराच्या दृष्टीने ऑस्ट्रेलियातले सर्वात मोठे शहर आहे. त्या शहराची लोकसंख्या सुमारे चाळीस लाख असून विस्तार कॅनबराच्या पाचपट आहे. सिडनीमध्ये ऑपेराहाऊस, सिडनी टॉवर, डार्लिंग हार्बर, सीवर्ल्ड, सिडनी बंदर अशी अनेक जग प्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळे आहेत. कॅनबरामध्ये एकही असे प्रेक्षणीय स्थळ नसले तरी खुद्द कॅनबरा हे संपूर्ण शहरच अतिशय प्रेक्षणीय आहे. ज्याला 'स्काय स्क्रॅपर' म्हणतात. अशा पन्नास साठ मजली इमारतींचे सिडनीमध्ये नुसते जंगल आहे. सिडनीत आम्ही राहत असलेले पार्करेजिस हॉटेलच पंचेचाळीस मजल्यांचे होते. आम्ही पस्तीसाव्या मजल्यावर राहत होतो. कॅनबरामध्ये फारशा हायराईज इमारती नाहीत. ऑस्ट्रेलियातली सर्व महत्त्वाची शहरे सिडनी, ब्रिस्बेन, मेलबर्न, ॲडलेड, पर्थ ही समुद्रकिनाऱ्यावर किंवा समुद्राच्या जवळ वसलेली आहेत. फक्त कॅनबरा हे समुद्रापासून थोडे दूर अंतर्भागात उभारलेले शहर आहे. शहर म्हणून कॅनबराची फारशी माहिती नसली तरी

जगातली एक अत्यंत सुंदर राजधानी म्हणून कॅनबरा जगभर प्रसिद्ध आहे. कॅनबरा हे पुण्यासारखेच डोंगरांनी वेढलेले शहर आहे. मात्र पुण्याभोवतीचे डोंगर उघडे बोडके. कळाहीन आणि झोपडपट्ट्यांनी बरबटलेले आहेत. तर कॅनबरा भोवतीच्या डोंगररांगा हिरव्याकंच झाडीने आणि रेखीव राष्ट्रीय स्मारकांनी सुशोभित आहेत. आपल्याकडच्या चंदिगढसारखे कॅनबरा हे अद्ययावत वास्तुकलेने नटलेले अतिशय देखणे नि कोरे करकरीत शहर आहे. फरक इतकाच की कॅनबराची आधुनिकता ही अधिक शांत, प्रसन्न आणि नीटनेटकी असून ती हिरव्यागार निसर्गाच्या कोंदणात बसवलेली असल्याने जास्तच आकर्षक आहे. राजधानी असल्यामुळे देशाच्या राजकारणाची धुळवड सतत कॅनबराला चालू असते. पण तरीदेखील ते शहर इतके सुबक, व्यवस्थित आणि मनोहर आहे की सहलीचे एक ठिकाण म्हणून पर्यटकांच्या आकर्षणाचे ते केन्द्र बनले आहे. कॅनबरा हे सिडनीच्या दक्षिणेला सुमारे दीडशे मैलांवर आहे. सिडनीहून ब्लू माऊंटन, जेनॉलन केव्हज, हंटर व्हॅली, सेंट्रल कोस्ट, वाईल्ड लाईफ पार्क वगैरे अनेक पर्यटन स्थळांना एक दिवसाच्या 'गाईडेड टूर्स' जातात. तशीच एक दिवसाची कॅनबरा दर्शनची बसची सफर आहे.

सकाळी नऊला सिडनीहून सुटणारी ही बस कॅनबराची सहल करून रात्री नऊला परत येते. या वातानुकूलित बसने आम्ही निघालो. आणि ह्यूम हायवेवरून दुपारी एकच्या सुमारास गाऊलबर्न या शहरात पोचलो. तिथे दुपारचे जेवण घेतल्यावर प्रशस्त चौपदरी फेडरल हायवेला वळून आम्ही कॅनबराकडे जाऊ लागलो. या राजरस्त्याने पाचदहा मैल गेलो असू नसू तर डावीकडे रस्त्याच्या अगदीजवळ पाण्याचा अफाट जलाशय तरंगताना दिसू लागला. मैलोन् मैल तो निळासावळा तुडूंब जलसंभार आमची सोबत करीत होता. या विशाल तलावाचे नाव लेक जॉर्ज. या तलावाची गंमत अशी की उन्हाळ्यात याचे पाणी संपूर्ण नाहीसे होते आणि तेथे कोरडी ठणठणीत जमीन शिल्लक राहते. उन्हाळा संपला की तलाव पुन्हा आपला पाण्याने भरतो नि मैलोन् मैल आडवेतिडवे हातपाय पसरतो. याची खोली फक्त चार ते पाच फूट आहे. लांबी नि रुंदी मात्र सांगता येत नाही इतकी अफाट नि अनिश्चितही. कारण दरवर्षी तलाव जितका पसरेल तितकी लांबी रुंदी बदलत असते. या तलावात पाणी कुठून येते आणि तो तलाव

पुन्हा कुठे गडप होतो याचा पत्ता नाही. या जादूच्या सरोवरात काळे नि पांढरे हंस डौलात विहरताना दिसत होते. मध्येच केव्हातरी तलावाचे पाणी शेपटीसारखे अरुंद होत संपले व दिसेनासे झाले आणि दिसू लागली कॅनबराची नयनरम्य हिरवीगार डोंगरराजी.

कॅनबराची नगररचना करण्याचे श्रेय अमेरिकन स्थापत्य विशारद वॉल्टर बर्ली ग्रिफिन याच्याकडे जाते. त्याच्या स्मरणार्थ लेक बर्ली ग्रिफिन हा सुंदर जलाशय शहरात बांधण्यात आला आहे. या जलाशयाला लागूनच कॅनबराच्या प्रवेशद्वाराशी डावीकडे नॅशनल कॅपिटल एक्झिबीशनची सुरेख बैठी इमारत आहे. ऑस्ट्रेलियाच्या राजधानीची सहल सुरू करण्यासाठी हे उत्तम ठिकाण आहे. इथून कॅनबराचे सुंदर विहंगम दृश्य दिसते. तसेच शहराची सर्वप्रकारची माहिती इथे उपलब्ध आहे. कॅनबराची सर्व तपशील दर्शवणारी विशाल प्रतिकृती समोरच्याच हॉलमध्ये मांडलेली आहे. वॉल्टर बर्ले ग्रिफीन या वास्तुतज्ञाने कुठल्या तत्त्वांवर कॅनवराची उभारणी केली आहे याचे दिग्दर्शन दृक्श्राव्य साधनांच्याद्वारे इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन, जपानी, चीनी, भाषेतून या प्रतिकृतीच्या आधारे केले जाते. पलीकडच्या हॉलमध्ये छोटे थिएटर आहे. या थिएटरमध्ये दर दहा मिनिटांनी नऊ मिनिटांचा छोटा चित्रपट दाखविण्यात येतो. या चित्रपटात कॅनबराच्या निर्मितीचा इतिहास, कॅनबरातील प्रमुख इमारती, शहरातील मोकळ्या जागा, तलाव, नदी आणि राष्ट्रीय उद्याने यांचे सम्यक् दर्शन घडविले जाते. याच प्रदर्शन केन्द्रात कॅनबराविषयक पुस्तके आणि भेटवस्तू यांचे मोठे दुकान आहे. कॅनबराची सर्वांगीण माहिती देणारी पुस्तके आणि नकाशे यांचे भांडारच इथे आढळते. पण या माहिती केंद्राचे सर्वात मनोहर वैशिष्ट्य म्हणजे ही इमारत लेक बर्ली ग्रिफिन या मानवनिर्मित सरोवराच्या काठावर अशा चतुराईने बांधली आहे की इमारतीच्या सरोवराकडच्या विशाल गवाक्षातून कॅनबरा शहराचे विलोभनीय दृश्य दिसते. काचेच्या या लांबरुंद खिडकीत उभे राहिले की लेक ग्रिफिनचा मंद लहरीवर झुलणारा निळाशार जलाशय आणि त्याच्या पलीकडे डोंगरांच्या पार्श्वभूमीवर उठून दिसणारे लखलखीत कॅनबरा शहर यांचा रमणीय देखावा दिसतो. तलावात उंच उडणारा स्फटिक शुभ्र फवारा लक्ष वेधून घेतो. १३७ मीटर उंच उडणारा हा फवारा ऑस्ट्रेलियाचा शोध लावणाऱ्या

कॅप्टन जेम्स कुकच्या स्मरणार्थ उभारलेला आहे. तलावाच्या काठावर कॅप्टन कुकने जगभर केलेल्या प्रवासाचे अचूक रेखाटन करणारा प्रचंड पृथ्वीगोल ठेवलेला आहे. तलावाच्या पलीकडे एका बाजूला ऑस्ट्रेलियन पार्लमेंट, सुप्रीम कोर्ट, नॅशनल लायब्ररी, नॅशनल गॅलरी यांच्या इमारती आणि दुसऱ्या बाजूला युद्धस्मारक व टेलेकॉम टॉवर नजरेत भरतो. प्रदर्शन केन्द्राच्या खिडकीत उभे राहूनच कुठल्या क्रमाने कॅनबरातील स्थळे पाहायची हे आपण ठरवू शकतो. आम्ही एकमताने ठरविले की आपण राजधानीत आहोत तेव्हा सर्वप्रथम ऑस्ट्रेलिया या अफाट देशाच्या राजकारणाचे आणि शासनाचे केंद्र असलेल्या पार्लमेंट हाऊसला भेट द्यायची.

आमची बस पार्लमेंट हाऊसच्या आडव्या इमारतीसमोर आली तरी कारपार्क कुठे दिसत नव्हता. आम्ही बुचकळ्यात पडलो. आता आमची ही लांबलचक सुळसुळीत बस कुठे उभी करायची? पार्लमेंट हाऊसकडे येणाऱ्या मोटारी रस्त्यात दिसल्या होत्या, त्या सर्व कुठे गडप झाल्या? आम्ही बसच्या चालकाला विचारणार तोच आमची बस एकदम उतारावरून घसरत रस्त्याच्या पोटात गेली. दीर्घ वळण घेऊन तळघरात शिरली. हे तळघर एखाद्या भूमिगत मैदानाएवढे मोठे होते. असंख्य मोटारी रांगेने तेथे मुकाट उभ्या होत्या. बसकरता वेगळा विभाग होता. तेथे आमची बस उभी राहिल्यावर चालकाने कोपऱ्यातला जिना दाखवून वर जाण्याची सूचना केली. जिन्यातून आम्ही वर उमटलो ते थेट पार्लमेंट हाऊस समोरच्या चौथऱ्यावर. या चौथऱ्याभोवती भरगच्च सपाट हिरवळीची रुंद महिरप आहे. पार्लमेंट हाऊस हे उंचावर असल्याने चौथऱ्यावर उभे राहिले की समोर संपूर्ण कॅनबरा शहर नजरेच्या आवाक्यात येते. अगदी थेट नाकासमोर क्षितीजाच्या कडेशी डोंगरावर युद्धस्मारकाचा मनोरा दिसतो. त्याच्या अलीकडे कॅनबरातल्या शासकीय इमारती व त्या इमारतीभोवतीचे एकमेकांना काटकोनात छेद देणारे प्रशस्त नितळ रस्ते. कॅनबरातला इंच न् इंच हा योजनाबद्ध आहे. शहरातले सगळे प्रमुख रस्ते पार्लमेंट हाऊसपाशी येऊन मिळतात. त्यामुळे पार्लमेंट हे देशाची सूत्रे हलवणारे सत्तेचे केन्द्र आहे हे सूचित होते. पार्लमेंट हाऊसच्या ऐटबाज इमारती समोर उभे राहिले की पार्लमेंटच्या श्रेष्ठतम प्रभुत्वाची जाणीव होते. सत्तेच्या सिंहासनासमोर आपण उभे आहोत असा भास होतो. खुद्द पार्लमेंट हाऊस

हा अत्याधुनिक शिल्पकलेचा अप्रतिम नमुना आहे. प्रथमदर्शनीच दिसतो इमारतीवरचा नीलश्वेत उत्तुंग ध्वजारोहण स्तंभ. त्या स्तंभावर ऑस्ट्रेलियाचा ध्वज सतत फडकत असतो. हा ८१ मीटर उंचीचा स्तंभ ॲल्युमिनियमच्या त्रिकोणाकृती रचनेवर उभारलेला आहे. कॅनबरा शहरातून आणि शहराच्या आसमंतातून उठून दिसणारा हा चकाकता त्रिकोण म्हणजे ॲल्युमिनियमची जगातली एक प्रचंड रचना आहे. ध्वजस्तंभाच्या दोन्ही बाजूंना अजस्त्र पक्षाच्या पसरलेल्या पंखासारखी छताची बांधणी आहे. इमारतीच्या समोरच्या प्रशस्त मोकळ्या व्हरांड्याला (Foyer) ४८ शुभ्र संगमरवरी घोटीव खांबांचे जाळीदार मजबूत आवरण आहे. निलगिरीच्या जंगलाचा आभास व्हावा असे त्याचे डिझाईन आहे. आतील भव्य सभागृहे आणि कमनीय बांधणीचे जिने संगमरवराने मढविलेले आहेत. सबंध इमारतीकडे दृष्टीक्षेप केला की सामर्थ्य आणि सौंदर्य यांचा संगम झाल्याचा साक्षात्कार होतो. मुलायम मखमल परिधान केलेल्या कठीण पोलादी मूर्तीप्रमाणे इमारतीचा नाजूकपणा आणि कणखरपणा एकाच वेळी नजरेत ठसतो.

पार्लमेंटच्या इमारतीत दोन अतिभव्य सार्वजनिक दिवाणखाने आहेत. 'ग्रेट हॉल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवाणखान्यात आर्थर बॉईड या ऑस्ट्रेलियन कलाकाराने बनवलेली विशाल चित्रमय टॅपेस्ट्री आहे. ही जगातली एक विशाल टॅपेस्ट्री गणली जाते. संपूर्ण इमारतभर सगळ्या चेंबर्समध्ये, व्हरांड्यात आणि कॉरिडार्समध्ये नामवंत चित्रकारांची निसर्गचित्रे लावलेली आहेत. पार्लमेंटमध्ये सिनेट आणि प्रतिनिधीसभा (House of Representatives) यांच्या कामकाजासाठी दोन अतिशय शोभिवंत आणि विशाल सभागृहे आहेत. सिनेटच्या सभागृहाची सजावट तांबूस रंगात तर प्रतिनिधी सभेच्या सभागृहाची पोपटी रंगात केलेली आहे. पहिल्या मजल्यावर क्वीन्स टेरेस कॅफे हे अलिशान नि हवेशीर उपहारगृह आहे. तेथूनही कॅनबराचे सर्वांगीण दृश्य दिसते. त्याचे अवलोकन करीत आम्ही तेथे आमचे दुपारचे जेवण घेतले आणि सिनेट व प्रतिनिधी सभा पाहण्यास सज्ज झालो. पण आमच्या सज्ज होण्याचा अर्थ इथे जरा वेगळा होता. सज्ज होण्याची प्रक्रियाही थोडी कसोटीची व पद्धतशीर होती. ही प्रक्रिया म्हणजे सुरक्षा तपासणीतून (Security Check) तावून सुलाखून जाण्याची. कारण येथे पार्लमेंटच्या सभागृहात जाण्यासाठी सुरक्षाव्यवस्था

अतिशय कडक आहे. तिची पहिली पायरी म्हणजे प्रथम प्रवेशद्वारापासच्या खोलीत सुरक्षा कर्मचाऱ्यांनी एका रांगेत आम्हाला उभे केले. तेथील एक्सरे मशीनमधून आमच्याजवळचे सामान तपासून बाहेर काढले. जादूगाराने पोतडीतून वेगवेगळ्या चीजा काढाव्या तसे. हॅण्ड बॅग्ज, कॅमेरे, पर्सेस वगैरे सामान आमच्या स्वाधीन केल्यावर आम्ही लिफ्टने वर गेलो. तेथे दाराशीच एक क्लोकरूम होती. तिथे बिल्ले घेऊन आमचे सामान आम्ही सुरक्षित ठेवले. कारण कुठल्याही प्रकारचे सामान घेऊन प्रतिनिधी सभेच्या किंवा सिनेटच्या सभागृहात जाण्यास मनाई आहे. सामानाचा त्याग करून आम्ही प्रथम प्रतिनिधी सभेच्या प्रेक्षकांच्या गॅलरीत जाण्यासाठी सभागृहाबाहेरच्या लॉबीमध्ये गेलो. तेथे पुन्हा सुरक्षेची चौकट होतीच. त्या लाकडी चौकटीतून जाण्यापूर्वी प्रत्येकाकडे एक प्लॅस्टिकचा रंगीत डबा देण्यात आला. हा डबा कशासाठी असे नवल आम्ही करीत असतानाच तिथला सुटाबुटातला उंचनीच गोरापान सुरक्षा अधिकारी अदबीने म्हणाला,

"सर, कृपा करून तुमच्या खिशातल्या सर्व धातूच्या वस्तू या डब्यात काढून ठेवा. ऑल मेटल प्लीज. ओ के?"

आम्ही गडबडीने खिशातली सर्व चीजवस्तू बाहेर काढून त्या डब्यात टाकली. मग सर्वसंग परित्याग केल्यासारखे उदात्त चेहऱ्याने केवळ अंगावरच्या कपड्यानिशी एकेक करून लाकडी चौकटीतून पलीकडे गेलो. त्यानंतर डब्यांमध्ये गोळा झालेल्या वस्तू निरखून पाहून तो अधिकारी ज्याच्या त्याला साभार परत देऊ लागला. आता ते डबे आपल्याकडच्या रद्दीसामान गोळा करणाऱ्या भंगारवाल्याच्या गाडीवर शोभले असते इतक्या चिल्लर चाल्लर किरकोळ चित्र विचित्र वस्तू त्यांमध्ये जमा झाल्या होत्या. नाणी, किल्ल्या, केसांच्या पिना, नेलकटर कानकोरणी, सिगरेट केसेस, तपकिरीच्या डब्या, सुपारीच्या डब्या, अडकित्ता इत्यादी वस्तूंचा त्या डब्यांमध्ये बाजारच भरला होता. नाणी, किल्ल्या, नेलकटर इतकेच नव्हे तर सिगरेट केस वगैरे परत करताना फारसा प्रश्न आला नाही. पण तपकिरीची डबी हा काय प्रकार आहे हे त्या परीट घडीच्या अज्ञान अधिकाऱ्याला लवकर कळेना. ती पत्र्याची डबी थोडा वेळ हाताळून त्याने उघडली नि नाकाशी नेऊन हुंगली. तसा तो कासावीस होऊन फटाफटा शिंकला. लालबुंद नाकाने नि पाणावलेल्या डोळ्याने डबीच्या मालकाकडे पाहत त्याने विचारले,

"व्हॉट इज धिस जंटलमन?"

"स्नफ."

"स्नफ? मेड ऑफ व्हॉट?"

"टोबॅको."

"टोबॅको? व्हॉट फॉर?"

"स्मेलिंग"

"स्मेलिंग? ओके. ओके."

तपकिरीची डबी घाईघाईने बंद करून डबीच्या मालकाकडे काहीशा धास्तीने आणि बऱ्याचशा संशयाने पाहत त्याने परत दिली

सुपारीच्या डबीसंबंधातही तसाच पण थोडासा वेगळा प्रकार घडला. ती स्टेनलेसची दोन खणांची डबी उघडून पाहताच एका खणात तंबाखू व चुना आणि दुसऱ्या खणात बारीक सुपारी अशी मांडणी त्या अधिकाऱ्याला दिसली तसा तो बुचकळ्यात पडला. डबीच्या धन्याला संयमपूर्वक न्याहाळून पाहत त्याने नम्रपणे विचारले.

"व्हॉट इज धिस इन हिअर सर?"

"टोबॅको"

"व्हॉट फॉर?"

"फॉर इटींग."

"इटींग?"

इथे तो सुरक्षा अधिकारी थोडा चपापला. पण चेहऱ्यावरचे विनयशील हास्य प्रयत्नपूर्वक कायम ठेवत त्याने दुसऱ्या खणातल्या सुपारीकडे बोट दाखवले.

"व्हॉट इज धिस अदर वन?"

"बीटलनट"

"बीटलनट? व्हॉट फॉर?"

"च्युइंग"

"टोबॅको फॉर इटींग ॲण्ड बीटलनट फॉर च्युइंग? ओके ओके." हातावरचे झुरळ झटकावे तशी डबी लगोलग परत देत त्याने हात झाडल्यासारखे केले. त्या अधिकाऱ्याने तंबाखू सिगरेटमधून ओढून धूर बाहेर फेकणारी माणसे पाहिली होती. पण चुना लावून तंबाखू खाणारे,

सुपारी चघळणारे इतकेच नव्हेतर तंबाखू हुंगणारे भारतीय तो बिचारा कदाचित् प्रथमच पाहत असावा. विचित्र अनोळखी प्राण्यांकडे पाहावे तशा चमत्कारिक नजरेने आमच्याकडे पाहत शरणागताच्या मृदू लीन स्वरात तो अखेरीला म्हणाला.

"ओके जंटलमेन. गो टू द डोअर ऑन राईट."

आम्ही देखील आत्तापर्यन्त खिशात गुप्त असलेली एकमेकांची व्यसने उघड झाल्यामुळे काहीशा खजिल चेहऱ्यांनी मुकाट्याने उजवीकडच्या दाराकडे सरकलो. दारापाशी पोचताच प्रतिनिधीसभेच्या कर्मचाऱ्याने आमचे स्वागत केले. दार उघडून प्रेक्षकांच्या गॅलरीत नेले. गॅलरीत तुरळक प्रेक्षक होते. आम्ही सर्वजण समोरच्या रांगेत जाऊन बसलो. गॅलरीतून प्रतिनिधीसभेचे खालचे दृश्य व्यवस्थित संपूर्ण दिसत होते. समोरच्या भिंतीशी उच्चासनावर सभापती महोदय विराजमान होते. त्यांच्यासमोरच्या लांबट चौकोनी टेबलावर उजवीकडे प्रतिनिधीसभेतील सरकारी पक्षाचा नेता आणि डावीकडे विरोधी पक्षाचा नेता बसलेला होता. दोघांच्याही मागे त्यांच्या पक्षांच्या सदस्यांची बसण्याची व्यवस्था होती. लांबट मेजासमोर छोट्या टेबलाशी सभापतीकडे तोंड करून दोन कर्मचारी बसले होते. ते सभेमधील सर्व कामकाज रेकॉर्ड करीत होते. त्यांच्याही मागे दोन मुख्य पक्षांव्यतिरिक्त इतर लहान पक्षांच्या सदस्यांची आणि स्वतंत्र सदस्यांची बसण्याची सोय होती. गंमत अशी की आम्ही गेलो त्यावेळी सभागृहातली बहुसंख्य आसने रिकामी होती. सरकारी पक्षाचे दोन तीन आणि विरोधी पक्षाचे तीनचार असे जेमतेम सात आठ सदस्यच संपूर्ण सभागृहात उपस्थित होते. स्वतंत्र सदस्यांच्या विभागातून एक सभासद तावातावाने लेखीभाषण वाचून दाखवत होता. वाचताना तो मध्येच मोठ्यांदा शिरा ताणून घसा खरडत होता आणि त्याचबरोबर हातवारेही करीत होता. ऑस्ट्रेलियातील मूळचे रहिवासी जे आदिवासी त्यांच्यावर शिक्षण, नोकऱ्या, निवारा या सर्व जीवनावश्यक बाबतीत होणारा अन्याय दूर केला पाहिजे, हे तो सन्मान्य सभासद पोटतिडकीने सांगत होता. आदिवासींना दिलेली आश्वासने सरकार पक्षाने पूर्ण केली नाहीत, म्हणून सरकारवर तो जळजळीत शब्दात आगपाखड करीत होता. परन्तु आश्चर्य असे की त्याचे ते तळमळीचे नि आवेशपूर्ण भाषण ऐकण्यास फार थोडे सदस्य उपस्थित होते. जे होते तेही त्याच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करून एकतर मख्ख बसले

होते किंवा पेंगत होते. त्या बिचाऱ्या सभासदाचे घणाघाती शब्द रिकाम्या सभागृहात घंटानादासारखे नुसते पोकळ घुमत होते. त्याचे वक्तव्य ऐकत असताना आपल्याकडे मागासलेल्या जमाती आणि दलित यांच्यावरील अन्यायाविरुद्ध तारस्वराने नेहमी कंठशोष करण्यात येतो, त्याची आठवण झाल्याखेरीज राहिली नाही.

प्रतिनिधीसभेमध्ये दहा मिनिटे थांबून आम्ही बाहेर पडलो. मधली विस्तृत लॉबी पार करून सिनेटकडे गेलो. इथेही प्रतिनिधीसभेप्रमाणे सुरक्षा तपासणीचा प्रयोग साग्रसंगीत झाला. पात्रे पूर्वीचीच. अभिनय तोच. ॲक्शन तीच. शेवट ही तोच. फक्त सुरक्षा अधिकाऱ्यांच्या भूमिका करणारे नट वेगळे. मात्र आम्ही सिनेटच्या प्रेक्षकांच्या गॅलरीत जाऊन स्थानापन्न झालो तर तेथे वेगळेच नाटक रंगात आले होते. प्रश्नोत्तरांचा तास चालू होता. सभागृह संपूर्ण भरलेले होते. सरकारपक्ष नि विरोधीपक्ष सर्व संख्याबलानिशी जय्यत तयार होते. विरोधी पक्षाचा एक सिनेटर सरकारपक्षावर आरोप करीत होता. सरकारने निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने का पाळलेली नाहीत? विशिष्ट शैक्षणिक सुधारणांसाठी दीड दशलक्ष डॉलर्स खर्च करण्याचे वचन का पूर्ण केले नाही? सरकारपक्षातर्फे अध्यक्षांच्या समोर उजवीकडे बसलेले महोदय या आरोपांना उत्तर देत होते. समोरच्या रांगेतल्या ऑस्ट्रेलियन प्रेक्षकाला सहज विचारले,

"इज ही द प्राईम मिनिस्टर?"

"नो. प्राईम मिनिस्टर डझन्ट कम इन द सिनेट."

"देन हू इज ही?"

"फॉरेन मिनिस्टर एव्हान्स"

विदेशमंत्री शैक्षणिक सुधारणांसंबंधीच्या प्रश्नाला का उत्तर देत होते, याचा उलगडा झाला नाही. पण त्यामुळे की काय कोण जाणे विरोधी पक्षाचे सिनेटर्स प्रतिघोषणा करून गोंधळात भर घालत होते. प्रश्न आणि उत्तर यांचा नीटसा बोध होत नव्हता. पुरेसा हंगामा करण्यास शब्द अपुरे पडले की सिनेटर्स उभे राहून समोरची टेबले थाडथा. वाजवत होते. नुसता हलकल्लोळ माजला होता. मधूनच अध्यक्ष महाशय हातोडा आपटून सभागृह शांत करण्याचा असफल प्रयत्न करीत होते. लोकशाही ही सर्वोत्कृष्ट शासन पद्धती आहे, असे मानले जाते. पण आरोप प्रत्यारोप, घोषणा प्रतिघोषणा, आरडाओरडा, गोंधळ हे जगभरच्या लोकशाहीचे व्यवच्छेदक लक्षण बनले आहे, याचे प्रत्यंतर ऑस्ट्रेलियातल्या सिनेटच्या

त्या सभागृहात घडत होते. आम्हाला लोकशाहीच्या त्या स्वरुपाचा भरपूर पूर्वपरिचय असल्याने तिथे थांबण्यात फारसे स्वारस्य राहिले नव्हते.

पार्लमेंटच्या प्रासादतुल्य इमारतीचे आणि तेथील जीवन्त लोकशाहीचे दर्शन घेतल्यानंतर आम्ही निर्जीव छोट्या बाहुल्यांचे एक छोटेखानी खेडे (Miniature Village) पाहण्यास गेलो. या खेड्याचे नाव आहे कॉकिंग्टन ग्रीन. अतिशय उत्कृष्ट मशागत केलेल्या एका बगिच्यात चिमुकल्या इमारती आणि इवलीशी माणसे यांच्या प्रतिकृती उभ्या करून ब्रिटनमधील एका खेड्यातील जीवनक्रमाचे संपूर्ण दर्शन अतिशय कौशल्याने घडविण्यात आले होते. या खेड्यातील अंगठ्याएवढी माणसे शेती करतात, बागबगीचा फुलवितात, क्रिकेट खेळतात, लग्न समारंभ साजरा करतात. चर्चमध्ये प्रार्थना करतात. खेड्यातील तऱ्हेतऱ्हेची माणसे विहिरी, नदी, तलाव, मैदाने, डोंगर, शेते, चर्च, शाळा यांच्या लुटूपुटूच्या सुबक प्रतिकृतींद्वारा केलेले ब्रिटनमधील खेड्याचे संपूर्ण वास्तववादी चित्रण इथे आढळते. इतक्या सूक्ष्म स्वरूपात सबंध खेडे जसेच्या तसे उभे करणे, ही अपूर्व गोष्ट आहे.

'कॉकींग्टन ग्रीन' मध्ये ब्रिटनच्या ग्रामीण जीवनाचे चिमणे स्मारक पाहून आम्ही वळलो थेट डॉयनासोर म्युझियमकडे. अगडबंब प्राण्यांचे अजस्र अवशेष पाहण्यासाठी. या राष्ट्रीय डॉयनासोर म्युझियममध्ये प्रागैतिहासिक प्राण्यांचे व डॉयनासोर्सचे अवशेष जतन करून ठेवलेले आहेत. या म्युझियममधील प्रदर्शनात एकूण तीनशे प्रचंड प्रतिकृती मांडलेल्या आहेत. त्यामध्ये नऊ संपूर्ण सांगाडे आहेत. जबडे, कवटया आणि हाडांच्या विविध प्रतिकृती आहेत. आणि तीन डॉयनासोर्स हुबेहूब पूर्णाकृती पुनर्रचना करून उभारलेले आहेत. नामशेष झालेल्या अवाढव्य प्राण्यांचे स्मरण करून देणारा ऑस्ट्रेलियातील हा पहिला आणि सर्वात मोठा म्युझियम आहे.

'डॉयनासोर कॅफे' मध्ये कॉफी घेतल्यावर खरे म्हणजे सिडनीला परतायची वेळ झाली होती. पण कॅनबरातली बरीच स्थळे अद्याप पाहायची राहिली होती. ब्लॅक माऊंटनच्या शिखरावर दिसणारा टेलेकॉम टॉवर, युद्धस्मारक, बोटॅनिकल गार्डन्स, कांगारूंचे वसतीस्थान असलेला टिड बिन बिल्ला, नेचर रिझर्व पार्क, ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिवर्सिटी, रॉयल ऑस्ट्रेलियन मिंट, नॅशनल आर्ट गॅलरी वगैरे गोष्टी आमच्या यादीत होत्या. वेळे अभावी त्या पाहणे शक्य नव्हते. पण यादीत नसलेले एक स्थळ पाहण्याची इच्छा मात्र आम्हाला आवरता आली नाही. ते स्थळ

म्हणजे ऑस्ट्रेलियाच्या राजधानीत असलेला भारतीय दूतावास. इंडियन हायकमिशन. आमच्या ऑस्ट्रेलियन चालकाला तसे सांगताच तो लगेच आमच्यापेक्षाही अधिक तत्परतेने म्हणाला, "ओ येस शुअर. आय वील टेक यू देअर ओके?"

परदेशी दूतावासांकरिता कॅनबरा शहरात वेगळा, शांत, सुरक्षित आणि झाडीने वेढलेला प्रसन्न परिसर मुद्दाम राखून ठेवलेला आहे. आमची बस दूतावासांच्या विभागाकडे जात असताना लक्षात आले की सगळीकडेच रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना आणि विभाजकांवर लावलेले रंगीबेरंगी वृक्ष कॅनबराच्या सौंदर्यात भर घालत होते. इथले रस्ते, इमारती, झाडे सगळे कसे आखीव रेखीव नि पद्धतशीर होते. कॅनबरामध्ये हऱ्याभऱ्या उद्यानांची नुसती रेलचेल आहे. सर्वत्र विविधरंगी फुलांनी झाडे लदबदली आहेत. हे शहर तुलनेने तसे अलीकडचे आहे. १२ मार्च १९१३ रोजी म्हणजे फक्त ऐंशी वर्षांपूर्वी या शहराची स्थापना झाली. त्यामुळे शहरावर सगळीकडे नाविन्याची नि ताजेपणाची टपोरी झळाळी आहे. ती झळाळी जपण्याचे या शहरात सातत्याने प्रयत्न चालू असतात. रस्ते नुकतेच झाडून धुतल्यासारखे निर्मळ. उद्यानांमध्ये केरकचरा अभावाने आढळतो. पादचारी मार्ग कमालीचे लख्ख. कॅनबराची लोकसंख्या फक्त चार लाख आहे. कमी लोकसंख्या हे शहराच्या स्वच्छतेचे आणि व्यवस्थितपणाचे कारण आहे, असे बसमधला एक सहप्रवासी म्हणाला. ते खरे असू शकेल. पण कमी माणसे सुद्धा जास्त घाण करू शकतात, हेही तितकेच खरे आहे. एकाने जरी पेटीत न टाकता रस्त्यावर कचरा फेकला तरी रस्ता अस्वच्छ होऊ शकतो. अखेरीला स्वच्छता आणि शुद्धता हा कमी अधिक लोकसंख्येचा परिणाम नसून मुळात तो लोकांच्या संस्कृतीचा भाग आहे.

परदेशी दूतावासांच्या वसाहतीत आमची बस शिरली तेव्हा तर तिथल्या शांत, गंभीर वातावरणाने आम्ही थोडेसे भारावून गेलो. या खास विभागात ऐंशी देशांच्या हायकमिशनच्या इमारती आहेत. एकेक हायकमिशन येई तसा आमचा चालक पुकारा करी. 'हायकमिशन ऑफ ब्राझिल', 'एम्बसी ऑफ मलेशिया' 'अम्बॅसडर ऑफ न्यूझीलण्ड'. प्रत्येक हायकमिशन पुढे बस पळभर थांबत होती. 'हाय कमिशन ऑफ यू. एस. ए.' असा हाकारा होताच आम्ही पाहिले. अमेरिकन हायकमिशनचे आवार खूपच मोठे होते. त्यामध्ये उत्कृष्ट विस्तृत बगीचा आणि मुलायम हिरवळ

पसरली होती. जागोजाग कारंजी उडत होती. बगीच्याचा मध्यभागी दूतावासाच्या आकर्षक इमारती आहेत. कारपार्कमध्ये मोटारी रांगेने उभ्या होत्या. लोकांची लगबग होती. चीनच्या दूतावासातही तोच प्रकार होता. विशाल परिसर, पॅगोडासारख्या लाल छपरांच्या देखण्या रंगीत इमारती, मोटारींचा ताफा, येणाऱ्या जाणाऱ्यांची वर्दळ. ब्रिटीश एम्बसीतही तसेच जवळपास दृश्य. फक्त इमारतीची रचना वेगळी आणि मनोवेधक. फ्रान्सचा दूतावास एकमजलीच पण अतिशय रेखीव आणि प्रमाणबद्ध होता. सभोवतीच्या वृक्षांची रचनाही डौलदार. अचानक चालकाने ललकारी दिली.

"ॲण्ड नाऊ जंटलमेन, द हायकमिशनर ऑफ इंडिया."

आम्ही पाहिले छोटेसे आवार. इमारतही ठोकळेबाज आणि काहीशी कळाहीन. प्रांगणात वृक्ष होते पण त्यांची निगराणी केलेली दिसत नव्हती. बरेचसे पर्णहीन होते. उरलेले बेडौल. आत जाण्याच्या रस्त्यावर पालापाचोळा पडला होता. इमारतीचे मुख्य दार उघडे होते. पण बाहेर सगळा शुकशुकाट होता. एकही मोटार नाही. माणूस नाही. कदाचित् दुसरे एखादे प्रवेशद्वार असेल. तिथे माणसांची-मोटारींची चहलपहल असेल, अशी समजूत करून घेतली. तरीही दूतावासाचा एकंदर आविर्भाव स्वागतशील नि उत्साह जनक भासला नाही. सगळे कसे ठप्प नि सुन्न. थोडेसे सुतकीही.

चालकाने बस थांबविली होती. त्याने विचारले,

"वॉंट टू हॅव अ लूक इनसाईड?"

आम्ही दहा भारतीय बसमध्ये होतो. उत्सुकतेने भारतीय दूतावास पाहायला आलो होतो. पण इतर देशांच्या इमारतींच्या तुलनेने उदास आणि नगण्य दिसणारा तो भारताचा दूतावास पाहून आम्ही खट्टू झालो होतो. कोणालाच आत जाण्याची इच्छा उरली नव्हती. प्रत्येकाला वाटले असणार, आत गेलो नि तेथे थंडे स्वागत झाले तर काय घ्या. कशाला उगाच हात दाखवून अवलक्षण? चालकाच्या आर्जवी प्रश्नाला कोणीच होकार दिला नाही. तसा काहीसे चकित होऊन तो म्हणाला,

"नो? नोबडी वॉन्टस् टू गो? ओ के."

आमची बस पुढे निघाली तशी दूतावासावर फडकणाऱ्या तिरंग्याकडे आम्ही एकवार नजर टाकली. खिन्न नि ओझरती.

■

# क्रिकेटची मदिना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

सिडनी खालोखाल मेलबर्न हे ऑस्ट्रेलियातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. सुमारे तीस लाख लोकसंख्येच्या आणि सभोवार उद्यानांनी वेढलेल्या या सुंदर शहरात साहित्य, कला आणि क्रीडा यांचा जल्लोष वर्षभर सतत चालू असतो. नाट्य, संगीत, नृत्य, शिल्प, चित्र इत्यादी सगळ्या कलामहोत्सवांची या नगरीत रेलचेल असते. मेलबर्नला एकोणीस कलादालने असून तेथे चित्र-शिल्पकलेपासून तर लाकडी कोरीव कारागिरीपर्यन्त सर्व प्रकारच्या कलाकृतींची प्रदर्शने सदोदित भरलेली असतात. अत्याधुनिक कलाविष्कारापासून तर आदिवासींच्या प्राचीन कलाकुसरीपर्यन्त कलेच्या विविध प्रकारच्या यच्चयावत् कलानिर्मितीचे मेलबर्नमधील कलादालनांमध्ये दर्शन घडते. कलेचा बहुढंगी वारसा आणि बहुरंगी परंपरा जतन करून ठेवणारी अकरा सुसज्ज वस्तुसंग्रहालये या कलानगरीत आहेत. ऑस्ट्रेलियन बॅले, मेलबर्न सिंफनी आर्केस्ट्रा, व्हिक्टोरिया स्टेट ऑपेरा, प्लेबॉक्स यासारख्या जगप्रसिद्ध संगीत नाटक, मंडळ्यांचे मेलबर्न हे उगमस्थान आहे.

कलांप्रमाणेच क्रीडामहोत्सवांचेही मोहोळ मेलबर्नला सदैव उठलेले

असते. क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, बॉक्सिंग, सायकलींग, याचिंग, स्वीमिंग, ॲथलेटिक्स वगैरे विविध क्रीडाप्रकारातील राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय सामना नाही असा दिवस क्वचितच इथे उगवत असावा. क्रीडास्पर्धांचे आयोजन करणाऱ्या संस्थांचे जाळेच या शहरात पसरले आहे. अनेक क्रीडापटू इथे बस्तान ठोकून बसलेले आहेत. त्याचप्रमाणे ऑस्ट्रेलियातील प्रमुख साहित्यिक, अभिनेते, संगीतज्ञ, चित्रकार यांचेही मेलबर्न हे निवासस्थान आहे. त्यामुळे या शहरात वावरताना ऑस्ट्रेलियाच्या चैतन्यमय सांस्कृतिक जीवनाचा साक्षात्कार घडतो. कलाक्रीडांच्या शौकिनांचे हे शहर कॅनबराच्या दक्षिणपूर्वेला सुमारे पाचशे किलोमीटरवर समुद्रकिनारी वसलेले आहे. कॅनबरा ही ऑस्ट्रेलियाची राजकीय राजधानी आहे. तर साहित्य, कला, क्रीडा यांचे माहेरघर असलेली मेलबर्न ही ऑस्ट्रेलियाची सांस्कृतिक राजधानी आहे.

कलाक्रीडाप्रेमी रसिकांच्या कलासक्त आणि कलात्मक जीवनामुळे असेल कदाचित् पण मेलबर्नला एक प्रकारचे खानदानी सौंदर्य प्राप्त झाले आहे. इथले रस्ते, इमारती, उद्याने, उपहारगृहे ही ऑस्ट्रेलियाच्या इतर शहरातल्याप्रमाणेच स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न आहेत. पण शहराच्या एकूण आविर्भावात रमणीय नजाकत जाणवते. इथल्या लोकांच्या बोलण्या चालण्यात नि वागण्यात एक प्रकारचा मोहक विभ्रम आहे. इथल्या रस्त्यावरची ट्रामदेखील जनानी नखऱ्याने ठुमकत ठसक्यात चालताना दिसते. रूपसुंदर कामिनीसारखे या नगरीचे स्वरूप मनोरम असल्यामुळे तिला 'दख्खनची रमणी' (The lady of the South) म्हणून ओळखले जाते.

या विलासी नगरात आमचा मुक्काम रॅडिसन या अलिशान पंचतारांकित हॉटेलात असणे हे साहजिकच होते. पण पंचतारांकित हॉटेलातील वास्तव्य जितके आरामशीर तितकेच लहानसहान बाबतीत पुष्कळदा अडचणीचे ठरते, असा अनुभव येतो. कुठल्यातरी सुखासीन राजाला सात गाद्यांखालचा केस खुपत होता अशी एक सुरस आणि चमत्कारिक कथा आहे. तसे केस खुपण्याचे त्रासदायक प्रकार पंचतारांकित ऐषआरामातही घडतात. रॅडिसन हॉटेल त्याला अपवाद नव्हते. आमच्या तीन दिवसांच्या मुक्कामात तेथेही काही किरकोळ कटकटी झाल्याच.

पहिली भानगड म्हणजे खोलीच्या किल्लीची. पंचतारांकित हॉटेलात बहुधा खोल्यांना कार्डाच्या किल्ल्या असतात. नेहमीसारखी कुलूप किल्ली नसते. प्लॅस्टीकचे कार्ड खोलीच्या मॅग्नेटिक कुलुपात विशिष्ट कोनातून आणि नेमक्या दाबाने घातले तरच कुलूप उघडते. रॅडिसनमध्येही ही सोय होती. पण आमच्या खोलीची कार्डकी अनुभवान्ती बरीच गैरसोयीची ठरली. कुठल्याही कोनातून आणि दाबाने कार्ड कुलुपात घातले तरी कुलूप उघडायला तयार होईना. दरवेळी बाहेरून आलो की कुलुपाशी झटापट आपली ठरलेली. कुलुपात लाल आणि हिरवा असे दोन चिमुकले दिवे होते. हिरवा दिवा लागला की कुलूप उघडायचे. पण आमच्या कुलुपाचा आपला सदोदित लाल बावटा चमकायचा. हिरवी झेंडी कधी लागायची नाही. अखेरीला हॉटेलच्या कर्मचाऱ्याला बोलावून कुलूप उघडायला लावण्याशिवाय दुसरा पर्याय नसायचा. तो कर्मचारीदेखील बराच प्रयासान्ती ते कुलूप उघडू शकत असे. उघडल्यानंतर मात्र आम्हीच कुलूपात काहीतरी घोळ करून कुलूप नादुरुस्त केले आहे, अशा संशयाने आमच्याकडे पहात तो निघून जायचा. कर्मचाऱ्याकडून एकंदर हातोटी समजावून घेऊन मी थोड्या सवयीनंतर कुलूपाचे कसब आत्मसात केले. तरीदेखील कुलूपात कार्ड घातले की हिरवा कंदिल लागेपर्यंत धाकधुक असायचीच. मला कुलूपाचे रहस्य कळले तरी माझे रूमपार्टनर असलेल्या वयस्कर गृहस्थांना मात्र शेवटपर्यंत त्या कुलूपाची किमया हस्तगत झाली नाही. ते वऱ्हाडातले होते. वैतागून दरवेळी म्हणायचे,

"इचिभन काय या कुलुपाची कटकट लागून राहिली आहे. सरळ आपला नवतालचा टाळा ठोकायचा. साल्यांना डोकं नाही"

एकदा मी बाहेरून आलो तर आमचे हे पार्टनरमहाशय चक्क लॉबीत बसलेले. त्यांना कुलूप प्रसन्न झाले नव्हते म्हणून त्यांची तपश्चर्या चालली होती. तीही तब्बल तासभर. रिसेप्शनला जाऊन त्यांनी सांगितले तरी हॉटेलचा कर्मचारी उगवला नव्हता. एखाद्याचे नशीब. दुसरे काय?

कुलुपाची ही पीडा दरखेपेला त्रासदायक ठरणारी असली तरी दुसऱ्या काही गमती मात्र औरच होत्या. या पंचतारांकितवाल्यांना कुठलीही गोष्ट सरळ साधी करणे जमतच नाही. नाविन्याच्या आणि सौंदर्याच्या नावाखाली काहीतरी चमत्कारिक योजना करून राहणाऱ्याची पंचाईत

असते. क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, बॉक्सिंग, सायकलींग, याचिंग, स्वीमिंग, ॲथलेटिक्स वगैरे विविध क्रीडाप्रकारातील राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय सामना नाही असा दिवस क्वचितच इथे उगवत असावा. क्रीडास्पर्धांचे आयोजन करणाऱ्या संस्थांचे जाळेच या शहरात पसरले आहे. अनेक क्रीडापटू इथे बस्तान ठोकून बसलेले आहेत. त्याचप्रमाणे ऑस्ट्रेलियातील प्रमुख साहित्यिक, अभिनेते, संगीतज्ञ, चित्रकार यांचेही मेलबर्न हे निवासस्थान आहे. त्यामुळे या शहरात वावरताना ऑस्ट्रेलियाच्या चैतन्यमय सांस्कृतिक जीवनाचा साक्षात्कार घडतो. कलाक्रीडांच्या शौकिनांचे हे शहर कॅनबराच्या दक्षिणपूर्वेला सुमारे पाचशे किलोमीटरवर समुद्रकिनारी वसलेले आहे. कॅनबरा ही ऑस्ट्रेलियाची राजकीय राजधानी आहे. तर साहित्य, कला, क्रीडा यांचे माहेरघर असलेली मेलबर्न ही ऑस्ट्रेलियाची सांस्कृतिक राजधानी आहे.

कलाक्रीडाप्रेमी रसिकांच्या कलासक्त आणि कलात्मक जीवनामुळे असेल कदाचित् पण मेलबर्नला एक प्रकारचे खानदानी सौंदर्य प्राप्त झाले आहे. इथले रस्ते, इमारती, उद्याने, उपहारगृहे ही ऑस्ट्रेलियाच्या इतर शहरातल्याप्रमाणेच स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न आहेत. पण शहराच्या एकूण आविर्भावात रमणीय नजाकत जाणवते. इथल्या लोकांच्या बोलण्या चालण्यात नि वागण्यात एक प्रकारचा मोहक विभ्रम आहे. इथल्या रस्त्यावरची ट्रामदेखील जनानी नखऱ्याने ठुमकत ठसक्यात चालताना दिसते. रूपसुंदर कामिनीसारखे या नगरीचे स्वरूप मनोरम असल्यामुळे तिला 'दख्खनची रमणी' (The lady of the South) म्हणून ओळखले जाते.

या विलासी नगरात आमचा मुक्काम रॅडिसन या अलिशान पंचतारांकित हॉटेलात असणे हे साहजिकच होते. पण पंचतारांकित हॉटेलातील वास्तव्य जितके आरामशीर तितकेच लहानसहान बाबतीत पुष्कळदा अडचणीचे ठरते, असा अनुभव येतो. कुठल्यातरी सुखासीन राजाला सात गाद्यांखालचा केस खुपत होता अशी एक सुरस आणि चमत्कारिक कथा आहे. तसे केस खुपण्याचे त्रासदायक प्रकार पंचतारांकित ऐषआरामातही घडतात. रॅडिसन हॉटेल त्याला अपवाद नव्हते. आमच्या तीन दिवसांच्या मुक्कामात तेथेही काही किरकोळ कटकटी झाल्याच.

पहिली भानगड म्हणजे खोलीच्या किल्लीची. पंचतारांकित हॉटेलात बहुधा खोल्यांना कार्डाच्या किल्ल्या असतात. नेहमीसारखी कुलूप किल्ली नसते. प्लॅस्टीकचे कार्ड खोलीच्या मॅग्नेटिक कुलुपात विशिष्ट कोनातून आणि नेमक्या दाबाने घातले तरच कुलूप उघडते. रॅडिसनमध्येही ही सोय होती. पण आमच्या खोलीची कार्डकी अनुभवान्ती बरीच गैरसोयीची ठरली. कुठल्याही कोनातून आणि दाबाने कार्ड कुलुपात घातले तरी कुलूप उघडायला तयार होईना. दरवेळी बाहेरून आलो की कुलुपाशी झटापट आपली ठरलेली. कुलुपात लाल आणि हिरवा असे दोन चिमुकले दिवे होते. हिरवा दिवा लागला की कुलूप उघडायचे. पण आमच्या कुलुपाचा आपला सदोदित लाल बावटा चमकायचा. हिरवी झेंडी कधी लागायची नाही. अखेरीला हॉटेलच्या कर्मचाऱ्याला बोलावून कुलूप उघडायला लावण्याशिवाय दुसरा पर्याय नसायचा. तो कर्मचारीदेखील बराच प्रयासान्ती ते कुलूप उघडू शकत असे. उघडल्यानंतर मात्र आम्हीच कुलूपात काहीतरी घोळ करून कुलूप नादुरुस्त केले आहे, अशा संशयाने आमच्याकडे पहात तो निघून जायचा. कर्मचाऱ्याकडून एकंदर हातोटी समजावून घेऊन मी थोड्या सवयीनंतर कुलूपाचे कसब आत्मसात केले. तरीदेखील कुलूपात कार्ड घातले की हिरवा कंदिल लागेपर्यंत धाकधुक असायचीच. मला कुलूपाचे रहस्य कळले तरी माझे रूमपार्टनर असलेल्या वयस्कर गृहस्थांना मात्र शेवटपर्यंत त्या कुलूपाची किमया हस्तगत झाली नाही. ते वऱ्हाडातले होते. वैतागून दरवेळी म्हणायचे,

"इचिभन काय या कुलुपाची कटकट लागून राहिली आहे. सरळ आपला नवतालचा टाळा ठोकायचा. साल्यांना डोकं नाही"

एकदा मी बाहेरून आलो तर आमचे हे पार्टनरमहाशय चक्क लॉबीत बसलेले. त्यांना कुलूप प्रसन्न झाले नव्हते म्हणून त्यांची तपश्चर्या चालली होती. तीही तब्बल तासभर. रिसेप्शनला जाऊन त्यांनी सांगितले तरी हॉटेलचा कर्मचारी उगवला नव्हता. एखाद्याचे नशीब. दुसरे काय?

कुलुपाची ही पीडा दरखेपेला त्रासदायक ठरणारी असली तरी दुसऱ्या काही गमती मात्र औरच होत्या. या पंचतारांकितवाल्यांना कुठलीही गोष्ट सरळ साधी करणे जमतच नाही. नाविन्याच्या आणि सौंदर्याच्या नावाखाली काहीतरी चमत्कारिक योजना करून राहणाऱ्याची पंचाईत

करायची हा यांचा खाक्या. सरळ घास घेऊ द्यायचाच नाही. नेहमी आपला कानामागून हात नेऊन वाकडा घास घ्यायला लावायचा. आता आमच्या खोलीची बाथरूम मोठी झकास आणि ऐसपैस होती. पण पहिल्या दिवशी पाहिले तर कमोडच्या टाकीला फ्लशचा खटकाच नाही. पार सगळ्या नळांच्या तोट्या फिरवल्या. बेसिन पासून तर शॉवरपर्यंत सगळ्या गुंड्या पिरगाळल्या पण फ्लशला पाण्याचे टिपूस नाही. शेवटी कमोडपासून चार हातावर टब होता. त्या टबच्या वर असलेल्या दोन नळांच्या मध्ये एक पुशकॉक दिसला. तो दाबला तर भस्‌कन् फ्लशच्या पाण्याचा धबधबा कोसळला. हैराण होऊन पहात राहिलो. कमोड कुठे नि त्याच्या फ्लशचा कॉक कुठे. आग रामेश्वरी नि बंब सोमेश्वरी तसला प्रकार. दुसरी गंमत म्हणजे एअरकंडिशनिंगची. रात्री एकदा भलतीच थंडी वाजायला लागली. थंडावा थोडा कमी करावा म्हणून एअरकडिशनिंगचा कंट्रोल खोलीत शोधू लागलो. ही सगळी हॉटेल्स केंद्रीयरीत्या वातानुकूलित (Centrally airconditioned) असली तरी थंडावा कमीजास्त करण्यासाठी प्रत्येक खोलीत बटन असते. पण आमच्या खोलीत अर्धा तास कुडकुडत शोधले तरी बटन सापडेना. आमच्या पार्टनरसाहेबांनीही संशोधनात मला मदत केली. पण काही केल्या थंड हवा कुठून येते आहे याचा शोध लागेना. अखेरीला बऱ्याच तपासानंतर भिंतीशी असलेल्या कपाटाआड एक प्लॅस्टिकची मनगटाएवढी छोटीशी गोल जाळी सापडली. त्या जाळीमागे असलेल्या पाईमधून थंड हवेचे फुत्कार बाहेर येत होते. तिथेच खाली भिंतीशी समांतर लपलेले छोटेसे बटन होते. ते बटन सापडल्यावर एकमेकांना मिठी मारायचेच तेवढे आम्ही बाकी ठेवले होते. खोलीच्या खिडकीच्या पडद्याची अशीच रोमहर्षक कथा आहे. खोलीला एका भिंतीत संपूर्ण काचेची शोभिवंत भव्य खिडकी होती. त्या खिडकीला नायलॉनचा गुलाबी नक्षीदार झुळझुळीत पडदा होता. आमच्या पार्टनर महोदयांना एकदा तो पडदा सारून बाहेरचे दृश्य पहाण्याची दुर्बुद्धी झाली. त्यांनी हातांनी सहज पडदा सरकवला पण तो पडदा काही केल्या सरकेना. पडदा सरकवण्याची दोरी किंवा इतर काही साधन त्यांना दिसेना. पलंगावर पडल्या पडल्या मी सल्ला दिला.

"अहो जरा जोरात सारा म्हणजे सरकेल" त्यांनी जोरात पडदा

ओढला तर आख्खा पडदाच तुटून हातात आला. झालं, पार्टनर कपाळाला हात लावून मटकन खालीच बसले. पडदा तुटला, आता पडद्याची किंमत भरावी लागणार. किती डॉलर्स असेल भगवान जाणे. ते हतबुद्ध होऊन बसले असताना मी बारीक नजरेने तलास केला तर पेल्मेटच्या आत एक छोटासा खटका दिसला. तो खालीवर केला की पडद्याची उघडझाप होई. पडद्यामागचे रहस्य उलगडले तरी आता त्याचा उपयोग नव्हता. पडदाच तुटला होता. सुदैवाने आमचे रूमपार्टनर हे हिचहायकींग व ट्रेकिंगचा नाद असलेले गृहस्थ होते. त्यामुळे त्यांच्याकडे दोरा, कात्री, चाकू वगैरे दुरुस्तीची आयुधे होती. पडद्याला छोटी छिद्रे पाडून आम्ही तो पेल्मेट खालच्या दांडीला बांधून टाकला. आणि त्या प्रकारावर पडदा पडला. खोलीत सगळ्या बटनांची अशी लपवाछपवी का केली आहे हे एकदा आम्ही हॉटेलच्या कर्मचाऱ्याला विचारले. त्याने मख्खपणे उत्तर दिले.

"खोली सुंदर दिसावी म्हणून."

हॉटेलातल्या सौंदर्याचा असा प्रत्ययकारी अनुभव घेत असताना बाहेर मेलबर्न मधल्या कलादालनांच्या आणि उद्यानांच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्याचा आमचा उद्योग चालूच होता. कलादालनांमध्ये भरलेली सात आठ प्रदर्शने आम्ही पाहिली. त्यापैकी तीनचार त्याच्या वेगळेपणामुळे लक्षात राहिली आहेत. फिटझराय भागातील प्रिंटगिल्ड हे केवळ छपाई उद्योगासंबंधीचे प्रदर्शन असून त्यात ऑस्ट्रेलियातील छपाईच्या नमुन्याबरोबरच जपान, पोलंड, ब्रिटन, न्यूझीलंड आणि युरोपीय देशातील मुद्रणकलेचे विविधप्रकार पहायला मिळाले. स्क्रीन प्रिंटींग, लिथोग्राफ, वूड आणि लायनोकटस् इत्यादी छपाई तंत्रांची प्रात्यक्षिकेही बघायला मिळतात हे या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे. अबोरिजीनल डेझर्ट आर्ट गॅलरी आणि ट्रायबल आर्ट गॅलरी या दोन्ही ठिकाणी आदिवासींनी काढलेली चित्रे आणि लाकूड, चिकणमाती, बांबू, वेळू यांच्यापासून तयार केलेली वाद्ये, आभूषणे, शस्त्रे. हत्यारे, मुखवटे आणि भूताखेतांच्या मूर्ती यांचा प्रचंड आणि प्रेक्षणीय संग्रह आहे. ऑस्ट्रेलियाच्या प्राचीन इतिहासाचे आणि भूतकाळाचे दर्शन या कलादालनात घडते. फोकल पाईंट गॅलरीमध्ये फक्त काचेच्या आणि सेरॅमिकच्या कलाकृतींचे भव्य प्रदर्शन आहे. प्रत्येक वस्तू ही ऑस्ट्रेलियात तयार झालेली आहे. काचकाम आणि सेरॅमिक म्हणजे

मातीच्या भांड्यांवरील कलाकुसर करणाऱ्या सुमारे साठ ऑस्ट्रेलियन कारागिरांच्या एकापेक्षा एक रेखीव आणि कलात्मक वस्तू या प्रदर्शनात मांडलेल्या आहेत. भेटवस्तू म्हणून आणि वैयक्तिक संग्रहासाठीसुद्धा या वस्तू घेण्याचा मोह आवरणे कठीण जाते.

कलादालनांप्रमाणेच मेलबर्नमध्ये वस्तूसंग्रहालये किंवा म्युझियम्स देखील ठिकठिकाणी आहेत. त्यांचे प्रकारही विविध आहेत. दोन दिवसात सगळी मुझियम्स पहाणे शक्यच नव्हते. काही वेचक आणि वैशिष्ट्यपूर्ण पाहिली त्यात चायनीज म्युझियमचा उल्लेख आवश्यक आहे. चीनी लोक गेल्या दीडशे वर्षापासून बऱ्याच मोठ्या प्रमाणात ऑस्ट्रेलियात स्थायिक झालेले आहेत. आपल्या इकडच्याप्रमाणे चायनीज रेस्टारंटस् तिकडे बहुतेक प्रमुख शहरात आढळतात. त्या शिवाय चीनी लोकांची दुकाने आणि हॉटेल्सदेखील आहेत. मेलबर्नमधील चायना टाऊन ही ऑस्ट्रेलियातील चीनी लोकांची सर्वात जुनी वसाहत आहे. या चायना टाऊनमध्ये खाणकामगार, लाकूडकाम करणारे कारागीर, माळी, व्यापारी आणि व्यावसायिक चीनी लोक राहतात. या लोकांनी चीनी संस्कृती आणि कला जतन करण्यासाठी चायनीज म्युझियमची निर्मिती केली. या म्युझियममध्ये चीनी बनावटीच्या कलाकुसरीच्या वस्तूंचा संग्रह आहे. डाई लूंग ही जगातली सर्वात मोठी ड्रॅगनची प्रतिकृती इथे ठेवलेली आहे. चायनीज म्युझियमप्रमाणेच मेलबर्नमधून वाहणाऱ्या यारा नदीच्या काठावरचे 'मॅरीटाईम म्युझियम' हे एक अनोखे संग्रहालय आहे. या विस्तीर्ण म्युझियममध्ये 'पोली वुडसाईड' हे १८८५ साली बेलफास्टला बांधलेले जहाज जसेच्या तसे सुरक्षित ठेवलेले आहे. याशिवाय जहाजे, खलाशी आणि समुद्र यांच्या रोमांचक कथा सांगणारे विविध नमुने, छायाचित्रे आणि चित्रपट यांचा मुबलक साठा या म्युझियममध्ये पहायला मिळतो. तो पाहाताना अचाट सामुद्रिक जगाच्या अभूतपूर्व दर्शनामुळे प्रेक्षक स्तिमित होतो. या म्युझियममधील प्रचंड दर्यावर्दी जहाजे, खवळलेला अथांग सागर, साहसी खलाशी यांच्या थरारक कहाणीने काहीसे भांबावलेले आम्ही सगळे एकदम ट्रान्सफर सीन व्हावा तसे छोट्यातल्या छोट्या टीचभर वस्तूचा म्युझियम पाहायला गेलो. तो म्युझियम म्हणजे पोस्टांच्या तिकीटांचा. एक्झिबिशन स्ट्रीटवर फिलॅटलीक गॅलरीत हा म्युझियम आहे.

आमच्यापैकी बहुतेकांना लहानपणी पोस्टाची तिकीटे गोळा करण्याचा छंद होता. पुढे जीवनाच्या धकाधकीत हा निरुपद्रवी नाजूक छंद विस्मृतीत गेला होता. पण फिलॅटलीक गॅलरीतला तो पोस्टाच्या तिकीटांचा अमाप संग्रह पहाताना प्रत्येकाला आपले लहानपण आठवले. मात्र केवळ बाळपणीच्या छंदापुरतेच तिकीटांचे महत्त्व मर्यादित नाही. पोस्टाच्या तिकीटांवरून देशाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक इतिहास आणि भूगोलही कळतो. अगदी व्हिक्टोरिया राणीपासून तर आजच्या काळातील थोर व्यक्तींपर्यंत सर्वांचे चेहेरे असलेली तसेच ऑस्ट्रेलियातील सामाजिक, भौगोलिक, ऐतिहासिक घटना व स्थळे यांची चित्रे असलेली असंख्य तिकीटे इथे जतन केलेली आहेत. ती पाहताना ऑस्ट्रेलियाची आरंभापासूनची वाटचालच सूक्ष्म पण सचित्र स्वरूपात डोळ्यांसमोर उभी राहते. ऑस्ट्रेलियाच्या पोस्ट खात्याने या म्युझियमची निर्मिती केली आहे. आपल्याकडे पोस्टाने असला काही उद्योग केला आहे की नाही याची कल्पना नाही. पण बहुधा केला नसावा.

कलादालने आणि वस्तुसंग्रहालये यांच्याप्रमाणेच मेलबर्न हे शहर उद्यानांकरता प्रसिद्ध आहे. आपल्याकडच्या बंगलोरसारखेच हे उद्यानांचे शहर (Garden City) म्हणूनही ओळखले जाते. सात आठ विशाल उद्याने या शहरात आहेत. त्यापैकी सर्वात सुंदर आणि सर्वात विशाल उद्यान म्हणजे रॉयल बोटॅनिक गार्डन्स. हे विस्तृत उद्यान १८४६ साली स्थापन करण्यात आले. १९ व्या शतकातील इंग्लिश निसर्गसौंदर्याचा साक्षात्कार या उद्यानातील भूप्रदेशात होतो. हे उद्यान ९० एकर भूमीवर पसरले असून सुमारे ११००० चित्रविचित्र वृक्ष आणि वनस्पती यांचे प्रकार इथे पहायला मिळतात. पण ते पहायचे म्हणजे किमान पाच दिवस तरी हवेत आणि मैलोन्‌मैल तंगडतोड करायची तयारी हवी. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' अशी तुकाराम महाराजांप्रमाणेच आमचीही भावना असली तरी वेळ आणि शक्ती यांच्या कमतरतेमुळे नाईलाज होता. केवळ दोनतीन तासच त्या रंगीबेरंगी वृक्षाच्या संगतीत घालवून आम्ही काढता पाय घेतला.

मेलबर्नच्या तीन दिवसांच्या वास्तव्यात पहिले दोन दिवस कलादालने, म्युझियम्स आणि उद्याने पाहताना भरपूर पायपीट झाली होती. तरी बरे

की, सगळीकडे जायला वातानुकूलित बस सेवेसी हजर होती. पण एकएक कलादालन नि वस्तुसंग्रहालय इतके मोठे की तेथे चालून पायाचे तुकडे पडायची वेळ आली होती. डोळ्यांचे पारणे फिटत होते पण पायात गोळे आले होते. त्यामुळे शेवटचा तिसरा दिवस विश्रांती दिन म्हणून साजरा करायचा मनसुबा होता. पण मनचे मांडे मनातच राहिले. कारण मेलबर्नचे भूषण असलेले एक जगविख्यात स्थळ अद्याप पहायचे राहिले होते. ते पाहिल्याशिवाय मेलबर्न सोडणे म्हणजे आग्ऱ्याला जाऊन ताजमहाल न पाहता परतण्यासारखे होते. हे स्थळ म्हणजे मेलबर्न क्रिकेट ग्राऊंड. एम्. सी. जी. लंडनच्या लॉर्डस् इतकेच एम. सी. जी. हे जगात प्रसिद्ध आहे. लॉर्डस् क्रिकेटची मक्का असेल तर एम्. सी. जी. क्रिकेटची मदिना आहे.

खरं म्हणजे मेलबर्नला आलो त्याच दिवशी आम्ही सर्वप्रथम एम्. सी. जी. ला भेट देणार होतो. पण त्या दिवशी आणि दुसऱ्या दिवशीसुद्धा तिथे मॅच होती. मॅच असेल त्यादिवशी पर्यटकांना एम्. सी. जी. त प्रवेश मिळत नाही. इतर दिवशी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळात तासाभराच्या 'गाईडेड टूर' मधून एम्. सी. जी. चा फेरफटका करता येतो. आम्ही तिसऱ्या दिवशी दुपारी २ च्या टूरची तिकीटे आरक्षित केली होती. विमानातून मेलबर्नला उतरताना एम्. सी. जी. चे विहंगम दर्शन घेतले होते. एखादा प्रचंड ॲश ट्रे ठेवला असावा तसे ते ग्राऊंड शहराच्या बाहेर दिसले होते. पण प्रत्यक्ष एम्. सी. जी. त पोचल्यावर त्या स्टेडियमची भव्यता पाहून आम्ही थक्क झालो. एम्. सी. जी. शेजारच्या म्युझियमच्या इमारतीत तळमजल्यावर जाताच स्कर्ट, ब्लाऊज, कोट व टाय घातलेल्या मास्तरणीसारख्या नीरस चेहेऱ्याच्या वयस्क मार्गदर्शिकेने आमचा ताबा घेतला. एम्. सी. जी. चे महत्त्व आणि इतिहास सांगायला सुरुवात केली.

एम्. सी. जी. शेजारीच ऑस्ट्रेलियन गॅलरी ऑफ स्पोर्टस् आणि ऑलिंपिक म्युझियम आहे. त्याचे उद्घाटन १९५६ साली झालेल्या ऑलिपिक स्पर्धांच्या तिसाव्या वर्षदिनी म्हणजे २२ नोव्हेंबर १९८६ या दिवशी झाले. ही गॅलरी आणि म्युझियम उभारण्यासाठी चाळीस लाख डॉलर्स खर्च आला. प्रांतिक आणि केंद्र सरकारचे अनुदान मिळाले तरी खर्चाचा मुख्य भार मेलबर्न क्रिकेट क्लबनेच उचलला. स्पोर्टस् गॅलरीमध्ये तात्पुरती क्रीडाविषयक प्रदर्शने एका मजल्यावर भरविली जातात. दुसऱ्या

की, सगळीकडे जायला वातानुकूलित बस सेवेसी हजर होती. पण एकएक कलादालन नि वस्तुसंग्रहालय इतके मोठे की तेथे चालून पायाचे तुकडे पडायची वेळ आली होती. डोळ्यांचे पारणे फिटत होते पण पायात गोळे आले होते. त्यामुळे शेवटचा तिसरा दिवस विश्रांती दिन म्हणून साजरा करायचा मनसुबा होता. पण मनचे मांडे मनातच राहिले. कारण मेलबर्नचे भूषण असलेले एक जगविख्यात स्थळ अद्याप पहायचे राहिले होते. ते पाहिल्याशिवाय मेलबर्न सोडणे म्हणजे आग्र्याला जाऊन ताजमहाल न पाहता परतण्यासारखे होते. हे स्थळ म्हणजे मेलबर्न क्रिकेट ग्राऊंड. एम्. सी. जी. लंडनच्या लॉर्डस् इतकेच एम. सी. जी. हे जगात प्रसिद्ध आहे. लॉर्डस् क्रिकेटची मक्का असेल तर एम्. सी. जी. क्रिकेटची मदिना आहे.

खरं म्हणजे मेलबर्नला आलो त्याच दिवशी आम्ही सर्वप्रथम एम्. सी. जी. ला भेट देणार होतो. पण त्या दिवशी आणि दुसऱ्या दिवशीसुद्धा तिथे मॅच होती. मॅच असेल त्यादिवशी पर्यटकांना एम्. सी. जी. त प्रवेश मिळत नाही. इतर दिवशी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळात तासाभराच्या 'गाईडेड टूर' मधून एम्. सी. जी. चा फेरफटका करता येतो. आम्ही तिसऱ्या दिवशी दुपारी २ च्या टूरची तिकीटे आरक्षित केली होती. विमानातून मेलबर्नला उतरताना एम्. सी. जी. चे विहंगम दर्शन घेतले होते. एखादा प्रचंड ॲश ट्रे ठेवला असावा तसे ते ग्राऊंड शहराच्या बाहेर दिसले होते. पण प्रत्यक्ष एम्. सी. जी. त पोचल्यावर त्या स्टेडियमची भव्यता पाहून आम्ही थक्क झालो. एम्. सी. जी. शेजारच्या म्युझियमच्या इमारतीत तळमजल्यावर जाताच स्कर्ट, ब्लाऊज, कोट व टाय घातलेल्या मास्तरणीसारख्या नीरस चेहेऱ्याच्या वयस्क मार्गदर्शिकेने आमचा ताबा घेतला. एम्. सी. जी. चे महत्त्व आणि इतिहास सांगायला सुरूवात केली.

एम्. सी. जी. शेजारीच ऑस्ट्रेलियन गॅलरी ऑफ स्पोर्टस् आणि ऑलिंपिक म्युझियम आहे. त्याचे उद्‌घाटन १९५६ साली झालेल्या ऑलिपिक स्पर्धांच्या तिसाव्या वर्षदिनी म्हणजे २२ नोव्हेंबर १९८६ या दिवशी झाले. ही गॅलरी आणि म्युझियम उभारण्यासाठी चाळीस लाख डॉलर्स खर्च आला. प्रांतिक आणि केंद्र सरकारचे अनुदान मिळाले तरी खर्चाचा मुख्य भार मेलबर्न क्रिकेट क्लबनेच उचलला. स्पोर्टस् गॅलरीमध्ये तात्पुरती क्रीडाविषयक प्रदर्शने एका मजल्यावर भरविली जातात. दुसऱ्या

मजल्यावर विविध क्रीडांवरचे चित्रपट पाहण्यासाठी थिएटर व कॉफीशॉप आहे. तिसऱ्या मजल्यावर एक कायमचे प्रदर्शन आणि ऑलिंपिक म्युझियम आहे. क्रिकेटशिवाय बहुतेक सर्व खेळातील वस्तू या म्युझियममध्ये व प्रदर्शनात ठेवलेल्या आहेत. १८५८ साली लिहिलेला फुटबॉलच्या नियमांचा मूळ हस्तलिखित कागद, १९६८ साली टोकियोत जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धा जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या लिऑनेल रोझचे बॉक्सिंग ग्लोव्हज्, १९५६ साली मेलबर्नला झालेल्या ऑलिंपिक स्पर्धांची छायाचित्रे, १८९६ साली अथेन्सच्या ऑलिंपिकमध्ये ऑस्ट्रेलियाच्या एडविन फ्लॅकने जिंकलेली पदके, १९२४ साली पॅरिसमध्ये बॉब ब्राडबेन्ट या ऑस्ट्रेलियन सायकलपटूला मिळालेला डिप्लोमा अशी ऑस्ट्रेलियाच्या ऑलिंपिक स्पर्धातील पराक्रमाचे स्मरण करून देणारी बरीच स्मृतिचिन्हे ऑलिंपिक म्युझियममध्ये आहेत.

वरील वर्णन केल्यावर ऑलिंपिक म्युझियम आणि स्पोर्टस् गॅलरी पाहण्याची इच्छा आहे काय असे आमच्या मार्गदर्शिकेने विचारले. पण आम्ही लगेच होकार भरला नाही. कारण आम्हाला उत्सुकता होती ती क्रिकेट ग्राऊंड पाहण्याची. आमची अनिच्छा पाहून मार्गदर्शिका हसत म्हणाली,

"यू इंडियन्स आर ऑल क्रिकेट लव्हर्स, आय नो. सो लेट अस गो टू एम्. सी. जी. ओ. के?"

पण तिने आम्हाला सरळ स्टेडियममध्ये नेलेच नाही. स्टेडियमभोवतीचा मेलबर्न क्रिकेट क्लब प्रथम दाखविण्यास सुरुवात केली. मेलबर्न क्रिकेट क्लब ही ऑस्ट्रेलियातील सर्वात जुनी आणि प्रतिष्ठित क्रीडासंस्था आहे. क्लबतर्फे केवळ क्रिकेटचेच सामने नव्हे तर फुटबॉल, हॉकी, सायकलिंग, बेसबॉल, टेनिस इत्यादी विविध क्रीडास्पर्धा आयोजित केल्या जातात. क्लबच्या पूर्ण सभासदांची संख्या सध्या ३८००० आहे आणि मर्यादित सभासद १८००० आहेत. मर्यादित (restricted) सभासदांना क्लबच्या सर्व कार्यामध्ये सहभागी होता येत नाही. क्लबचे सभासद होणे ही अतिशय मानाची गोष्ट समजली जाते. त्यामुळे अनेकजण सभासद होण्यास इच्छुक असतात. पण सभासदत्व सहजासहजी मिळत नाही. ज्याला सभासद करून घ्यायचे ठरते त्याचे नाव प्रतीक्षा यादीत (waiting list) समाविष्ट करण्यात येते. सध्या प्रतीक्षा यादीत एक लाख पाच हजार लोक रांगेत

आहेत. प्रतीक्षा यादीतील लोकांना प्रथम मर्यादित सभासदत्व मिळते आणि नंतर काही वर्षांनी पूर्ण सभासदत्व देण्यात येते. मात्र या क्लबचे वैशिष्टय असे की, क्लबची फी अतिशय कमी आहे. ऑस्ट्रेलियातील एक स्वस्त क्लब म्हणून हा ओळखला जातो.

आमच्यापैकी कोणालाही सभासद व्हायचे नव्हते. पण गंमत म्हणून एकजण म्हणाला,

"फी कमी असेल तर आम्हीदेखील सभासद होऊ." त्यावर मार्गदर्शिका म्हणाली,

"हो. पण तुम्ही अर्ज केला तर सुमारे बारा ते पंधरा वर्षांनी तुम्हाला मर्यादित सभासदत्व मिळेल आणि पूर्ण सभासदत्वासाठी कदाचित् तीस वर्षे थांबावे लागेल. इथले लोक मुलगा शाळेत जाऊ लागला की, लगेच त्याच्या नावाने सभासदत्वाचा अर्ज करून ठेवतात. त्यामुळे तो पंचविशीत पोचला की त्यावेळी त्याला सभासदत्व मिळते."

आम्ही लगेच शंका उपस्थित केली,

"म्हणजे फक्त मुलगाच सभासद होऊ शकतो का? स्त्रीयांना इथे मज्जाव आहे काय?"

"नाही. आता स्त्रीदेखील सभासद होऊ शकते. पूर्वी हा फक्त पुरुषांचा क्लब होता. पण १९८४ पासून स्त्रीयांना क्लबमध्ये प्रवेश देण्यात येऊ लागला. मी स्वतः क्लबची सभासद आहे. पूर्वी माझा नवरा फक्त सभासद होता. पाच वर्षापूर्वी मलाही सभासदत्व मिळाले." मार्गदर्शिका छातीवरचा सदस्यत्वाचा बिल्ला दाखवत म्हणाली.

मार्गदर्शिकेच्या मागोमाग काचेच्या प्रशस्त सुळसुळीत दरवाजातून आम्ही क्लबच्या इमारतीत प्रवेश केला होता. ही इमारत स्टेडियमच्या भोवतीच अर्धगोलाकार बांधलेली आहे. जमीनीवर सर्वत्र रंगीत, गुबगुबीत कार्पेटस अंथरलेल्या आहेत. जिन्यातल्या पॅसेजमधल्या भिंतीवर क्रिकेट आणि इतर खेळांच्या सामन्यांची चित्रे आणि छायाचित्रे लावलेली आहेत. क्लबमध्ये सभासदत्व मिळणे ही मोठी दुष्कर गोष्ट आहे. हे आमच्या मनावर बिंबले होते. त्यामुळे 'मेंबर्स हॉल' च्या पहिल्या मजल्यावरच्या विस्तृत जागेत जाताच आम्ही जरा बिचकूनच आदराने उभे राहिलो. मेंबर्स हॉलमध्ये भिंतीवर एक प्रचंड म्युरल आहे. त्यात १८६२ साली मेलबर्न

क्रिकेट ग्राऊंड कसे दिसत होते याचे दृश्य चित्रित केले आहे. ते पाहताना एखाद्या खेडे गावातील ओबडधोबड मैदान पाहत असल्याचा भास होतो. या मेंबर्स हॉल मधून 'लाँगरूम' या मोठ्या लांबट खोलीत जाता येते. 'लाँगरूम' हे नाव असले तरी ही खोली रुंदीलासुद्धा बरीच मोठी आहे. इथून क्रीडांगणावरील मॅचचे उत्तम आणि संपूर्ण दृश्य दिसते. इथे सभासदांना बसायला आरामशीर खुर्च्या तसेच वृद्ध सदस्यांसाठी मऊ फोमचे कोच ठेवलेले आहेत. मागच्या बाजूला चकचकित उपहारगृह आणि बार आहे. तेथे खाद्यपेये आणि मद्य मिळू शकते. मद्याचे घुटके घेत इथल्या सुखासीन आसनांवर बसून मॅच पाहणे हा एक वेगळाच अनुभव असणार. पण तो केवळ सभासदांच्याच नशीबात आहे. कारण या रूममध्ये मॅचच्या दिवशी फक्त सभासदांनाच प्रवेश आहे आणि तोही क्लबने ठरवलेल्या औपचारिक वेशात. तो वेश न घालता सभासद आला तर त्याला आत येण्यास मनाई आहे. लाँगरूमशेजारी एम्. सी. जी. चा पॅव्हेलियन आहे. या पॅव्हेलियनच्या बाजूला प्लेअर्स ड्रेसिंगरूम. ही ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंसाठी. तेथे लॉकर्स असलेली कपाटे, बाथरूम्स, आरसे वगैरे सोयी आहेत. परदेशी खेळाडूंची ड्रेसिंगरूम पॅव्हेलियनच्या दुसऱ्या टोकाला आहे. लाँगरूममधून बाहेर आल्यावर जिना चढून वर गेले की कॉरीडारमध्ये क्लबचा चित्रसंग्रह आहे. सबंध लांबलचक कॉरीडारमध्ये भिंतीवर क्लबतर्फे आयोजित केलेल्या क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, टेनिस, बेसबॉल इत्यादी खेळांच्या प्रमुख आणि गाजलेल्या सामन्यांची छायाचित्रे माहितीसह लावलेली आहेत. या कॉरीडारमध्ये फेरी मारली की मेलबर्न क्रिकेट क्लबचा आरंभापासूनचा चित्ररूप इतिहासच डोळ्यांसमोर उभा राहतो.

कॉरीडारच्या पलीकडून एका उघड्या पॅसेजमधून मार्गदर्शिकेने आम्हाला आत नेले. त्याबरोबर एकदम विशाल रंगभरा देखावा समोर उलगडावा तसे उन्हात झळकणारे अफाट मेलबर्न क्रिकेट ग्राऊंड रंगीबेरंगी चित्रासारखे आमच्या नजरेसमोर प्रकटले. दूरदर्शनवर असंख्य वेळा पाहिलेले चिरपरिचित दृश्य प्रत्यक्षात प्रकटल्याचा आम्हाला भास झाला. हिरवा, मखमली गालिचा अंथरावा तशी स्वच्छ, तलम, सपाट हिरवळ त्या अंडाकृती मैदानावर पसरली होती. मॅचमध्ये खेळाडू कॅच घेताना अगर चेंडू अडवताना स्वतःला मैदानावर बेलाशक झोकून देताना पाहिले होते.

त्याचे रहस्य ती दाट मुलायम हिरवळ पाहताना लक्षात येत होते. हिरवळीवर ठायीठायी उडणाऱ्या पाण्याच्या शुभ्र फवाऱ्यांमुळे मैदान हिरवेगार ताजे नि टवटवीत दिसत होते. रात्रीच्या सामन्यांसाठी स्टेडियमच्या चार कोपऱ्यातून डोकावणारे उत्तुंग दीपस्तंभ उन्हात लखलखत होते. मैदानाभोवती लाल, निळ्या, हिरव्या, पांढऱ्या खुर्च्यांनी भरगच्च, गोलाकार, तिमजली स्टेडियम रंगीबेरंगी चमकत होता. दूरदर्शनवर सामने पाहताना असंख्य वेळा हे गाऊंड पाहिले असले तरी ते प्रत्यक्ष दिसताच अंगावर नकळत रोमांच उठले. चित्रात ताजमहाल अगणित वेळा पाहिला असला तरी तो प्रत्यक्ष पाहताच विस्मित झाल्यासारखे होते तसे आम्ही त्या ग्राऊंडच्या दर्शनाने थबकून उभे राहिलो.

मार्गदर्शिकि पाठोपाठ आम्ही पायऱ्या उतरून आत गेलो. हिरव्या खुर्च्यांवर बसलो. ग्राऊंडवर कुठलाही सामना चालू नव्हता. मैदान ओकेबोके होते. स्टेडियम सुनासुना होता. तरी ते मोकळे सुंदर प्रसन्न रंगीत दृश्य डोळ्यात साठवत आम्ही स्वस्थ बसून राहिलो. मार्गदर्शिका माहिती सांगत होती.

"मेलबर्न क्रिकेट ग्राऊंड हे एक ऐतिहासिक मैदान आहे. अनेक संस्मरणीय क्रिकेट मॅचेस इथे झालेल्या आहेत. नाणावलेले अनेक खेळाडू या ग्राऊंडवर हजेरी लावून गेले आहेत. हे ग्राऊंड १८५३ सालापासून इथे आहे. म्हणजे या ग्राऊंडला आता १४१ वर्षे झाली आहेत."

आम्ही चकित झालो. आम्हाला तर ते ग्राऊंड आणि तो स्टेडियम नुकताच काल बांधल्यासारखा लख्ख नि कोरा दिसत होता.

"या स्टेडियम साठी एकंदर १८ एकर जमीन लागली. कंपाऊंड ते कंपाऊंड या स्टेडियमची लांबी १७२ मीटर आहे. तर रुंदी १४८ मीटर आहे. आतील परीघ ९१४ मीटर असून प्रत्यक्ष मैदानाचा परीघ ५१९ मीटर आहे."

मार्गदर्शिकेने आकडेवारीत स्टेडियमची मर्यादा सांगितली. तरी आमच्या नजरेला त्या ऐसपैस स्टेडियमचे सौंदर्य आणि सुबकता अमर्याद भासत होती.

"या स्टेडियमवर ९७५०० लोक खुर्च्यांवर बसून मॅच पाहू शकतात. ४५०० लोक उभे राहू शकतात. याशिवाय ३०० अपंग

लोकांसाठी मॅच पाहण्याची सोय आहे. म्हणजे या ग्राऊंडची एकूण प्रेक्षकांची क्षमता १०२३०० आहे. एवढा मोठा स्टेडियम ऑस्ट्रेलियात दुसरा नाही. कदाचित् जगातही नसेल. तुमच्या कलकत्त्याचा इडन गार्डन्स हा स्टेडियम मोठा आहे, असे ऐकले आहे. पण त्याची क्षमता मला माहीत नाही. तो इतका मोठा आहे काय?"

इडन गार्डन्समध्ये एकंदर किती लोक बसू शकतात याचा नक्की आकडा आम्हालाही माहीत नव्हता. त्यामुळे आम्ही काहीच उत्तर दिले नाही. उलट आमच्यापैकी कोणीतरी तिलाच प्रश्न केला.

"हे ग्राऊंड, हा स्टेडियम इतका स्वच्छ धुतल्यासारखा आणि लखलखीत कसा?"

मार्गदर्शिका हसत म्हणाली,

"हे ग्राऊंड स्वच्छ धुतल्यासारखे आहे कारण ते स्वच्छ धुतलेले आहे म्हणून."

"इथे केरकचरा कधी होतच नाही का? मॅचच्या वेळी होत असेलच."

"होतो. मॅचच्यावेळी प्रचंड प्रमाणात लोक कचरा करतात. बीअर आणि कोकचे कॅन्स, कागदाचे बोळे, सिगरेटची पाकिटे, खाण्याचे कागद सर्व तऱ्हेचा कचरा लोक ग्राऊंडवर आणि स्टेडियममध्ये टाकत असतात. मॅचच्या दिवशी फुलहाऊस असले तर सुमारे २०० टन कचरा जमा होतो. तो साफ करायला आमचे नेहमीचे १०० कर्मचारी अपुरे पडतात म्हणून तात्पुरते जादा दीडशे लोक कामावर लावावे लागतात. आम्ही सगळीकडे सूचना लावलेल्या आहेत. बोर्डस् लावले आहेत. पण त्याचा उपयोग होत नाही. आपण हे असे आहोत. प्रचंड गर्दी झाली की, कचरा करतोच. वी आर लाईक दॅट ओन्ली. इलाज नाही." मार्गदर्शिकेने कडवट चेहेऱ्याने ओठ वाकडे करत खंत व्यक्त केली.

मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडच्या त्या नयनरम्य आणि रोमहर्षक परिसरावर शेवटची नजर फिरवत आम्ही स्टेडियममधून बाहेर पडलो ते थोडेसे नवल करीतच, रस्ते, बागा, घरे, विमानतळ इतकी सुंदर आणि स्वच्छ राखणारे ऑस्ट्रेलियन लोक ग्राऊंडवर आल्यानंतर इतका कचरा करतात ही विसंगती आम्हाला गोंधळात टाकणारी होती. पण तेवढ्यात आमच्यातले

एक गृहस्थ सार्वत्रिक सत्य बोलून गेले,

"अरे भाई, जमाव जमला की हे होणारच. भारतीय काय नि ऑस्ट्रेलियन काय, माणसं सगळीकडे सारखीच. प्रेक्षक हे अखेरीला प्रेक्षकच."

शेवटी जाता जाता आता एकच गोष्ट पाहायची राहिली होती. ती म्हणजे प्रवेशद्वाराजवळच्या इमारतीतला मेलबर्न क्रिकेट क्लबचा क्रिकेट म्युझियम. तेथे पोचताच म्युझियमचा असिस्टंट क्युरेटर जॉन हॅनसन याच्या ताब्यात मार्गदर्शिकेने आम्हाला सोपविले आणि ती आमचा निरोप घेऊन गेली ती प्रवेशद्वाराशी ताटकळत असलेल्या प्रवाशांच्या दुसऱ्या गटाला एम्. सी. जी. च्या टूरवर नेण्यासाठी.

जॉन हॅनसन हा हिटलरछाप मिशांचा, बारीक डोळ्यांचा, तुळतुळीत टकलाचा हसरा गृहस्थ होता. म्युझियम दाखवणे, माहिती देणे वगैरे औपचारिक गोष्टींवर त्याचा विश्वास नव्हता. आमचे सस्मित स्वागत करून तो म्हणाला,

"यू आर फ्रॉम इंडिया. कंट्री ऑफ क्रिकेटफॅन्स. या म्युझियममध्ये क्रिकेटर्सची दुर्मिळ छायाचित्रे आहेत. क्रिकेटर्सनी वापरलेले खेळण्याचे साहित्य, त्यांनी मिळवलेली पदके, पेले आणि त्यांना मिळालेली मानपत्रे वगैरे चीजवस्तू आहेत. सगळ्यांवर नावे लिहिली आहेत. तपशीलवार माहिती दिलेली आहे. तुम्ही स्वतःच सगळीकडे हिंडून पाहा. मी तुम्हाला डिस्टर्ब करणार नाही. काही शंका आलीच तर मी इथे आहेच. आय ॲम ॲट युवर सर्विस. फक्त एकच सूचना. डोन्ट टच एनिथिंग. ओ. के.?"

जॉनने सांगितले ते खरेच होते. म्युझियममधील प्रत्येक वस्तू आणि छायाचित्र स्वयंस्पष्ट होते. म्युझियममध्ये हिंडताना साहजिकच सर डोनाल्ड ब्रॅडमन यांचे अस्तित्त्व स्मृतिचिन्हाच्या रुपाने सतत जाणवत होते. हा अद्वितीय क्रिकेटपटू सध्या ॲडलेडला जवळजवळ अज्ञातवासात संपूर्ण संन्यस्त जीवन जगत असला तरी तो जगभरच्या क्रिकेटप्रेमींचे दैवत आहे. जीवन्तपणीच ब्रॅडमन ही एक आख्यायिका झालेली आहे. ऑस्ट्रेलियात तर त्याच्याइतका मान दुसऱ्या कुठल्याच क्रिकेटवीराला नाही. त्यामुळे ब्रॅडमनने वापरलेल्या वस्तूंनी आणि त्याला मिळालेल्या मानचिन्हांनी म्युझियमचा बराच भाग व्यापलेला आहे. त्याने त्रिशतके करताना वापरलेल्या निरनिराळ्या

बॅटस्, त्याचे कपडे, ग्लोव्हज्, बूट, पॅडस् वगैरे सर्व साहित्य काचेच्या कपाटामध्ये मांडून ठेवलेले आहे. ब्रॅडमनचे एक भव्य रंगीत तैलचित्र भिंतीवर लावलेले आहे. त्या तैलचित्रासमोर फोटो काढून घेण्याची प्रेक्षकांमध्ये अहमहमिका लागते. ब्रॅडमनने आयुष्यभरात काढलेल्या शतकांचा तपशील एका ब्रासच्या मोठ्या फलकावर कायमचा कोरून ठेवलेला आहे. ब्रॅडमनची छायाचित्रे तर अक्षरशः अगणित आहेत. ब्रॅडमनशिवाय सोबर्स, लिंडवाल, हॅसेट, वॉरेल, हॅमंड यांच्यापासून तर अगदी अलिकडच्या रिचर्डस्, होल्डिंग, बोथम, गॉवर, लिली आणि ॲलन बॉर्डरपर्यंत अनेक क्रिकेटपटूंची छायाचित्रे त्यांच्या कामगिरीच्या वर्णनासह इथे आढळली. पण आश्चर्य असे की, लाला अमरनाथच्या टीमपासून तर १९८५ सालच्या गावसकरच्या टीमपर्यंत भारतीय खेळाडूंनी ऑस्ट्रेलियात चांगली कामगिरी केली असूनही तिचा सुगावा हा म्युझियम पाहात असताना फारसा कुठे लागला नाही. कोणत्याही भारतीय क्रिकेटपटूचे छायाचित्र लावलेले निदान मला तरी दिसले नाही. अगदी गावसकरचे किंवा कपिलदेवचे सुद्धा नाही. कुठे ग्रुप फोटोत असले तर सांगता येत नाही. ग्रुपफोटो बारकाईने पाहण्याइतकी सवड मिळाली नाही. पण हा म्युझियम काही फक्त ऑस्ट्रेलियन क्रिकेटर्सपुरता नव्हता तर एम्. सी. जी. वर खेळलेल्या जगभरच्या क्रिकेट खेळाडूंचा होता. त्यामुळे अमरनाथ पासून तर गावसकर पर्यंत कोणाचेही वेगळे छायाचित्र इथे असू नये हे आम्हाला साहजिकच खटकले.

बाहेर पडताना आमचा निरोप घ्यायला जॉन दाराशी उभा होताच. आम्ही विचारले,

"इथे भारतीय खेळाडूचे एकही चित्र नाही का?"

त्यावर तो शहाजोगपणे म्हणतो,

"नाही? नाही दिसले तुम्हाला?"

"नाही. एकही नाही."

कसनुसे हसत त्याने आमचे सांत्वन केले,

"जंटलमेन, भारतीय प्लेअर्सची भरपूर चित्रे आमच्याकडे आहेत. पण ती आमच्या गोडाऊनमध्ये बॉक्सेस आहेत, त्यात ठेवली आहेत. तुम्ही पाहिलंच आता किती गर्दी झाली आहे. म्युझियममध्ये चित्रे लावायला जागाच नाही. पण आमचा एक्सटेंशनचा विचार चालला आहे, जागा

आणखी वाढली की, ती चित्रे लावू. आय प्रॉमिस यू. पुढच्या वेळेला तुम्ही याल तेव्हा तुम्हाला भारतीय खेळाडूंची चित्रे इथे दिसतील. शुअर. नेक्स्ट टाईम. पुढच्या वेळी नक्की"

ही पुढची वेळ केव्हा येणार होती हे कोणालाच सांगता येणार नव्हते. त्याला नि आम्हालाही.

■

# स्वॉन सॉंग

भूप्रवास
682

पर्थ ही पश्चिम ऑस्ट्रेलिया प्रांताची राजधानी आहे. सुमारे दहा लाख वस्तीची ही शांत समृद्ध नगरी सगळ्या देशाशी फटकून, ऑस्ट्रेलियाच्या पश्चिम किनाऱ्यावर दक्षिणेकडे थोडीशी एकाकी वसली आहे. मेलबर्नपासून सुमारे सतराशे मैल लांब असलेले पर्थ, परदेशी प्रवाशांसाठी दुहेरी भूमिका बजावते. तुम्ही सिंगापूरहून आलात तर पर्थ हे ऑस्ट्रेलियाचे प्रवेशद्वार आहे. पण तुम्ही हाँगकाँगहून ब्रिस्बेनमार्गे आलात तर पर्थ हे तुमच्यासाठी 'एक्झिट' किंवा निरोपद्वार आहे. आम्ही हाँगकाँगहून आलो होतो. आमच्या ऑस्ट्रेलियाच्या सफरीतला पर्थ हा शेवटचा टप्पा होता. प्रवासाचा अंत जवळ आला की, प्रवाशाचे मन काहीसे कातर होते. शेवटच्या ठिकाणाबद्दल उगाच उदास जवळिक निर्माण होते. पर्थच्या वास्तव्यात आमची हुरहुर अधिकच वाढली ती शहराला कुरवाळत जाणाऱ्या प्रसन्न, सुंदर स्वॉन नदीमुळे. पर्थला इतर ऑस्ट्रेलियन शहरांप्रमाणेच आकर्षक पर्यटनस्थळे आहेत. वेलिंग्टन स्ट्रीट, मरे स्ट्रीट सारखे प्रशस्त रस्ते आहेत. बर्सवूडपार्क, किंग्ज पार्कसारखी अफाट उद्याने आहेत. वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, क्रिएटिव्ह नेटिव्ह, ग्रीनहिल सारख्या उत्कृष्ट आर्टगॅलरीज

आहेत. सनसेट कोस्टसारखे अप्रतिम समुद्रकिनारे आहेत. हॉल कलेक्शन, अव्हिएशन म्युझियम, वेस्टर्न ऑस्ट्रेलियन म्युझियम यासारखी प्रेक्षणीय वस्तुसंग्रहालये आहेत. बर्सवूडसारखे मोहक कॅसिनो आहेत. कॅमेलिअर कॅमल पार्क, कव्हर्शम वाइल्ड लाईफ पार्क, पर्थ झू सारखी दुर्मिळ प्राणीसंग्रहालये आहेत. मायर्स, अरिहन्स, कोल्ससारखे प्रचंड डिपार्टमेंटल स्टोअर्स आहेत. प्लाझा आर्केड, सिटी आर्केडसारखे विस्तीर्ण शॉपिंग आर्केडस् आहेत. पर्थला सिंगापूरपेक्षाही सर्व वस्तू स्वस्त मिळतात. कारण इथे सेल्स टॅक्स आकारला जात नाही. त्यामुळे पर्थ हा खरेतर ग्राहकांचा स्वर्ग (Shopper's Paradise) आहे. याशिवाय ॲडव्हेंचर वर्ल्ड, अंडर वॉटर वर्ल्ड यासारखी करमणुकीची स्थळे आणि क्रिकेट ग्राऊंड वगैरे सर्व शहरी आकर्षणे पर्थला आहेत. पण पर्थची खरी शान आहे, या सर्वांगसुंदर शहराला कवटाळत वाहणारी स्वॉन नदी.

ऑस्ट्रेलियात आम्ही नद्या बऱ्याच पाहिल्या. ब्रिस्बेन, मरे, यारा, डार्लिंग या विशाल नद्या आम्ही जवळून पाहिल्या. आणखी कितीतरी प्रवासात, बसमधून ओलांडल्या. ऑस्ट्रेलियातील या सर्व नद्यांची अपूर्वाई अशी की सगळ्या आपल्या दुथडी भरून तुडुंब वाहणाऱ्या. कोरडे ठणठणीत खडकाळ पात्र आणि मध्येच कुठेतरी नावाला पाण्याचा ओघळ किंवा डबके असा प्रकार अजिबात नाही. सनशाईन कोस्टची नूसा ही तशी छोटी स्थानिक नदी. पण ती देखील वाहत्या पाण्याने काठोकाठ भरलेली. अजगरासारखी तट्ट फुगलेली. सगळ्याच नद्या उन्मत्त यौवनात असल्यासारख्या. पूर्ण बहरातल्या. पण तरी देखील स्वॉनचा दिमाख आणि ऐट काही वेगळीच होती. स्वॉनच्या शेजारीच उंच टेकाडावर किंग्ज पार्क हे रमणीय उद्यान पसरले आहे. या उद्यानातून पर्थ शहराचे आणि स्वॉन नदीचे मनोहर दृश्य दिसते. हे उद्यान स्वॉनच्या काठाकाठाने उतरत दूरपर्यंत गेलेले आहे. उद्यानातून स्वॉनच्या सोबतीने दुतर्फा झाडांच्या गर्दीतून जाणाऱ्या रस्त्याने आमची बस जाऊ लागली. तसा डावीकडे एकसारखा स्वॉनच्या नितळ, अस्मानी प्रवाहाचा प्रशस्त देखावा दिसत होता. आमच्या बसचा चालक नि मार्गदर्शक डेव्हिड हा तर स्वॉनच्या प्रेमातच पडलेला होता. वयस्कर असला, तरी त्याची अंगकाठी बरीच मजबूत होती. चेहेरा रुक्ष नि चौकोनी. शिवाय वरती सोल्जरकट. पण बेट्याचे निळसर घारे

डोळे मोठे बोलके नि काव्यात्म होते. डोळे मिचकावत त्याने विचारले,

"स्वॉन हे नाव का पडले असावे, माहीत आहे?"

आम्ही परदेशी. आम्हाला कसे माहीत असणार?

स्वॉनच्या प्रवाहाकडे डोळे भरून पाहात मग तोच म्हणाला,

"या प्रवाहाकडे पाहा म्हणजे तुम्हाला कळेल. स्वॉनला तुमच्या भाषेत काय म्हणतात?"

"हंस." आम्ही उत्तरलो.

"त्या हंसाचे चालणे कसे असते? पाण्यातून हंस कसा तरंगत जातो? संथ, सहज आणि रुबाबात. तसा हा नदीचा प्रवाह वाहतो आहे. हंस गतीने. कुठे लाटा नाहीत. कुठे खळबळ नाही. कुठे घाई नाही. सगळा बादशाही थाट. हंसासारखा. डौलदार. म्हणून स्वॉन नदी. आणखी एक कारण आहे." डेव्हिड इंग्रजीतून बोलताना 'हंस'चा उच्चार 'हौंसा' असा करीत होता. पण तिकडे कानाडोळा करीत आम्ही विचारले,

"कुठले?"

"हा नदीचा काठ पाहा. पात्र पाहा. पात्रात काय दिसते पाहिले तुम्ही? हंस. कितीतरी हंस या नदीत विहार करताना दिसतील. इतके दुसऱ्या कुठल्याच नदीत नाहीत. ही हंसांची आवडती नदी आहे. म्हणून ही स्वॉन."

डेव्हिडने उंचावर, मोकळ्याजागी बस थांबविली तिथे कठडा बांधला होता. बाक ठेवले होते. वर झाडांची छाया होती. आम्ही उतरलो तर स्वॉनचा तो निळसर पाऱ्यासारखा चमकणारा प्रचंड जलाशय एकदम समोर उमटला. खरोखरच काठापाशी, प्रवाहाच्यामध्ये ठिकठिकाणी हंसांचे कळप तरंगत होते. काही भुरे, काही काळे, काही शुभ्र पांढरे. पण सगळे कसे बेफिकीर मस्तीत पाण्यात सरकत होते. एकच हंस फक्त पुढे त्यामागे त्रिकोणात सगळे शिस्तीत. कुठे फडफडाट नाही. गडबड नाही. गोंधळ नाही. सभोवारच्या जगाची दखल नाही. त्यांचा तरंगता जलप्रवास चालूच. सावकाश. विनासायास नि थाटात.

बस चालू झाली तसे डेव्हिडचे स्वॉनप्रेम पुन्हा उतू जाऊ लागले.

"स्वॉन ही जगातल्या सर्वात शुद्ध नद्यांपैकी एक आहे. या नदीचे पाणी अतिशय स्वच्छ आहे. प्रदूषणाचा संसर्ग हिच्या प्रवाहाला फारसा झालेला नाही. फक्त एकच गालबोट आहे. स्वानचे पाणी खारे आहे. गोड नाही."

नदीच्या पलीकडच्या तीरावर पर्थची वस्ती आम्हाला दिसत होती. निळेशार तलावासारखे ओतप्रोत, संथ पाणी आणि पलीकडे लाल कौलारू टुमदार घरे. पर्थला सिडनी किंवा मेलबर्नसारख्या टोलेजंग इमारती फारशा नाहीत. फक्त शहराच्या मध्यभागी व्यापारी भागात तेवढा उत्तुंग इमारतींचा एक गुच्छ दिसतो. मोटारींचा सुळसुळाटही इथे फारसा जाणवला नाही. आम्ही उतरत होतो, त्या पार्कातील रस्त्यावर तर अजिबातच रहदारी नव्हती. इथे प्रस्थ आहे ते बोटींचे. नदीच्या प्रवाहात जसे हंस होते, तशा पांढऱ्या शुभ्र लहान लहान असंख्य बोटी डोलत होत्या. काही शिडांच्या तर काही वल्ह्यांच्या नावा. काही मोटारबोटी तर काही लाँचेस. विविध आकाराच्या नि प्रकाराच्या बोटींचे सफेत चकाकते ठिपके विस्तीर्ण प्रवाहावर हलत झुलत नि सरकत होते. कागदाच्या चिमुकल्या होड्यांप्रमाणे त्या असंख्य बोटी लहरींवर लवथवताना दुरून दिसत होत्या. स्वॉनच्या साहचर्यामुळे पर्थवासीयांना नौकानयनाचे विलक्षण वेड आहे. दहा लाख लोकसंख्येच्या शहरात सुमारे एक लाख बोटी आहेत. म्हणजे प्रत्येक दहा माणसांमागे एक बोट.

डेव्हिडने स्वॉनच्या तीरावर गाडी पुन्हा थांबविली ती एका बोट क्लबजवळच. बोट क्लबच्या छोट्याशा इमारतीसमोर पाण्यात शंभर सव्वाशे बोटींचा थवा डुलत डचमळत होता. असे सुमारे पन्नासच्यावर बोट क्लबज् स्वॉनच्या तीरावर आहेत.

"स्वॉन नदी ही जगभर प्रसिद्ध आहे ती बोट रेसिंग आणि वॉटरस्पोर्टस्‌साठी. नदीचे पाणी अतिशय संथ आणि शांत असल्यामुळे याचिंग आणि बोटरेसिंग तसेच वॉटरस्कीईंग वगैरे जलक्रीडांच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा इथे नेहमी होत असतात." डेव्हिड सांगत होता.

स्वॉनच्या पात्रात हिंडणाऱ्या बोटी पाहताना आम्हाला एकदम आठवण झाली. पर्थच्या क्रीडांगणावर झालेले क्रिकेट सामने आम्ही दूरदर्शनवर पाहिले होते. ओव्हर्सच्यामध्ये तसेच चहापानाच्या किंवा जलपानाच्या वेळात स्वॉन नदीच्या पात्रात विहार करणाऱ्या बोटींची आणि स्वॉनच्या विशाल जलाशयाची सुरेख दृश्ये दूरदर्शनवर अनेकदा दाखविण्यात आली होती. त्यांचे स्मरण होताच आम्हाला स्वॉनची ओळख पटली. वेगळ्याच आपुलकीने स्वॉनचे लोभस रूप आम्ही एकटक न्याहाळू लागलो. दूरदर्शनने

जग किती जवळ आणले आहे त्याचे भान आम्हाला झाले.

"इतक्या बोटी या नदीत सतत फिरत असतात. बोटींच्या स्पर्धा इथे होतात. मग स्वॉनचे पाणी प्रदूषित होत नाही का?" आमच्यापैकी कोणीतरी शंका काढली.

"नाही. फारसे नाही. एकतर या सर्व बोटी तपासून मगच त्यांना नदीत जाण्याची परवानगी देण्यात येते. नदीच्या पाण्यात घाण केली तर त्यासाठी जबर दंडाची शिक्षा आहे. शिवाय मुख्य म्हणजे पाणी खारे असल्यामुळे प्रदूषणाला फारसा वाव नाही." डेव्हिड म्हणाला.

चारशे हेक्टर विस्तारलेल्या टेकडीवरील किंग्ज पार्क मधल्या नदीकाठच्या रस्त्याने आमची बस जात होती. या किंग्जपार्कमध्ये लक्षावधी विविध प्रकारचे वृक्ष आहेत. विस्तीर्ण हिरवळी आहेत. लांबच लांब फुललेला उत्कृष्ट बगिचा आहे. तऱ्हेतऱ्हेची रंगीबेरंगी फुले झाडांवर आम्हाला दिसत होती. बदके, हरणे, बगळे, एमू वगैरे पक्षी व प्राणीही मोकळ्यात फिरताना आम्ही पाहत होतो. पण डेव्हिडने तिकडे बस नेली नाही. तो आपला स्वॉनच्या तीरावरून वळणावळणाच्या डोंगरवाटेने झाडांनी झाकलेल्या रस्त्यावरून मजेत चालला होता. स्वॉनपासून दूर जायला तो तयार नव्हता. माणसे माणसांवर प्रेम करतात. जनावरांवर प्रेम करतात. झाडांवर प्रेम करतात. पण नदीवर इतके निस्सीम प्रेम करणारा माणूस आम्ही प्रथमच पाहत होतो. तेही एकतर्फी. नदीपासून कुठलाही लाभ न घेता. नदीत मासे धरण्याचा. नदीत बोटींग करण्याचा किंवा साधा डुबण्याचा देखील. अगदी निरपेक्ष प्रेम. फक्त दुरून. काठावरून. पण एकनिष्ठ.

डेव्हिड म्हणाला,

"जंटलमेन, तुम्ही नदीत पोहला असाल. नदीत बोटींग केले असेल. नदी पुलावरून पार केली असेल. पण तीरावरून मैलोन्मैल तासन्तास नदीच्या संगतीत भटकणे यात किती मजा असते! तुम्हाला आज ते कळेल."

डेव्हिडचे बोलणे प्रथम आम्हाला जरा भावुक आणि विचित्र भासले. पण स्वॉनच्या त्या अफाट आरस्पानी निळसर प्रवाहाकडे पाहता पाहता वाट कशी सरत होती, हे कळत नव्हते. स्वॉनच्या भव्य बिलोरी आरशात पडलेले आकाशाचे प्रतिबिंब अंतराअंतरावर बदलत होते. त्यामुळे प्रत्येक वळणावर नवी झळाळी लेऊन स्वॉन आम्हाला सामोरी येत होती.

अखेरीला वळणे संपली. डोंगर संपला. किंग्ज पार्क संपला. तरी स्वॉन संपली नाही. रस्ता सपाटीला येऊन स्वॉनच्या सोबतीने धावतच होता नि त्या रस्त्यावरून आमची बस.

डेव्हिड एक प्रकारच्या तंद्रीत स्वतःशीच गुणगुणत होता. त्याचे शब्द कळत नव्हते. कळले तरी समजत नव्हते. फक्त एवढे जाणवत होते की, स्वॉनच्या अबोल संगतीत त्याला कंठ फुटला होता. कदाचित् आम्ही नसतो तर स्वॉनच्या काठावरच्या हिरवळीत तो गाणे म्हणत नाचला असता. पण आता भोवतालचे दृश्य थोडे पालटत होते. उजवीकडे गर्द हिरव्या डोंगराऐवजी वनराईत लपलेले श्रीमंती बंगले आणि डावीकडे स्वॉनच. पण तिचा प्रवाह नकळत रुंदावत होता. उत्तरोत्तर विशाल होत चालला होता. क्षणाक्षणाने रस्त्याच्या जवळ सरकत होता. रस्त्याला मध्येच स्पर्श करू पाहत होता. अचानक रस्ताच नदीकडे वळला. गोलाकार उंच पुलावरून उडी मारून पलीकडे गेला. आता उजवीकडे स्वॉन. केवढीतरी अथांग. समुद्रासारखी. समुद्रच. नि समोर फ्रीमांटल बंदर.

स्वॉनच्या तीरातीराने आम्ही थेट समुद्रापर्यंत येऊन पोचलो होतो. या ठिकाणी पर्थ शहरापासून एकोणीस किलोमीटर अंतरावर फ्रीमांटल हे नैसर्गिक बंदर स्वॉन नदीच्या मुखाशी बसलेले आहे. हे ऑस्ट्रेलियातील सर्वांत जुने बंदर असून त्याची स्थापना १८२९ साली इथे आलेल्या युरोपीयन दर्यावर्दी प्रवाशांनी केली. अगदी मोक्याच्या आणि सोयीच्या ठिकाणी असल्यामुळे फ्रीमांटल हे जगातील अतिशय वर्दळीचे नि व्यस्त बंदर आहे. या बंदरात रोज तीनशे जहाजांची ये-जा होते, असे डेव्हिडने सांगितले. फ्रीमांटल बंदराभोवतीच फ्रीमांटल शहराची वसती झालेली आहे. मधल्या किंग्जपार्कच्या डोंगरराजीमुळे पर्थपासून वेगळे झाले असले तरी फ्रीमांटल रेल्वेने, रस्त्याने आणि स्वॉनच्या जलमार्गाने पर्थशी अतूटपणे जोडलेले आहे. फ्रीमांटल हे मुळात मच्छिमारांचे खेडे होते. डचांनी आणि ब्रिटीशांनी इथे आल्यावर बंदराची आणि वसाहतीची निर्मिती केली. हे शहर पर्थ शहरापेक्षा खूप जुने आहे. त्यामुळे पर्थमधल्या अद्ययावत् इमारती इथे फारशा आढळत नाहीत. सर्व आधुनिक सुखसोयी असल्या तरी इथे प्राचीनतेचा वारसा अजून कायम आहे. इथल्या अनेक इमारती शतकापूर्वीच्या आहेत. डेव्हिडने आम्हाला फ्रीमांटल शहरातून फिरवले.

शहराचा फेरफटका करताना मंदिरासारख्या घुमटाकृती कमानी असलेले फ्रीमांटल रेल्वेस्टेशन, राजाबाई टॉवर सारखा घड्याळाचा टॉवर असलेला फ्रीमांटल टाऊन हॉल, पांढरेशुभ्र ऐतिहासिक सेंट जॉन चर्च या एकापेक्षा एक जुन्या आणि उठावदार वास्तुकलेने मनात ठसणाऱ्या इमारती आम्ही पाहिल्या. सर्वात शेवटी डेव्हिडने बस चढावावर नेली आणि अगदी टोकाशी, समुद्राच्या लगत उंचावर उभ्या ठाकलेल्या 'राऊंड हाऊस' पाशी उभी केली. 'राऊंड हाऊस' ही वेस्टर्न ऑस्ट्रेलियातली सर्वात जुनी सार्वजनिक इमारत आहे. १८२९ मध्ये युरोपियनांनी इथे वसाहत केल्यावर दोनच वर्षांनी ही भव्य इमारत बांधली. ही चुनखडीत उभारलेली इमारत युरोपियन वसाहतवाद्यांनी १८३१ सालापासून तुरुंग म्हणून वापरली होती. या तुरुंगात इथल्या मूळच्या रहिवाशी असलेल्या आदिवासी लोकांना वर्षानुवर्ष डांबून ठेवण्यात आले होते. साखळदंडांनी बांधलेल्या अवस्थेत या देशाचे खास मालक असलेले आदिवासी चोरासारखे इथे खितपत, पिचत पडले होते. तुरुंगाच्या स्वच्छ, रिकाम्या नि भकास खोल्यांमधून हिंडताना आदिवासींवर झालेल्या अत्याचारांच्या कल्पनेने पर्यटक उदास होतो. आता ही गोलाकार इमारत राष्ट्रीय वास्तू म्हणून जतन करण्यात आली आहे. इमारतीबाहेरच्या हिरवळीवर द्राक्षाचे वेल आणि अंजीराच्या झाडांची महिरप आहे. राऊंड हाऊस शॉप, माहिती केंद्र, उपहारगृह, भेटवस्तूंचे आकर्षक केंद्र इत्यादी सर्व आधुनिक सोयी इथे आहेत. इमारतीसमोर उभे राहिले की समोर खाली अथांग गर्द निळा जलसागर, उजवीकडे व डावीकडे बंदरात नांगरलेली प्रचंड समुद्रगामी जहाजे व गलबते आणि मागे फ्रीमांटल शहराची रेखीव चित्रविचित्र वसाहत असा सौंदर्याचा अफाट पसारा दिसतो. कुठे पाहावे, काय पाहावे नि किती पाहावे, अशा संभ्रमाने नजर बावरून जाते. पण आम्ही आपले त्या सगळ्या सुंदरतेकडे पाठ करून उभे होतो. दुर्दैवी भूतकाळाच्या खोल चिंतनात कुढणाऱ्या 'राऊंड हाऊस'च्या त्या हतभागी, शापित धुडाकडे पाहात. भारल्यासारखे नि अनिमिष.

तेवढ्यात डेव्हिडने आम्हाला जागे केले.

"जंटलमेन, कम अलाँग. तुमच्या आवडीचे ठिकाण दाखवतो."

आम्ही त्याच्यामागोमाग राऊंडहाऊस समोरच्या प्रांगणात टोकाला

गेलो. समोर बोट दाखवत डेव्हिड म्हणाला,

"डू यू सी दॅट?"

आम्ही खाली पाहिले. समुद्रकिनाऱ्यावर विस्तृत बेदर्स बीच होता. बीचच्या रुपेरी रेशमी वाळूत सागरात जलक्रीडा करणारे ऑस्ट्रेलियन स्त्रीपुरुष दमून भागून पहुडले होते. गोरी कातडी. उघडे नागडे देह. अर्ध्या चड्ड्यातले, अर्ध नग्न पुरुष. त्यांच्या कवेत विसावलेल्या बिकीनीतल्या बहुतांशी विवस्त्र स्त्रीया. आमच्यातले काही हिरवट रसिक बुभुक्षित नजरेने ते अनावृत्त देह चाटत राहिले. काहींनी तर चक्क दुर्बिणी सरसावल्या. पण कोणीतरी विचारले,

"डेव्हिड हे काय? हे दृश्य तर आम्ही ऑस्ट्रेलियाच्या सर्वच बीचेसवर पाहिले आहे. व्हाट इज स्पेशल इन दीज बेदिंग ब्यूटीज."

"नो नो. नॉट बेदिंग ब्यूटीज." डेव्हिडने समोर सागराकडे हात फिरवला.

"सी द ओशन. इंडियन ओशन. युवर ओन इंडियन ओशन."

इंडियन ओशन! हिंदी महासागर! नाही म्हटले तरी आम्ही सगळे भारतीय थरारलो. त्या निळसर हिरव्या महासागराचे अपरंपार विस्तारलेले पाणी अधाशी डोळ्यांनी पिऊ लागलो. हा सागर थेट भारतीय भूमीपर्यंत पोचलेला आहे. मातृभूमीच्या किनाऱ्याला याच सागराच्या लाटा स्पर्श करीत आहेत; भारताच्या धरतीशी या सागरसेतूने आम्ही जोडले गेलो होतो. सावरकरांची कविता अंतरंगात नकळत उचंबळली.

"भूमातेच्या चरणतलां तू धूतां"

डेव्हिड सांगत होता,

"फ्रीमांटल बंदर हिंदी महासागर आणि स्वॉन नदी यांच्यामध्ये आहे. स्वॉन पर्थला वळसा घालून येते. आणि इथे फ्रीमांटल बंदरापाशी हिंदी महासागराला मिळते."

आम्ही सगळे गंभीर झालेले पाहून डेव्हिडला आमची गंमत करण्याची लहर आली. समुद्राकडे हात फेकत तो एकदम म्हणाला,

"तो पाहिलात का? इंडिया दिसतो आहे. तो पाहा दूर पलीकडे."

इंडिया! आम्ही चक्रावलो. दूरवर उन्हाच्या चंदेरी धुक्यात सागरावर जमिनीचा धूसर आकार तरंगत होता. भारत इथून दिसणे शक्य नाही,

इतपत भूगोलाचे नि अंतराचे ज्ञान आम्हाला होते. तरीदेखील आम्ही खुळ्यासारखे समुद्रात दिसणाऱ्या त्या कुठल्यातरी बेटांकडे पाहात राहिलो. भावनेपुढे ज्ञान लुळे पडते तसलाच हा प्रकार. डेव्हिड मोठ्यांदा हसला,

"नो फ्रेण्डस्. इंडिया इज फार अवे."

आम्ही भानावर आलो.

दुपारचे ऊन आता धीमे धीमे विझत चालले होते. तो अथांग सागर, ती बंदरातली विश्रब्ध गलबते, तो बेदर्स बीच, ती 'राऊंड हाऊस'ची बोजड वास्तू, ते फ्रीमांटल शहर या सर्वांवर संध्यारंगाचे सोनेरी जाळे हळूहळू विणले जात होते. आम्ही मंतरल्यासारखे सागराच्या पाण्याचे बदलते रूप नजरेत साठवत होतो. कानावर डेव्हिडचे काहीसे आर्त शब्द पडत होते.

"फोक्स, तुम्ही उद्या इंडियाला जाणार. तुमचा ऑस्ट्रेलियाचा दौरा संपणार. 'राऊंड हाऊस' हा तुमच्या प्रवासातला शेवटला स्टॉप आहे. स्वान नदीच्या तीरावरची तुमची सहल तुम्हाला आवडली असेल, अशी आशा आहे. स्वानच्या काठावरचा हा फेरफटका तुमच्या प्रवासातला शेवटचा टप्पा आहे. धिस इज द एण्ड ऑफ युवर ऑस्ट्रेलियन टूर. स्वान साँग ऑफ युवर जर्नी. आय होप यू हॅव एंजॉईड इट. नाऊ लेट अस गो बॅक"

डेव्हिड बसकडे जाऊ लागला. त्याच्या मागोमाग आम्ही. त्या 'राऊंड हाऊस'च्या अधिकच भेसूर दिसणाऱ्या जुनाट वास्तूला वळसा घालून आम्ही बसकडे चाललो होतो. समोर सूर्य हिंदी महासागरावर टेकलेला होता. सागराच्या अनंत विस्तारावर संध्याकाळची हुरहुरती प्रभा उमटली होती. गुलाबी, शेंदरी, नारिंगी उजेडाचा एक अद्भुत झुलता पूलच सागराच्या लाटांवर तयार झाला होता. इतर सहप्रवाशांचे मला माहीत नाही. ते काही सगळे महाराष्ट्रीयन नव्हते. पण मी मात्र अकारण स्वतःशी गुणगुणत होतो,

"ने मजसी ने ....."

■

# माणसांचा दुष्काळ

ऑस्ट्रेलियाची गंमत अशी की, ते जगातले सर्वात लहान खंड आहे आणि सर्वात मोठे बेट आहे. बेट असले तरी ऑस्ट्रेलिया भारतापेक्षा अडीचपट मोठा आहे. पण इतका मोठा असला तरी ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या जेमतेम पावणेदोन कोटी आहे तर भारताची सुमारे अठ्ठ्याऐंशी कोटी आहे. भारतात दर चौरस किलोमीटरला २७३ लोक राहतात. तर ऑस्ट्रेलियात फक्त दोन लोक राहतात. त्यामुळे भारतात स्वप्नातदेखील न येणारी एक गोष्ट ऑस्ट्रेलियात हिंडताना सतत जावणते. ती म्हणजे माणसांचा दुष्काळ.

माणसांचा दुष्काळ याचा अर्थ माणसे अजिबात नाहीत असा नाही. ती दुर्मिळसुद्धा नाहीत. ऑस्ट्रेलियात ८५ टक्के लोक शहरात राहतात. त्यामुळे ऑस्ट्रेलिया हा शहरांचा देश आहे, असे म्हणता येईल. त्यात पुन्हा ही बहुतेक सर्व मोठी शहरे देशाभोवतालच्या अखंड समुद्रकिनाऱ्यावर वसलेली आहेत. म्हणून ऑस्ट्रेलियाचे वर्णन किनाऱ्यांचा देश असेही करता येईल. किनाऱ्यावरच्या सिडनी, मेलबोर्न, ब्रिस्बेन, ॲडलेड, पर्थ वगैरे मोठ्या शहरांमध्ये लोकवस्ती एकवटली आहे. त्यामुळे तिथे आपल्या

इकडच्यासारखी रस्त्यावर गर्दी असते. पण ही गर्दी एकसारखी वाहती. ती कुठेही तुंबून राहत नाही. कुठल्याही वसला, रेल्वेला, थिएटरपाशी लांबचलांब रांगा कधी लागलेल्या नसतात. रस्त्यावरची गर्दीसुद्धा ठराविक विभागात व ठराविक वेळेलाच. शॉपिंग आर्केडमध्ये गर्दी असते. पण पाच वाजता संध्याकाळी दुकाने बंद झाल्यावर रस्त्यावर शुकशुकाट. रात्री आठनंतर शहरातसुद्धा रस्त्यावर माणसे क्वचित्‌च दिसतात. दिसतात त्या सगळ्या आपल्या मोटारी. निमिषार्धात दिसून नाहीशा होणाऱ्या. फक्त 'नाईट लाईफ' जिथे चालू असते अशा काहीच ठिकाणी रात्री माणसांचा वावर असतो. बाकी शहर सामान्यतः रात्री नऊनंतर चिडीचूप.

शहरातच जर अशी मनुष्यटंचाई तर मग शहराबाहेर पडले की, माणसांचे नावच नको. आम्ही सिडनी, मेलबर्न, ब्रिस्बेन या शहरांपासून पन्नासपाऊणशे मैलांवर असलेल्या पर्यटनस्थळांना भेटी दिल्या. ब्रिस्बेनहून 'बिग पाईन ॲपल' ला गेलो. सिडनीहून ब्लू माऊंटनला आणि कॅनबराला जाऊन आलो. एकदा शहराचा परिसर संपला की, माणूस दिसण्याची मारामार. फ्रीवे आणि हायवेवर दिसतात त्या नव्वद नि शंभर मैल वेगाने सुसाट जाणाऱ्या मोटारी. मोटारींची मात्र रीघ. अक्षय भात्यातून बाण सुटावेत तशा रस्त्यावरून मोटारी अखंड सुसाट धावताहेत. मात्र मजा अशी की प्रत्येक मोटारीत फक्त एकच माणूस किंवा बाई. चारपाच माणसे कोंवली आहेत असे दृश्य क्वचित्. आमचीदेखील एवढी मोठी साठ माणसांची प्रशस्त वातानुकूलित बस पण त्यात आम्ही होतो फक्त दहाजण. त्यामुळे कधीकधी अगदी चुकल्यासारखे होई. रस्त्यावरून पळणाऱ्या असंख्य मोटारी आणि ठिकठिकाणच्या मोटेल्सच्या कारपार्कमधले मोटारींचे प्रचंड समुदाय पाहिले की पुष्कळदा संभ्रम पडत होता, हा देश माणसांचा की मोटारींचा.

माणसांच्या दुष्काळाचा एक दृश्य परिणाम म्हणजे सुबत्ता नि शांतता. तो देशभर, म्हणजे आम्ही देशाच्या ज्या भागात फिरलो तिथे, आम्हाला जागोजाग दिसत होता. ऑस्ट्रेलियाचे दरडोई उत्पन्न १६५९० रुपये आहे. तर भारताचे फक्त ३३० रुपये आहे. ही आकडेवारी आम्हाला माहीत होती, तरीसुद्धा तिथल्या समृद्ध जीवनाने आम्ही दिपल्यासारखे झालो. सिडनी, मेलबर्नसारख्या मोठ्या शहरात तर संपन्नतेचे इमलेच

ठायी ठायी उभे होते. पण नूसा नदीच्या काठावरच्या नूसाहेडस् या छोट्याशा खेड्यात एका मेंढपाळाकडे गेलो होतो. तेव्हा त्याचे ते एकमजली, पसरट, कौलारू घरसुद्धा टेलिफोन, टी. व्ही., फ्रीज, वॉशिंगमशीन इतकेच नव्हे तर टोर्नाडो, एअरकंडिशनिंग यासारख्या सर्व अत्याधुनिक सुखसोयींनी सुसज्ज होते. अगदी आडबाजूच्या रस्त्यावर पेट्रोल पंप, मोटेल्स, उपहारगृह, टॉयलेटस्, टेलिफोन या सुविधा उपलब्ध होत्या. मॅकडोनाल्ड, हंग्रीजॅक्स, वेम्बीज या फास्ट फूडच्या आंतरराष्ट्रीय खाद्यपेय केंद्रांचे साईनबोर्डस् शहरात तर चौका चौकात पण ग्रामीण भागातसुद्धा ठिकठिकाणी झळकताना पाहिले. सिडनीहून कॅनबराला गेलो त्यावेळी परतताना रात्र झाली. नऊ वाजता सिडनीला आम्ही पोचणार होतो. म्हणजे तिथली हॉटेल्स त्यावेळी बंद झालेली असणार. मग रात्रीच्या जेवणाचे काय करायचे? आम्ही बसच्या चालकाला विचारले. तर तो निश्चिंतपणे म्हणाला,

"डोन्टवरी. मीनांगलला मी पेट्रोलसाठी थांबणार आहे. तेथे तुम्ही जेवण घ्या." या छोट्याशा गावात पेट्रोलपंपावर केवढेतरी मोठे झगमगते आकर्षक रेस्टॉरन्ट आपल्याकडच्या आलिशान हॉटेलच्या तोंडात मारणारे. शिवाय किऑस्क आणि शॉप्स. तेथे अर्धा तास बस थांबली. तेवढ्यात आम्ही जेवण तर केलेच, टॉयलेटही उरकले वर थोडी खरेदीसुद्धा केली. ऑस्ट्रेलियात आम्ही फ्रीवे आणि हायवेवरून तसाच लहान रस्त्यांवरूनसुद्धा बराच प्रवास केला. रस्ते तर प्रशस्त आणि नितळ होतेच पण टॉयलेटस्, रेस्ट एरिया, पेट्रोल पंपस्, किऑस्क, शॉपस्, टेलिफोन या सुविधा अंतराअंतरावर योजनाबद्ध मांडून ठेवलेल्या. त्या किती अंतरावर आहेत, याची वारंवार सूचना देणारे फलक मोठाच दिलासा देणारे ठरले. काही वर्षांपूर्वी पुण्याहून सोलापूरला मोटारने गेलो होतो. सकाळी उशीरा निघाल्याने वाटेतच जेवणाची वेळ झाली. पण त्या शंभर दीडशे मैलाच्या रस्त्यावर दुपारच्या भोजनासाठी कुठेही चांगले नि स्वच्छ भोजनालय मिळाले नाही. टॉयलेटस् वगैरेची तर गोष्टच सोडा. टॉयलेटस् किंवा सार्वजनिक स्वच्छतागृहे हा काही मोठासा वर्णनीय विषय नाही. आपल्याकडची टॉयलेटस् ही तर अवर्णनीयच असतात. त्यामुळे तिकडची चकचकीत आणि कमालीची लख्ख टॉयलेटस् पाहून सुरुवातीला बुजल्यासारखे होई. इतक्या पराकोटीच्या स्वच्छतेची सवय नसल्यामुळे

काहीसे बिचकतच आम्ही टॉयलेटस् वापर करत होतो. टॉयलेटस्मध्ये केवळ स्वच्छताच नाही तर गरम आणि थंड पाण्याचे नळ, आंघोळीची व्यवस्था या सोयी होत्या. तुमच्याकडे टॉवेल आणि साबण असला की झाले. तुम्ही धुतल्या तांदळासारखे निर्मळ होऊ शकता. अगदी नखशिखान्त.

ऑस्ट्रेलियात आढळणाऱ्या सार्वजनिक स्वच्छतेचे एक कारण तिथले वातावरण आणि हवामान हे आहे. दक्षिण पूर्वेकडच्या न्यू साऊथ वेल्स, व्हिक्टोरिया या प्रांतात आम्ही मुख्यतः हिंडलो. समुद्र सन्निध असूनही इथली हवा थंड आणि कोरडी आहे. त्यामुळे घाम अजिबात नाही आणि मुख्य म्हणजे धुळीचे नाव नाही. संयोजकांनी आम्हाला सांगितले होते की, कपडे फार घेऊ नका. फारतर तीन सेटस् घ्या. एक अंगावरचा आणि दोन जास्तीचे. तरी आम्ही नेहमीच्या सवयीप्रमाणे चारपाच संच घेतले होते. पण त्यातल्या दोन संचांची घडी देखील मोडावी लागली नाही. कारण कितीही हिंडलो तरी घाम येत नव्हता नि धूळ नसल्याने कपडे मळत नव्हते. पण ऑस्ट्रेलियातील सार्वजनिक स्वच्छता आणि टापटीप हा काही केवळ वातावरण आणि हवामान यांचा परिणाम नाही. तसाच तो केवळ कमी लोकसंख्या आणि सार्वत्रिक समृद्धी यांचाही परिपाक नाही. संपन्नतेप्रमाणेच शिक्षणाचाही या देशात सर्वदूर प्रसार झालेला आहे. ऑस्ट्रेलियात ९९ टक्के लोक सुशिक्षित आहेत. सार्वजनिक जीवनातील शुद्धता आणि कार्यक्षमता हे शिक्षणाच्या संस्काराचेही दृश्य फलित आहे. अर्थात् शिक्षण इतक्या मोठ्या प्रमाणात घेणे शक्य झाले ते पुन्हा संपन्नता आणि कमी लोकसंख्या यामुळेच, असा हा चक्रनेमिक्रम आहे.

पण ऑस्ट्रेलियासारख्या अफाट खंडात्मक देशाची लोकसंख्या इतकी तुटपुंजी असावी याचे नाही म्हटले तरी आम्हाला केवळ नवलच नव्हे तर थोडेसे वैषम्य वाटणे साहजिकच होते. कारण आम्ही भारतासारख्या माणसांनी शिगोशिग ओसंडून जाणाऱ्या देशातून आलेले. त्यात पुन्हा पुण्यामुंबईसारख्या गर्दीने ओतप्रोत शहराचे रहिवासी. आपल्याकडची मुंबई, पुणे, बंगलोरसारखी दोनतीन शहरे एक केली तरी या प्रचंड देशातील लोकसंख्येला पुरून उरली असती. आमच्या एका मार्गदर्शकाने लोकसंख्येचा आकडा सांगितला एक कोटी पंचाहत्तर लाख. तेव्हा आमच्यापैकी बहुतेकांनी आश्चर्य व्यक्त केले. इतकी कमी लोकसंख्या. कमाल आहे!

पण ऑस्ट्रेलियाचा इतिहास, भूगोल, राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहिली तर तिथली माणसांची कमतरता ही अजब गोष्ट वाटत नाही. तिथे कुठलीच गोष्ट लोकसंख्यावाढीला पोषक नाही. मग लोकसंख्या वाढणार कशी? ऑस्ट्रेलियाचा इतिहास काही फार जुना नाही. ज्याला आपण आज ऑस्ट्रेलिया म्हणून ओळखतो त्या संघराज्याची स्थापना ही अगदी अलिकडची घटना आहे. १ जानेवारी १९०१ या दिवशी ऑस्ट्रेलिया एक आधुनिक राष्ट्र म्हणून अस्तित्वात आले. तत्पूर्वी ब्रिटीश आणि युरोपीयन लोकांच्या तेथे ठिकठिकाणी तुरळक वसाहती होत्या. ऑस्ट्रेलियातील मूळचे रहिवासी जे आदिवासी किंवा अबॉरिजनल्स ते शेकडो हजारो वर्षांपासून तेथे वास्तव्य करून होते. पण त्या सर्व भटक्या जंगली जमाती. आज इथे तर उद्या तिथे. देश किंवा राष्ट्र या संकल्पनेचा वाराही त्यांना लागलेला नव्हता. आधुनिक माणूस तेथे स्थायिक होण्यासाठी गेला, तोच मुळात ब्रिटीश दर्यासारंग कप्टन जेम्स कुक याला १७७० साली अनपेक्षितपणे ऑस्ट्रेलियाचा शोध लागला. तेव्हा २८ एप्रिल १७७० रोजी कुकने पूर्व किनाऱ्यावर बॉटनीबेमध्ये आपले जहाज नांगरले आणि त्याचे पोर्टजॅकसन असे नामकरण करून तेथे ब्रिटीशांचा अधिकार प्रस्थापित केला. अमेरिकन राज्यक्रांतीनंतर इंग्लंडमधील तुरुंग हे तुडुंब भरले. तसे कैद्यांना ऑस्ट्रेलियात पाठवून तेथे इंग्रजांनी वसाहती निर्माण केल्या. हे कैदी केवळ सामान्य गुन्हेगार नव्हते त्यांच्यात राजकीय आणि धार्मिक कैद्यांचाही भरणा होता. तुरूंगातून मुक्तता झाल्यानंतर या कैद्यांनी ऑस्ट्रेलियातच वसती केली. हळूहळू न्यू साऊथ वेल्स आणि व्हिक्टोरिया या दक्षिण पूर्वेतील भागात वसाहती स्थापन झाल्या.

पुढे वेगवेगळ्या ब्रिटीश प्रवाशांनी अंतर्भागात जाऊन ऑस्ट्रेलियाच्या इतर प्रदेशाचा शोध लावला आणि तेथील आदिवासी लोकांना नमवून ठिकठिकाणी वसाहतींची निर्मिती केली. निरनिराळ्या प्रांतांवर गव्हर्नर्स नेमण्यात येऊन शासनाची यंत्रणा उभी होईपर्यंत १८५० साल उजाडले. १८५१ साली व्हिक्टोरियातील बलॅरट इथे सोन्याचा शोध लागला. त्यामुळे इंग्लंड आणि युरोपातून बरेच लोक इथे स्थलांतरित झाले. तरीदेखील १८७० च्या सुमारास ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या जेमतेम दहालाख होती. गेल्या सव्वाशे वर्षात ती पावणे दोन कोटींपर्यंत पोचली आहे. म्हणजे

लोकसंख्या वाढीचा वेग हा काही भारतापेक्षा फार कमी नाही. भारताचा २.३ टक्के आहे. तर ऑस्ट्रेलियाचा १.६ टक्के आहे. पण मुळातच स्थलांतरितांची संख्या कमी असल्यामुळे ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या आजपर्यंत कमी राहिली आहे. पुढे पश्चिम ऑस्ट्रेलियातसुद्धा सोन्याचा शोध लागला तरीदेखील युरोपातून स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या फारशी वाढली नाही. कारण ऑस्ट्रेलियातील भौगोलिक परिस्थिती हीच मुळात मनुष्यवस्तीच्या विस्ताराला फारशी अनुकूल नाही. जवळ जवळ ९० टक्के पश्चिम आणि उत्तर ऑस्ट्रेलिया हा ग्रेट सॅण्डी डेझर्ट, गिबसन डेझर्ट, सिमसन डेझर्ट अशा अफाट वालुकामय प्रदेशांनी व्यापलेला आहे. ऑस्ट्रेलियातील ४० टक्के भूप्रदेशात पडिक, वाळवंटी जमीन आणि २० टक्के प्रदेशात जंगल पसरलेले आहे. फक्त दक्षिणपूर्वेचा व्हिक्टोरिया आणि न्यू साऊथ वेल्स या प्रांताचा भाग तेवढा शेती, मेंढपाळी आणि मानवी वसाहतींना पोषक आहे. मध्य आणि पश्चिम ऑस्ट्रेलियाला तर 'Dead heart of Australia' असे म्हटले जाते. जमीनीची ही खडतर परिस्थिती तर पावसाची दशा आणखीच कठीण आहे. दक्षिणपूर्वेत ५० सेंटीमीटर तरी पर्जन्यमान आहे. तेथे मरे व डार्लिंग या नद्यांच्या खोऱ्यात शेती व मेंढपाळी या व्यवसायामुळे गहू, ऊस, लोकर यांचे उत्पादन होते. पण अंतर्भागात आणि पश्चिमउत्तरेकडे दहासेंटीमीटर पेक्षाही कमी पाऊस पडतो. नापीक, रेताड जमीन आणि पावसाचे दुर्भिक्ष यामुळे ऑस्ट्रेलियाचा जवळजवळ साठ ते सत्तर टक्के प्रदेश हा मनुष्यवस्तीला योग्य नाही.

दुसरे असे की, ऑस्ट्रेलियातील समाज हा प्रामुख्याने पूर्वाश्रमीचा ब्रिटीश आणि युरोपीयनांचा आहे. त्यामुळे उच्च जीवनमान कायम राखण्यासाठी जास्त उत्पन्न मिळवणारे लहान कुटुंब असणे आवश्यक ही युरोपीयन संकल्पना तेथील समाजात खोलवर रुजली आहे. मात्र अमेरिकेतील 'काऊ बॉय कल्चर' आणि युरोपातील 'फ्री सेक्स' ची ऑस्ट्रेलियात फारशी लागण झालेली नाही. कुटुंबव्यवस्था या समाजाने जपलेली आहे. 'कुटुंब लहान सुख महान' हा मंत्र येथील लोकांनी प्रत्यक्षात आणला आहे. त्यामुळे घरोघरी 'हम दोन हमारे दो' अशी छोटी कुटुंबे बहुतांशी आढळतात.

कायमच्या वास्तव्यासाठी परदेशी लोकांना परवानगी न देण्याचे

(इमिग्रेशन) ऑस्ट्रेलियाचे धोरणही लोकसंख्येला आळा घालण्यास कारणीभूत आहे. फक्त राष्ट्राच्या संपत्तीत भर घालून राहणीमान उंचावणाऱ्या तंत्रज्ञानातील तज्ञ आणि उद्योगी लोकांनाच नागरिकत्व देण्याचे सामान्यतः ऑस्ट्रेलियाचे धोरण आहे. केवळ देशाच्या संपत्तीचा उपभोग घेणाऱ्या खुशालचेंडू निरुद्योगी वाजारवुणग्यांना इथे प्रवेश नाही. त्यात पुन्हा युरोपीयन श्वेतवर्णी लोकांना जरा झुकते माप आहे. आशिया किंवा आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांना नागरिकत्व देताना फार काटेकोरपणे तोलले जाते. आशियातील फक्त चीनी लोक हेच जगातल्या इतर देशात गेले तसेच इथेही पूर्वीपासून बरेच पसरलेले आहेत. सुमारे दहा टक्के लोकसंख्या ही चीनी जमातीची आहे. पण हे उद्योगी चीनी लोक तंत्रज्ञान आणि व्यापार या क्षेत्रात इथे आघाडीवर आहेत. भारत, पाकिस्तान, बांगलादेश इथलेही लोक इथे आहेत. पण त्यांचे प्रमाण फारच थोडे आहे. सिडनीला सुमारे चारशे भारतीय कुटुंबे आहेत. तिथल्या तीनचारजणांच्या भेटी झाल्या. हे सगळे तिथल्या मोठमोठ्या कंपन्यांमध्ये तंत्रज्ञांच्या हुद्यावर आहेत. मेलबर्नच्या रॅडिसन हॉटेलमधल्या वास्तव्यात युसुफ बेग या पाकिस्तानी गृहस्थाशी ओळख झाली. हा हॉटेलमध्ये वातानुकूलनतज्ञ (एअरकंडिशनिंग एक्सपर्ट) म्हणून काम करतो. हा मूळचा गोव्याचा. नंतर पाकिस्तानात गेला. त्याची बायको कराचीची. ती मेलबर्नच्या एका हॉस्पिटलात ॲनास्थेटिशियन आहे. तिला ऑस्ट्रेलियन नागरिकत्व मिळाले आहे. पण याला अजून मिळायचे आहे. कारण इथे येऊन त्याला दोनच वर्षे झाली होती. नियमाप्रमाणे अडीच वर्षे पूर्ण झाली की अर्ज केल्यावर नागरिकत्व मिळेल अशी त्याला आशा आहे. पण एकंदरीने आशियातील स्थलांतरितांना इथे नागरिकत्व मिळणे फारसे सोपे नाही. कारण अजूनही श्वेतवर्णी युरोपीयनांच्या वसाहतींसाठी राखून ठेवलेली भूमी (reserved pocket) अशीच बहुतांशी ऑस्ट्रेलियाची भूमिका आहे.

मर्यादित लोकसंख्येमुळे जीवनमान उच्च राखण्यात ऑस्ट्रेलिया यशस्वी झाला असला तरी लोकसंख्येच्या तुटवड्याचा दुष्परिणामही त्याला भोगावा लागतो आहे. एवढा विशाल देश असूनही कमी लोकसंख्येमुळे तो जगाच्या अर्थकारणात आणि पर्यायाने राजकारणात बाजूला पडला आहे. जागतिक, आर्थिक आणि राजकीय उलाढालीत त्याला फारसे महत्त्वाचे

स्थान नाही. लोकसंख्या कमी त्यामुळे ऑस्ट्रेलियात मोठी बाजारपेठ नाही. जगातल्या प्रमुख औद्योगिक देशांना चीनचे किंवा भारताचेही जे आकर्षण आहे ते ऑस्ट्रेलियाबद्दल नाही. मानवी हक्काबद्दल टाहो फोडणारी अमेरिका चीनशी व्यापारी संबंध वाढावेत म्हणून चीनमधील मानवी हक्कांच्या गळचेपीकडे कानाडोळा करीत आहे. कारण चीनमध्ये अमेरिकन आणि युरोपीयन मालाची जगातली सर्वात मोठी बाजारपेठ आहे. ऑस्ट्रेलियाचे तसे नाही. ऑस्ट्रेलियात कुठलाही मोठा उद्योग नाही. शेती, मेंढपाळी आणि यंत्रसामुग्रीची निर्मिती हेच इथले प्रमुख व्यवसाय आहेत. लोकसंख्येच्या कमतरतेमुळे बाजारपेठेचा अभाव आणि त्यामुळे औद्योगीकरण नगण्य अशी ऑस्ट्रेलियाची कथा आहे.

पण ही शोक कथा नाही. उलट ती सुखान्तिकाच ठरण्याची शक्यता आहे. मोठे उद्योग नाहीत म्हणून काही फारसे बिघडताना दिसत नाही. ऑस्ट्रेलियात मोटारी तयार होत नाहीत. पण म्हणून मोटारींची चणचण नाही. उलट अगणित मोटारींचे पीक रस्तोरस्ती नि घरोघरी सर्व देशभर दिसते. कारण स्वदेशातील लोकर, मांस, पक्का माल निर्यात करून मोटारींचे सुटे भाग आयात केले नि ते इथे जुळवले की मोटारी तयार होतात. उलट औद्योगीकरणाचा अतिरेक नसल्यामुळे औद्योगिक अशांतता नाही, संप, हरताळ, मोर्चे वगैरे भानगडी नाहीत. दारिद्र्य नि झोपडपट्ट्या बोकाळलेल्या नाहीत. ऑस्ट्रेलियातही कमी उत्पन्नाचे गट आहेतच. विशेषतः इथल्या आदिवासी अबॉरिजनल्सची परिस्थिती फारशी चांगली नाही. त्यांना सर्व सुविधा उपलब्ध नाहीत. पण त्यांना सोशल सिक्युरिटी नंबर असतात. सरकारकडून ठराविक रक्कम मिळते.

फक्त दोनदाच ऑस्ट्रेलियात दारिद्र्याचे ओझरते दर्शन घडले. एकदा सिडनीला फुटपाथवरच्या कचऱ्याच्या पेटीतून बिअरचे आणि कोकचे कॅन्स वेचून काढणारी म्हातारी दिसली. अर्थात ती आपल्याकडच्या भिकाऱ्यांसारखी अर्धनग्न लक्तरात नव्हती. अंगात झगा व कोट, पायात बूट मोजे नि डोक्यावर टोपी असा तिचा अवतार होता. पण तिला पाहून आपल्याकडे रद्दी कागद गोळा करीत खांद्यावर पोते घेऊन हिंडणाऱ्या अनवाणी बायांची आठवण झाली. दुसऱ्यावेळी ब्रिस्बेनच्या शॉपिंग आर्केडमध्ये फुटपाथवर समोर पैशासाठी फडके टाकून गिटार वाजवत नाचणारे तरूण

पाहिले. हे दाढीवाले तरूणसुद्धा चांगल्या कपड्यातले होते. लागोपाठ दोन रात्री त्यांना असे गाताना नि नाचताना पाहिले. त्यामुळे ते संगीताचा पथनाट्यासारखा काही कार्यक्रम करून लोकांनी स्वेच्छेने कपड्यावर टाकलेली बिदागी घेत होते, की खुल्लमखुल्ला भिक्षांदेही करत होते याचा नीटसा उलगडा झाला नाही. पण उघड्यावाघड्या भयानक दारिद्र्याचा आणि ओंगळ किळसवाण्या झोपडपट्ट्यांचा मागमूस ऑस्ट्रेलियात कुठे दिसला नाही.

माणसांचा दुष्काळ असला तरी ऑस्ट्रेलियात दोन गोष्टींचा मात्र वारेमाप सुकाळ आहे. पहिली गोष्ट म्हणजे झाडे नि वनस्पती आणि दुसरी प्राणी. ऑस्ट्रेलियातील एक पंचमांश प्रदेश हा जंगलानीच व्यापलेला आहे. या जंगलांची जोपासना अतिशय काळजीपूर्वक करण्यात येते. आणि जंगलतोड करणाऱ्यास जबर शिक्षा ठोठावण्यात येते. पण प्रत्यक्ष जंगली प्रदेश सोडला, तरी शहरी दाट लोकवस्तीच्या भागातही जागोजाग हिरव्यागार वनराजीची पखरण केलेली आहे. प्रत्येक शहरात मोठाल्या बागा आहेत आणि जवळजवळ प्रत्येक बागेत वनस्पतींच्या संगोपनासाठी काचेची घरे बांधलेली आहेत. शिवाय शहरात जागा मिळेल तिथे वृक्षांची दाटी आहे. वृक्ष नसतील तिथे हिरवळीची सपाटी आहे. मग तो चौक असो, पुतळ्याभोवतीचा चौकोन असो नाही तर सार्वजनिक इमारतीचे अंगण असो. शहराबाहेर तर नजरेला दिसते ते सगळीकडे वृक्षांचे घनदाट रंगीबेरंगी साम्राज्य. घरे नि बंगले तर झाडांनी वेढलेले आहेतच पण रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना मैलोन्‌मैल वृक्षांची सतत खडी ताजीम नि विभाजकातही 'प्रफुल्ल होवोनी सपुष्प ठेले' अशा झाडांची सलामी. मेलवर्न क्रिकेट ग्राऊंड बघायला गेलो तेथेही ग्राऊंडबाहेरची विशाल मोकळी जागा ही प्रचंड वृक्षांनी आच्छादित. ऑस्ट्रेलियाचा वाळवंटी प्रदेश सोडला तर जेथे जेथे वस्ती आहे तेथे झाडी आहे. माणसांची कमतरता ही या देशात झाडांनी भरून काढली आहे. त्यामुळे आम्ही फिरलो त्या व्हिक्टोरिया, न्यू साऊथ वेल्स, क्वीन्सलँड आणि पश्चिमेला पर्थ भोवतीच्या प्रदेशातही उजाड, रखरखीत माळरान कुठे फारसे दिसलेच नाही. जिकडे नजर टाकली तिकडे तऱ्हेतऱ्हेचे डवरलेले वृक्ष त्यात युकॅलिप्टसची लागवड सर्वदूर झालेली दिसते. युकॅलिप्टस हा ऑस्ट्रेलियाचा राष्ट्रीय वृक्ष आहे. या

वृक्षसंप्रदायातली सुमारे २५० प्रकारची झाडे ऑस्ट्रेलियात सर्वत्र आढळतात. दक्षिण पश्चिमेकडे पर्थच्या आसपास कांगारुपॉव ही विचित्र झाडे आहेत. या झाडांवर कांगारूच्या अंगावर असते तशी लव असते आणि आकारानेही ती कांगारूसारखी दिसतात. याशिवाय मिचेल गवत नावाचे प्रचंड उंची गाठणारे राक्षसी गवतही अंतर्भागात सगळीकडे उगवते.

जी विपुलता झाडांची तीच प्राण्यांची. अर्थात् हे प्राणी काही रस्त्यावर किंवा शहरात कुठेही मन मानेल तसे मोकाट भटकताना दिसत नाहीत. त्यांच्यासाठी शेकडो एकर पसरलेली राष्ट्रीय अभयारण्ये (वाइल्ड लाइफ पार्कस्) निर्माण केलेली आहेत. अशी सुमारे दोन हजार अभयारण्ये ऑस्ट्रेलियात आहेत. त्या अभयारण्यात हे प्राणी मोकळे फिरत असतात. मात्र सरपटणारे प्राणी सोडले तर ऑस्ट्रेलियातील प्राण्यांचे जगातल्या इतर प्राण्यांशी फारसे साम्य नाही. ऑस्ट्रेलियातील तद्देशीय मूळचे प्राणी तर अगदी वेगळे, विचित्र आणि चमत्कारिक आहेत. त्यापैकी ऑस्ट्रेलियन लोकांचे आवडते मुख्य तद्देशीय प्राणी दोन. एक म्हणजे कोआला. आणि दुसरा प्रख्यात कांगारू. ऑस्ट्रेलियातला प्रमुख पक्षी एकच. तो म्हणजे एमू. शहामृगासारखा दिसणारा काळपट रंगाचा उंच लवचिक मानेचा आणि लांब ढांगांचा हा प्रचंड पक्षी बराच प्राचीन आहे. पक्षी असला तरी हा फारसा उडताना दिसत नाही पण ऑस्ट्रेलियातील सर्व प्राणीसंग्रहालयात मोकळेपणे ताडताड फिरताना मात्र दिसतो. तुम्ही जरा हात पुढे केला की बुभुक्षित नजरेने चोच वासून तुमच्याकडे फताड्या चालीने धावत येतो. तुमच्या हातावर चोचीने हल्ला करतो. कांगारू हा ऑस्ट्रेलियाचा राष्ट्रीय प्राणी म्हणून तर एमू हा राष्ट्रीय पक्षी म्हणून मान्यता पावला आहे. कांगारू आणि एमू यांची चित्रे ऑस्ट्रेलियन 'कोट ऑफ आर्म्स'वर आहेत.

कोआला या प्राण्याला कुठलाही सरकारी मान मिळाला नसला तरी त्याने लोकांच्या मनात घर केले आहे. परदेशी प्रवाशांनाही हा प्राणी भुरळ घालतो. गर्द राखाडी रंगाचा आणि छोट्या अस्वलासारखा दिसणारा हा प्राणी बहुधा झाडावर फांद्यांच्या बेचक्यात झोपलेला दिसतो. दिवसातून तो वीस तास झोपतो. चार तास जागा असतो. आणि फक्त चार मिनिटे हालचाल करतो. याचे मुख्य आकर्षण म्हणजे त्याचे अखंड शैशव. एखादा

माणूस जसा चिरतरुण दिसतो, तसा हा कोआला चिरशैशवात असतो. त्याचे शरीर लहान बालकासारखे मांसल, गुबगुबीत आणि गोंडस आहे. त्याच्या अंगावर पांढुरके, काळसर, मऊशार केस आहेत. त्याच्या गोलट, बालिश चेहऱ्यावर हसरा निरागस भाव आहे, तर त्याच्या अबोध डोळ्यांमध्ये गंमतीदार आश्चर्य तरळते आहे. त्याच्या लोभस, गुटगुटीत चेहऱ्याकडे पाहिल्यावर हसू फुटल्याखेरीज राहत नाही. त्याला जवळ घेण्याची, कुरवाळण्याची, त्याचे लाड करण्याची इच्छा आवरणे कठीण जाते. कुठल्याही वाइल्ड लाईफ पार्कमध्ये प्राण्यांना हात लावायला बंदी आहे. पण मेलबर्नजवळच्या बलॅरट येथील पार्कमध्ये झाडाझाडांवर कोआला पेंगत होते. त्यांचे बाळसेदार निष्पाप रूप पाहून त्यांना गोंजारण्याची मनीषा आम्हाला दाबता आली नाही. मार्गदर्शिकेला विनंती केल्यावर तिने काहीशा अनिच्छेनेच झाडावरचा कोआला उचलून आमच्याकडे आणला. आमच्यामधल्या स्त्रीयांनी त्याला कडेवर घेऊन वात्सल्याची हौस भागवून घेतली. प्रत्येकीने त्याला आळीपाळीने कुशीत घेऊन फोटो काढून घेतले. सर्वांनीच त्याला चुटक्या वाजवून त्याच्या अंगावर थोपटून, त्याच्यासमोर आवाज काढून खेळते करण्याचा प्रयत्न केला. पण तो बिचारा कमालीचा शांत होता. त्याने आमच्या मर्कटचेष्टांची अजिबात दखल घेतली नाही. तो आपल्या गोड आळसातच गुंग होता. त्याने आमच्या तावडीतून सुटण्याची हालचाल केली नाही नि आमच्याकडे येण्याचीही. तो केवळ सोशिक कुतुहलाने आमच्याकडे पाहत राहिला. मजेदार सुस्तीत आमचे बालिश चाळे त्याने सहन केले. शेवटी आमच्या मार्गदर्शिकेचीच सहनशीलता संपली. तिने आमच्या कौतुकाच्या कचाट्यातून त्या कोआलाची सुटका केली. आणि त्याला झाडावर स्वस्थानी नेऊन ठेवले.

कोआलापेक्षाही ऑस्ट्रेलियन लोकांचा कांकणभर अधिक आवडता प्राणी म्हणजे कांगारू. ऑस्ट्रेलिया जगभर कांगारूंचा देश म्हणून ओळखला जातो. आरंभीचे अंडी घालणारे आणि नंतरचे सस्तन प्राणी यांच्या मधल्या उत्क्रान्त अवस्थेतील प्राणी म्हणजे पिलाला पिशवीत ठेवणारे (Marsupial) प्राणी. या प्रकारच्या प्राण्यांतील जगातला सर्वात मोठा आणि प्राचीन प्राणी म्हणजे कांगरू. प्रथम पाहिला तेव्हा या बऱ्याचशा बेढब, मवाळ आणि थोड्याशा कुरूप प्राण्याचे ऑस्ट्रेलियन लोक इतके लाड का करतात याचे

कोडे पडले. बांधेसूदपणा आणि प्रमाणबद्धता यांचा संपूर्ण अभाव म्हणजे कांगारूचे शरीर. कांगारूच्या शरीरातला कुठलाही अवयव प्रमाणशीर नाही. त्याचा पोटाखालचा भाग अगडबंब आहे, तर डोके शरीराला न शोभणारे अगदी छोटे आहे. मागचे पाय लांबलचक दुमडलेले तर पुढचे पाय कमालीचे आखूड नि तोटके. थोट्या माणसासारखे. हा विचित्र विद्रूप प्राणी स्वभावाने मात्र अतिशय गरीब आहे. त्याचे डोळे तर विलक्षण करूण आणि दीनवाणे आहेत. चेहऱ्यावरचा एकंदर भाव हा गाईसारखा आहे. कांगारूच्या गरीब नि भोळसट स्वभावाची काहीशी हृदयस्पर्शी कथा गोल्डकोस्टच्या कुरुम्बिन पार्कमधल्या मार्गदर्शकाने सांगितली. मॅथ्यू फ्लिंडर्स नामक संशोधकाने १७९८ च्या सुमारास 'इन्व्हेस्टिगेशन' या जहाजातून ऑस्ट्रेलिया खंडाला फेरी मारून ऑस्ट्रेलियाचा पहिला नकाशा तयार केला. या प्रवासात त्याने जिथे जिथे मुक्काम केला तिथे कांगारू मोठ्या आशेने त्याच्याभोवती गोळा होत. पण अन्नाचा साठा संपला असला की हा सद्गृहस्थ काठीने कांगारूच्या टाळूवर प्रहार करी. कांगारू गतप्राण होऊन पडला की हा त्याचे मांस भाजून खाई आणि भूक भागवीत असे. जंगलात जाऊन इतर प्राण्यांची शिकार करण्यापेक्षा कांगारूंना मारणे अगदी सोपे होते. कारण ते आपणहून फ्लिंडर्सच्या जवळ येत आणि अनायासे त्याच्या हातात सापडत. कांगारू मारणे हा फ्लिंडर्सच्या अक्षरशः हातचा खेळ झाला होता. अन्नाच्या अभावामुळे कांगारूंचा चट्टामट्टा करीत त्याने आपली सफर पूर्ण केली. कमाल म्हणजे जवळ जाताच फ्लिंडर्स मारून टाकतो, हे पाहूनही कांगारू दरवेळी त्याच्याजवळ जात आणि त्याची क्षुधा तृप्त करत याचे फ्लिंडर्सलाही नवल वाटायचे. कांगारू नसते तर ऑस्ट्रेलियाचा नकाशा आपल्याला पूर्ण करता आला नसता, अशी कृतज्ञ कबुली फ्लिंडर्सने आपल्या हकीकतीत दिलेली आहे. आणि कांगारूंची नाइलाजाने हत्या करावी लागली, याबद्दल हळहळ व्यक्त केली आहे.

पण आम्ही ऑस्ट्रेलियात पाहिलेले कांगारू हे दोनशे वर्षांपूर्वी फ्लिंडर्सच्या तावडीत निमूटपणे मान देणाऱ्या कांगारूंइतके निर्बुद्ध नव्हते. ऑस्ट्रेलियात प्रत्येक वाइल्ड लाईफ पार्कमध्ये मोठ्या प्रमाणात कांगारू वावरताना दिसतात. आम्ही सिडनी, कुरुम्बिन तसेच बलॅरट इथल्या वाईल्ड लाईफ पार्कस्‌मध्ये कांगारू पाहिले. कांगारू हा एमूसारखा तरातरा

तुमच्याकडे धावत येणारा प्राणी नाही. कोआलासारखा तुमच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून जागच्याजागी पडून राहणाराही प्राणी नाही. तो बहुतेक ठिकाणी कळपाने राहताना दिसतो. तुम्ही गेलात तर तो उठून लगेच तुमच्याजवळ येत नाही. पण तुम्हाला पाहून तो पळूनही जात नाही. आखूड मान उचलून, मायाळू डोळ्यांनी तो तुमचे स्तब्ध निरीक्षण करतो. तसा तो माणसाळलेला प्राणी आहे. पण त्याचे खालचे शरीर अवजड असल्याने तो झपाट्याने हालचाल करत नाही. मात्र तुमच्या हातात काही खाद्य दिसले तर तो उठून टणाटण उड्या मारत तुमच्याकडे येतो. बलॅरट आणि कुरुम्बिन पार्कमध्ये आम्ही कांगारूंना देण्यासाठी पावाचे तुकडे नेले होते. हातातले पाव पाहताच दूर उभा असलेला कांगारूंचा कळप लांब छलांगा मारत आमच्याकडे आला. पण अधाशी एमूसारखी कांगारूंनी आमच्या हातावर झडप घातली नाही. एकदम भोवताली उतावीळीने झुंबडही केली नाही. किंवा घिसडघाई करून लोचटपणे आमच्या हाताशी झोंबी केली नाही. एक एक कांगारू आमच्यापासून चार फूटांवर शांतपणे येऊन उभे राहिले. आम्ही पाव देण्याची वाट पाहत ते थोड्या अंतरावर दूर थांबले होते. आम्ही हात पुढे करताच ते सावकाश पुढे आले आणि त्यांनी पावाचा तुकडा तोंडाने उचलून खाल्ला. पुन्हा ते दूर जाऊन उभे राहिले. कांगारूंच्या या दूर थांबण्यात नि खाद्य मिळताच पुन्हा अंतरावर उभे राहण्यात एक प्रकारची अदब, सभ्यता नि सुसंस्कृती दिसली. इतर प्राण्यांमध्ये ती दिसत नाही. काही प्राणी एकदम अंगाशी लगट करतात तर काही उगाच भेदरून दूर पळतात. कुरुम्बिन पार्कमध्ये एका अमेरिकन प्रवाशाने हिरवळीवर खाद्य पदार्थ ओळीने मांडून ठेवले होते. अनेक कांगारू रांगेने पंगतीत बसावे, तसे ओळीत बसून त्या खाद्यपदार्थांचा स्वस्थपणे समाचार घेत होते. ते दृश्य पाहण्यासारखे होते. कुठे गडबड नाही गिल्ला नाही. कुरघोडी नाही. सगळे कसे शिस्तीत आणि शांतपणे. माणसांमध्येही पुष्कळदा ही शिस्त आणि शिष्टाचार आढळत नाही.

ऑस्ट्रेलियात मात्र जो सर्वसामान्य माणूस आम्ही पाहिला त्याच्यात आम्हाला कांगारूच्या सभ्यतेचे, शिस्तीचे आणि सुसंस्कृतीचे दर्शन घडले. प्रवासात अनेकदा ऑस्ट्रेलियन स्त्री - पुरुषांशी बोलण्याचे, त्यांच्याशी जुजबी ओळख होण्याचे प्रसंग आले. बहुतेक वेळी, भेटलेला ऑस्ट्रेलियन

माणूस हा शांत, सुस्वभावी आणि सभ्य होता. एक प्रसग स्मरणात राहिला आहे.

आम्ही सिडनीच्या पार्क स्ट्रीटवरील पार्क रेजिस हॉटेलात राहत होतो. संध्याकाळी बाहेर पडलो. कुठेतरी रेस्टॉरंटमध्ये जेवण घेतले. साडेसातचा सुमार होता. म्हटले, जरा थोडे भटकू या. तासाभराने हॉटेलात जाऊ. माझे रूम पार्टनर आणि मी गगनचुंबी इमारतींना कवटाळून जाणाऱ्या प्रशस्त रस्त्यांवरून पदपथाने हिंडू लागलो. मध्येच टाऊनहॉल हे भूमिगत रेल्वेचे स्टेशन दिसले. पाहूया तर भूमिगत रेल्वे स्टेशन कसे आहे, म्हणून पायऱ्या उतरून खाली गेलो. तेथे झगमगणारे वेगळे विश्वच दिसले. दुकाने, रेस्टॉरंटस्, स्टॉल्स, प्लॅटफार्म, झपाट्याने जाणाऱ्या आगगाड्या. सर्व जमिनीखाली आहे. यावर विश्वास बसत नव्हता. फेरफटका करून आम्ही पुन्हा जिन्याने वर आलो नि पाहतो तर काय, सगळेच दृश्य बदललेले. आम्ही दुसऱ्याच जिन्याने भलतीकडेच वर उमटलो होतो. हॉटेल शोधायला सुरूवात केली. पंधरा-वीस मिनिटे भटकलो. पुढच्या चौकात सापडेल म्हणून जावे, तर तेथे गेल्यावर वेगळेच अनोळखी दृश्य दिसायचे. ओळखीच्या खुणा दिसेनात. नुसत्या उत्तुंग, स्तब्ध इमारती नि समोरचे निर्जन रस्ते. एकसारखे दिसणारे. रस्त्यांवरून फक्त मोटारी सटासट् निःशब्दपणे जात होत्या. फुटपाथवर फारशी माणसे दिसत नव्हती. जी दिसली त्यांना पत्ता विचारावासा वाटले नाही. पण कोणाला तरी विचारण्याशिवाय गत्यंतर नव्हते. नाहीतर रात्रीच्या वेळी या भूलभुलैय्यात बरेच भटकावे लागणार. तेवढ्यात एका इमारतीतून एक पोक्त स्त्री बाहेर पडली. स्कर्ट कोट टाय नि हॅट घातलेली मध्यमवयीन महिला. तिला विचारले. तिने आमची चौकशी केली. आमच्याबरोबर ती जवळ जवळ फर्लांगभर चालत आली. पुढल्या चौकात तिने उजवीकडे फुटणारे दोन रस्ते दाखवले. म्हणाली,

"जंटलमेन, हा पहिला रस्ता जवळचा आहे. त्याने गेलात नि डावीकडे वळलात की तुमचे हॉटेल येईल. पुढचा दुसरा रस्ता दूरचा आहे. त्याने जाऊन उजवीकडे जरा चालावे लागेल."

आम्ही तिचे आभार मानून निघालो, तसे तिने आम्हाला थांबवले.

"तुम्ही दुसऱ्या रस्त्याने जा. पहिल्या रस्त्याने जाऊ नका."

"का?"

"तो अंधारा आणि एकाटा आहे." तिच्या स्वरात ममत्व होते नि काळजीही.

अजूनही तो प्रसंग आठवला की त्या माऊलीचे शब्द कानात घुमतात.

"तो रस्ता अंधारा नि एकाटा आहे. त्याने जाऊ नका."

ऑस्ट्रेलियात माणसांचा दुष्काळ असेल पण माणुसकीचा नाही.

■

REFBK-0028061

REFBK-0028061

भूप्रवास
682
१५७५४